श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित

# इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय

सिडको, नवीन नांदेड.

## माझा प्रवास
## (विशेषांक)



# ज्ञानधारा

२०२४-२०२५



पदवी वितरण समारंभ प्रसंगी, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करत असताना.




पदवी वितरण प्रसंगी मार्गदर्शन करताना संस्थेचे सहसचिव मा. प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर.



पदवी वितरण प्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुर्गेश रवंदे.



मा.दत्ता बारगजे (सुप्रसिद्ध समाजसुधारक) मार्गदर्शन करताना




पदवी वितरण प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थींना पदवी प्रदान करताना...




करिअर मार्गदर्शन अंतर्गत महारोजगार मेळावा प्रसंगी.

## प्रेरणास्थान



# स्व. डॉ. शंकररावजी चव्हाण

संस्थापक अध्यक्ष

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड.

# मार्गदर्शक



**मा. खा. श्री. अशोकरावजी चव्हाण**

माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि
अध्यक्ष, श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड.



**मा. सौ.अमिताताई अशोकराव चव्हाण**

उपाध्यक्षा,
श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड.



**मा. श्री. डी. पी. सावंत**
माजी राज्यमंत्री (महाराष्ट्र राज्य) व
सचिव,
श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड.



**मा. डॉ. रावसाहेब कृष्णाजी शेंदारकर**
सहसचिव,
श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड.



**मा. ॲड. श्री. उदयराव निंबाळकर**
कोषाध्यक्ष,
श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड.

## संपादक मंडळ



**प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे**

मुख्य संपादक

## कार्यकारी संपादक



डॉ. शंकर विभुते



डॉ.लक्ष्मण काळे



डॉ.हनुमंत भोपाळे



डॉ.एस.बी.मिर्झा



डॉ.विशाल मस्के

## विद्यार्थी संपादक मंडळ



अनील लोंढे
एम.ए.मराठी प्रथम



दीपक कांबळे
बी.ए.तृतीय



श्रद्धा हंबर्डे
बी.एस्सी द्वितीय



इंगेवाड प्रतिभा
बी.ए.तृतीय



श्रेया साळवे
बी.ए.प्रथम



दिव्या आकले
बी.ए.प्रथम



## प्राचार्य मनोगत...

शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास याचा अर्थ शारीरिक, बौद्धिक आणि भावनिक विकास अपेक्षित आहे .या प्रक्रियेत बौद्धिक आणि भावनिक विकास नवनिर्मितीतून साकार होत असतो. नवनिर्मितीची प्रतिभा बालवयात किंवा विद्यार्थी अवस्थेत विकसित पावली तर भविष्यामध्ये अधिक सकस साहित्य निर्माण होऊ शकते. हा व्यापक दृष्टिकोन ठेवून महाविद्यालयाचा 'ज्ञानधारा' हा वार्षिकांक यावर्षी माझा प्रवास या नवनिर्मितीची आस असणाऱ्या तसेच अस्सल अनुभवांचे संचित असलेल्या विषयाला वाहिलेला आहे. मराठी हिंदी आणि इंग्रजी  या तिन्ही भाषेतून विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन येथे  केले आहे. प्रवास हा वरवर सोपा वाटत असला तरी त्यांना आलेली अनुभूती, पाहिलेलं प्रसंग, निरीक्षण आणि आकलन या सर्व पातळ्यांवर विद्यार्थ्यांची प्रतिभा विकसित पावत असते. आमच्या विद्यार्थ्यांनी  शालेय जीवनापासून ते आजपर्यंत जिथे जिथे प्रवास केला आणि त्यातील कोणते प्रसंग वर्णन  अविस्मरणीय ठरले, याची नोंद प्रस्तुत अंकात या विद्यार्थ्यांनी नोंदवली आहे. त्यामुळे हा अंक म्हणजे विद्यार्थ्यांसोबतच वाचकांना आणि प्रवास करणाऱ्या प्रत्येकाला मनापासून आवडेल याची खात्री वाटते. अर्थात हे प्रवास लेखन विद्यार्थ्यांचे असल्याने यामध्ये काही बाबतीत कमतरता जाणवू शकते. पण विद्यार्थ्यांनी केलेले निरीक्षण, केलेली मांडणी आणि मनाला भावलेले प्रसंग मात्र अल्हाददायक वाटतात. हा अंक वाचताना नेहमीच  मनाला आनंद निर्माण होतो आणि ज्या ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी भटकंती केली, प्रवास केला तेथे आपणास  जाण्याचा मोह निर्माण होतो. एवढी ताकद या वर्णनात असल्याची प्रचिती हा अंक वाचताना आपणास क्षणोक्षणी येते. याचा आम्हाला आनंद आणि अभिमान वाटतो.

आपण या अंकाचे हार्दिक स्वागत कराल हीच अपेक्षा...

**प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे**

# Not me; But You (राष्ट्रीय सेवा योजना)




राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात मार्गदर्शन करताना नॅक समन्वयक डॉ.राजकुमार पवळे आणि प्रमुख अतिथी.




युवा संवाद, राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे.



राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण करताना संस्थेचे सहसचिव मा.प्राचार्य रावसाहेब शेंदारकर.




राष्ट्रीय सेवा योजना शिबीर उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ.ए.टी.शिंदे.



विशेष वार्षिक शिबीर प्रसंगी डॉ.भागवत पस्तापुरे, डॉ.विशाल मस्के आणि सर्व शिक्षक व विद्यार्थी.



अवयवदान रॅलीत स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड रा.से.यो.समन्वयक डॉ.मलिकार्जून करजगी आणि संघ.

## महाविद्यालयातील विविध विभागांचे ठळक उपक्रम




मराठी विभागाच्या वतीने शैक्षणिक सहल, संत नामदेव यांच्या जन्मस्थळी भेट.



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे व सव शिक्षक बांधव.



हिंदी विभागाचे वतीने भितीपत्रकाचे विमोचन करताना मान्यवर



इतिहास विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ.जी.एस.पाटील




श्रद्धेय डॉ. शंकररावजी चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त मार्गदर्शन करताना सुप्रसिद्ध साहित्यिक शिवाजी अंबुलगेकर.




युवा संवाद राज्यस्तरीय स्पर्धेत कु. नम्रता नांदेडकर

# अविस्मरणीय आठवणी...



श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचीव व माजी उच्च शिक्षण राज्यमंत्री मा.डी.पी.सावंत यांच्या हस्ते 'ज्ञानधारा' अंकाचे विमोचन करताना



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये भूगोल विषयामध्ये गुणानुक्रमे सर्व द्वितीय आलेली संध्या नागोराव गोडबोले या विद्यार्थ्यांनी सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दुर्गेश रवंदे ,भूगोल विभागप्रमुख डॉ. नामदेव वाघमारे व प्रा. डॉ. भागवत पस्तापुरे



युवा संवाद राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. ऐश्वर्या नांदेडकर यांची सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य आणि शिक्षकवृंद.



गणीत अभ्यास मंडळाचे उदघाटन करताना, मान्यवर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य.




संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी विस्तार उपक्रम म्हणून वर्केड गावात डिजिटल व संगणक साक्षरता कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



सामूहिक वाचन मेळावा प्रसंगी विद्यार्थी ग्रंथाचे वाचन करीत असताना..

## क्रीडा विभागातील गुणवंत खेळाडू



सौरभ पवार
(मल्लखांब)



विजय केंद्रे
(मल्लखांब)



शैलेश मदेलवार
(मल्लखांब)



लक्ष्मीकांत मस्के
( मल्लखांब)



वैभव हाडमोडे
(मल्लखांब)



सोहम राजेश कळसकर
(ॲथलेटिक्स)

## नावीन्यपूर्ण उपक्रम...



प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेविषयी मार्गदर्शन करताना




इतिहास विभागाच्या वतीने आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विशेष अतिथी व्याख्यान प्रसंगी डॉ. प्रकाश वाघमारे




यु.पी.एस.सी व एम.पी.एस.सी संदर्भात विद्यार्थ्यांना फ्री वेबिनार..




जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.विणा पाटील



ग्रंथावर बोलू काही 'श्रीमती इंदिरा गांधी' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. डी. बी. कदम




इंग्रजी विभाग आयोजित 'बेक्कन' या भितीपत्रकाचे विमोचन करताना डॉ. बी. एस. लोकडे

## सन्मान.. सत्कार.. गौरव...



डॉ. जी. एस. भोपाळकर यांना विज्ञान रत्न पुरस्कार प्रदान करताना महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री मा. अशोकरावजी चव्हाण साहेब.



संस्थेचे सचिव, मा. डी. पी सावंत साहेब व संस्थेचे सहसचिव, मा. रावसाहेब शेंदारकर यांच्या हस्ते डॉ.मिलींद लोखंडे, डॉ. राजकुमार पवळे, डॉ.उमेशसिंह बायस लिखित पुस्तकाचे विमोचन करताना.



सुक्ष्म जीवशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेन्टेशन स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावर यश मिळवल्याबद्दल विद्यार्थ्यांचे सन्मान करताना..




राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त डॉ. डी बी कदम लिखीत पुस्तकाचे विमोचन प्रसंगी मान्यवर..




इंग्रजी विभागाच्या वतीने राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन.



इंदिरा गांधी कृषी विश्वविद्यालय रायपूर (छत्तीसगड) येथे मान्यवरांच्या हस्ते एक्सलन्स इन एक्सटेंशन पुरस्कार स्वीकार करीत असताना डॉ. आर. बी. पाटील.

# मंतरलेले दिवस...



महाविद्यालय वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष मा.ॲड.उदयरावजी निंबाळकर व सुप्रसिद्ध साहित्यिक मनोज बोरगावकर यांच्या समवेत..




ग्रंथालयाच्या वतीने आयोजित 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत प्रमुख वक्ते म्हणून दैनिक लोकमतचे उपसंपादक मा. भारत दाढेल यांच्या सत्कार प्रसंगी.



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा समारोपप्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. प्रल्हाद भोपे आणि विद्यार्थी



गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना संस्थेचे कोषाध्यक्ष मा.ॲड. उदयरावजी निंबाळकर व सुप्रसिद्ध साहित्यिक मनोज बोरगावकर




वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी रांगोळी स्पर्धेत सहभागी झालेले कलावंत..



भव्य रोजगार मेळावा अनुषंगाने विद्यार्थ्यांची नोंदणी करीत असताना समिती..

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते

Indira Gandhi (Sr.) College,

CIDCO, New Nanded

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित

# इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय

सिडको, नवीन नांदेड.

## माझा प्रवास
## (विशेषांक)



# ज्ञानधारा

२०२४-२०२५

# ज्ञानधारा

## माझा प्रवास (विशेषांक)

२०२४-२०२५


मार्गदर्शक व प्रकाशक

मुख्य संपादक

**प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे**

कार्यकारी संपादक

**प्रा. डॉ. शंकर विभुते**

**प्रा. डॉ. लक्ष्मण काळे**

विद्यार्थी संपादक

**दीपक कांबळे**

**मुद्रक**

**मुद्रा ऑफसेट,**

एम.जी. रोड, नांदेड.



या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# ज्ञानधारा

## माझा प्रवास (विशेषांक)

२०२४-२०२५

### संपादक मंडळ

**✻ मराठी विभाग ✻**

मार्गदर्शक

डॉ. शंकर विभुते

डॉ. हनुमंत भोपाळे

संपादक मंडळ:

अनील लोंढे

दीपक कांबळे

**✻ हिंदी विभाग ✻**

मार्गदर्शक :

डॉ. लक्ष्मण काळे

संपादक मंडल :

इंगेवाड प्रतिभा सदाशिव

हंबर्डे श्रद्धा राजीव

**✻ English Section ✻**

**Guidence :**

Dr. Mirza S.B.

Dr. Maske V.B.

**Editorial Board :**

Jadhav Pooja

Tarte Sakshi

Swati Suryawanshi

Salve Shreya

**संपादकीय..**



ज्या गावाला जायचं नाही, त्या गावचा रस्ता कशाला विचारायचं अशी एक म्हण प्रचलित आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पूर्वीच्या काळी प्रवास करणे  हे अतिशय कठीण, गुंतागुंतीचा आणि अवघड असा मार्ग होता. गरज असल्याशिवाय, आवश्यकता भासल्याशिवाय किंवा अपरिहार्यकारणातूनच प्रवास घडत असे. त्याकाळी जाण्याचा मार्ग, जाण्यासाठी असणारी साधने आणि सुलभता मोठ्या प्रमाणात नव्हती. त्यामुळे कोणी आवडीसाठी किंवा छंदासाठी, गोडीसाठी म्हणून प्रवास करीत नसत. पण गेल्या पंच्याहत्तर वर्षाच्या काळात विकासाच्या अनेक वाटचालीमुळे सर्व साधने, मार्ग सुलभ झाले. त्यामुळे सामान्यातला सामान्य माणसालाही अशक्य वाटणारी ही बाब आता शक्यप्राय वाटू लागली. प्रवास करणे हा फक्त श्रीमंत किंवा मध्यमवर्ग पुरताच मर्यादित राहिला नसून आज सामान्य व गरीब कुटुंबातील, विद्यार्थीही  प्रवास करीत आहेत. प्रवाससंबंधित असलेल्या गोष्टीची माहिती, प्रवास वर्णन, गुगल आणि जाऊन आलेल्या लोकांकडून ती माहिती मिळवत आहेत. त्यातून त्यांचा मार्ग अधिक सुकर होतो आहे. व्यक्तीने सांगितलेली माहिती किंवा गुगलने दिलेली माहिती ही काही प्रमाणात मर्यादित असू शकते. लेख स्वरूपातील माहिती मात्र अधिक सखोल, वस्तुनिष्ठ आणि ती सातत्याने सोबत ठेवता येते. त्यातून संकटकाळात आपणास कोणता मार्ग अवलंब करता येईल याची धडेही नकळतपणे देऊन जातात. लोकांना फक्त स्थळाचे, प्रदेशाचे वर्णन नको असते तर जी व्यक्ती तेथे जाऊन आली त्याच्या अनुभवाचा आणि त्याच्या दृष्टीला पडलेल्या परिसराचा घेतलेला वेध लोकांना कुतूहलाचा असतो. यातून नवनिर्मिती होते, सर्जनशीलता विकसित होते.या भावनेने यावर्षीचा ज्ञानधारा हा अंक आम्ही 'माझा प्रवास' या विषयावर विशेषांक काढत आहोत.आमच्या या नवनिर्मितीला तुम्ही नक्कीच स्वागत कराल, ही आशा आहे.हा नवनिर्मितीचा अंक आपणास सुपूर्द करताना मनस्वी आनंद होत आहे.

# मराठी सर्जनशील विभाग

**कार्यकारी संपादक**

**प्रा. डॉ. शंकर विभुते**

**प्रा. डॉ. हनुमंत भोपाळे**

**विद्यार्थी संपादक मंडळ**

**अनिल लोंढे,** एम.ए.मराठी

**दीपक कांबळे,** बी.ए.तृतीय वर्ष



# अणुक्रमणिका

## मराठी विभाग –


१ **शाळेची सहल –**स्नेहा शंकर मनवर, बी.ए.द्वितीय वर्ष –७

२ **माझा अविस्मरणीय प्रवास** –किशोरी वन्ने, बी.ए. प्रथम वर्ष –८

३ **महाबळेश्वर : एक आठवण** –आकाश केशव थोरात, बी.ए.प्रथम वर्ष –११

४ **रत्नागिरी : एक सुंदर आठवण** –समीक्षा कापसीकर, बी.ए.प्रथम वर्ष –१३

५ **जीवनातील अविस्मरणीय दिवस**–शिला चिलपिंपरे, बी.ए.तृतीय वर्ष –१५

६ **माझी सहल –** दौलताबादचा किल्ला **–** अनिल लोंढे, एम.ए.मराठी प्रथम वर्ष –१७

७ **माझा गोवा प्रवास**–सुप्रिया शेषराव गजभारे, बी.ए.प्रथम वर्ष –१९

८ **छ. संभाजीनगर माझा अविस्मरणीय प्रवास**–सोनसळे प्रांजली, बी.ए.प्रथम वर्ष –२०

९ **माझं आजोळ**–उगले विद्या गणेश, बी.ए.प्रथम वर्ष –२२

१० **माझा निसर्ग प्रवास**–सुपेकर दुर्गेश्वरी, बी.ए.प्रथम वर्ष –२५

११ **रायगडाचरील आठवणी**–मयुरी पुयड, बी.ए.प्रथम वर्ष –२७

१२ **मराठी विभागाची सहल**–कांबळे दीपक अंबादास, बी.ए.तृतीय वर्ष –२८

१३ **लोणावळा आठवणी**–श्रद्धा गंदेवार, बी.ए.प्रथम वर्ष –३२

१४ **गडावर जाताना**–दिव्या देविदास आकले, बी.ए.प्रथम वर्ष –३३

१५ **गणपतीपुळे**–कांचन गणेश लोंढे –३४

१६ **मी केलेला जंगल प्रवास**–संयोजना शिंदे, बी.एस्सी. प्रथम वर्ष –३६

१७ **परभणीचा प्रवास**–श्रेया विजय साळवे, बी.ए.प्रथम वर्ष –३७

१८ **माझा अविस्मरणीय अनुभव : किल्ले रायगड**–ऋतुजा आनंदा हिवराळे, सिडको –४०

१९ **धाराशिव : एक अनुभव**–निकिता दिगंबर टर्के, बीए प्रथम वर्ष –४२

२० **शिर्डी एक आठवण**–कानगुले प्रांजली, बी.ए.तृतीय वर्ष –४५

२१ **पुणेः एक सुंदर अनुभव**–अंजली बुद्धेवाड, बी.ए.प्रथम वर्ष –४७

२२ **विपश्यना साधना: एक अनुभव**–प्रा. डॉ. शंकर विभुते –४९

# शाळेची सहल

**–स्नेहा शंकर मनवर,** बी.ए.द्वितीय वर्ष

मी इयत्ता ९ वीमध्ये असताना आम्हा सर्व विद्यार्थ्यांना सरांनी एका दिवसाच्या सहलीसाठी नेले. त्या दिवशी मी संपूर्ण नांदेड फिरले. नांदेडला आल्यानंतर सर्वप्रथम आम्ही स्काऊट गाईड पाहिले. प्रत्येक जण आपल्या दिलेल्या पोषाखामध्ये आले होते. ते दृश्य खूप सुंदर होते. आम्ही खूप धार्मिक ठिकाणीही गेलो. एकेठिकाणी महादेवाचे खूप छान मंदिर होते. थोडा वेळ तिथेच बसलो व घरून आणलेला डब्बा खाल्ला. त्याच काळात कोरोनाची साथ आली होती. पण त्याची लक्षणे नांदेडमध्ये खूप कमी होती. तरी पण सर्वजण मास्क, सेनेटाइजरचा वापर करीत होते. स्वच्छतेची काळजी घेत होते.

त्या दिवशी खूप मजा आली. खूप काही खाण्याचे सामान नेले होते. वाटेत येणारे पाणीपुरीची दुकाने, चॉकलेट खूप काही खात गेलो. नांदेडमधील गोदावरी नदीकाठी आल्यानंतर तेथील छोटयाशा नावेत बसून आम्ही कडेला आलो. तेव्हा खूप मजा आली. नंतर आम्ही सर्वजण एका पार्कमध्ये गेलो. तिथे खूप वेळ बसलो. पार्कमधील रेल्वे, डॉसिंग कार, झोके, जम्पिंग खूप काही खेळलो. तिथून निघाल्यानंतर आम्ही नांदेडच्या गुरुद्वारात गेलो. तेथील शांततामय वातावरण बघून मन प्रसन्न झाले. मला तिथे दिलेला प्रसाद खूप आवडला. तेथील लंगरमध्ये जेवण केले. दिवसातून हजारो लोक लंगरमध्ये जेवण करतात. रोज हजारो लोकांचा भूक मिटवली जाते. तिथून आम्ही सर्वजण सरांच्या घरी गेलो. मॅडमने आमच्यासाठी चहा केला होता. सरांचे घर खूप छान होते. सरांनी घरी खूप सारी फुलांची झाडे लावली होती. घरी येताना आम्ही फुले घेऊन आलो. संपूर्ण दिवस खूप छान गेला. आम्ही रात्री ८ वाजता घरी पोहोचलो. असे वाटत होते की ते दिवस संपूच नये. हा मी अनुभवलेला प्रसंग खूप छान होता. तो दिवस मी कधीच विसरू शकत नाही.

***



# माझा अविस्मरणीय प्रवास

**–किशोरी वन्ने,** बी.ए. प्रथम वर्ष

२ जुलैचा दिवस होता. मागल्या सतत तीन दिवसापासून मुसळधार पाऊस पडत होता. सारी धरती हिरवीगार झाली होतो. नदी, नाले तुडूंब भरले होते. टीव्हीसमोर बसून गरम गरम कांदे, भज्याचा आस्वाद घेत असतानाच एक बातमी आली. नेमावरच्या दूरस्थ गावात नर्मदेचे पाणी शिरले होते. त्या गावाचा संपर्क सर्व बाजूंनी तुटला होता. तेथील माणसे, जनावरे, त्यांच्या जीवाला धोका होता. पाण्याचे स्तर वाढतच होते. कांदा, भजी बाजूला सारून टीमला एकत्रित करून व बरोबर आवश्यक औषधे घेऊन आम्ही त्या गावी जाण्यासाठी सज्ज झालो. पण त्या गावी पोहोचायचे कसे हा मोठा प्रश्न होता. पण थोड्याच वेळात कलेक्टर साहेबांची गाडी आम्हाला घ्यायला आली व मी माझ्या टीमबरोबर पोलिस ग्राऊंडला पोहोचलो. तेथे आल्यावर समजले की आम्हाला त्या गावी हेलिकॉप्टरने जायचे आहे.

ऐकून जरा भीतीच वाटली. एरव्ही विमानाने प्रवास करणे वेगळे व हेलिकॉप्टरने जाणे वेगळे. बरोबर गावकऱ्यांसाठी ब्रेड, बिस्कीटचे पुडे, लंच पॉकेटस, लहान मुलांसाठी दूध, ब्लँकेटस, औषधी असा सर्व लवाजमा घेऊन आम्ही हेलिकॉप्टरची वाट बघत बसलो. हेलिकॉप्टर खाली उतरले. आता कठीण प्रसंग होता तो म्हणजे आत चढण्याचा. त्यात आत जायला पायऱ्या, शिडी वगैरे काहीच नसते. फक्त टी च्या आकाराचा लोखंडाचा खांब. त्यावर पाय वर करून चढायचे. वरून पडणारा पाऊस, एका हाताने साडी व बॅग सांभाळत कशी बशी आत चढले, मागून कोणीतरी अक्षरशः उचलून आत ढकललेले असावे.

वरून पडणारा धो धो पाऊस. हेलिकॉप्टरची घरर, घररं. खाली बघायची देखील भीती वाटत होती. जीव मुठीत घेऊन आम्ही सर्व गप्प बसलो होतो. हिरवीगार धरा, कांदा भजी सर्व काही विसरायला आले होते.

गावचे तर नामोनिशाण दिसत नव्हते. पण गावकऱ्यांना मात्र आमचे हेलिकॉप्टर दिसले असावे. कारण त्यांनी खालून लाल पताका दाखवण्यास सुरुवात



केली होती. हेलिकॉप्टरचा वेग कमी झाला व ते हळूहळू खाली उतरू लागले. आता खाली पाण्याबरोबरच माणसं, झाडे झुडूपे देखील नजरेस पडू लागले.

हेलिकॉप्टरला जमिनीवर उतरायला जागाच सापडत नव्हती. शेवटी तीन–चार घिरट्या मारून एका जागी उतरले. चढण्याएवढीच उतरायला देखील तेवढीच कवायत करावी लागली.

एव्हाना दुपारचे ५ वाजून गेले होते. पोटात कावळ्यांनी काव काव सुरू केली होती. गावकऱ्यांनी प्रेमाने दिलेल्या गरमागरम गुळाच्या चहाने भूक भागवली व ताजेतवाने होऊन कामाला लागलो. पावसाचा वेग आता थोडा कमी झाला होता. पाण्याचे स्तर वाढत नसले तरी कमी देखील होत नव्हते. सुरक्षिततेच्या दृष्टीने वृद्ध जणांना व जनावरांना सुरक्षित जागेवर हलवणे गरजेचे हेते. गावात एक शाळा थोड्या उंचीवर होती. तेव्हा सर्व संमतीने त्यांना शाळेत हलवण्याचा निर्णय घेतला गेला. एका हॉलमध्ये लहानग्या बाळांना त्यांच्या आईसमवेत ठेवले. सर्वात आत असलेल्या दोन खोल्यांमध्ये गाई, म्हशी, शेळ्या वगैरे बांधल्या. गावातील काही उत्साही तरुणांच्या मदतीने दोन तासात सर्व काम आटोपले.

पावसांच्या धारांचा वेग कमी झाला होता.मातीच्या सुगंधाऐवजी शेण, गोमुत्राचे वास नाकात जात होते. मला मनात हसू आले. ’हा पण एक श्रावणच ना...’ तेवढ्यात गावातल्या काही पोरांनी आकाशात हेलिकॉप्टर उडून जाताना बघितल्याची बातमी आम्हास दिली. ’अरे देवा, म्हणजे हेलिकॉप्टर आम्हाला न घेताच गेले होते.’ आता मोठा प्रश्न आमच्यासमोर होता. रात्री त्या गावात मुक्काम करणे शक्य नव्हते व पावसामुळे सारे रस्ते बंद होते. कसे काय करावे हा विचार करत असतानाच सरपंचजीने एक उपाय सांगितला. आपण जर जोडीने नेमावरपर्यंत गेलो तर कसे होईल? विचार चांगला होता. थोड्याच वेळात नावाड्याने होडी गावाच्या किनाऱ्याला लावली. सर्वांचा निरोप घेऊन आम्ही नावेत बसलो.

पण थोड्याच वेळात श्रावणधारा वेगाने माँ नर्मदाच्या भेटीसाठी येऊ लागल्या. वरून कोसळणाऱ्या श्रावणधारा सुसाट्याचा वारा व खाली खळखळ वाहणारी नदी. तिचे एवढे रौद्र रूप मी कधीच बघितले नव्हते. मला तर भीतीने धडकी भरली. मनात देवाची प्रार्थना करत जवळजवळ एक तास जल प्रवास करून कसेबसे सुरक्षित स्थळी पोहोचलो. वरून धो–धो पडणारा पाऊस खाली गुडघ्यापर्यंत चिखल अंगावर ओले चिंब कपडे. आम्ही तर नर्मदेच्या कृपेने होडीतून सुखरूप उतरलो. आमची रवानगी खातेगाव रुग्णालयात केली व आम्ही सर्वजण डॉक्टरकडे गेलो. तेथे आल्यावर सर्वप्रथम स्वतःला कोरडे करून कपडे बदलले. ह्या सर्व गडबडीत रात्रीचे ११ वाजून गेले होते, पाऊस देखील आता थांबला होता. आता गाडी मध्येच मस्तपैकी झोप काढू असा विचार करत आम्ही सर्वांचा निरोप घेतला. व आमचा ’सडक प्रवास’ सुरू झाला. दिवसभराच्या श्रमाने लगेच डोळा लागला.

चेहऱ्यावर येणाऱ्या पावसाच्या थेंबाने झोप उघडली. बाहेर बघितले तर परत पाऊस सुरू झाला होता. मी अंगाभोवती चादर लपेटून घेतली व झोपेचा प्रयत्न

करू लागले. करर्र कच्च..

नद्या भरभरून वाहत होत्या. पुलावरून भरपूर उंचीवरून पाणी वाहत होते. पुढे जायची वाटच दिसत नव्हती. श्रावणधारांनी आम्हाला परत चहूबाजूंनी घेरले होते. ड्रायव्हरने मग गाडी बाजुला उभी केली व आम्ही गाडीचे लाईट लावून बसलो. थोड्याच वेळात गाडीच्या लाईटने देखील आमची साथ सोडली. आता फक्त आमच्या जवळ असलेल्या टॉर्चचाच सहारा होता. लहानपणी आजोबांनी सांगितलेल्या भुतांच्या गोष्टी मनात घिरट्या घालू लागल्या. झाडांच्या फांद्यावर चित्रविचित्र आकृत्या दिसू लागल्या.

मनात भलभलते विचार येऊ लागले. अनेकदा पुलावरून जीपगाडी वाहून गेल्याच्या बातम्या मनात येऊ लागल्या. जीव अगदी रडकुंडीस आला होता. सकाळचे पाच वाजून गेले होते. मग मात्र इंद्र देवतेला आमची कीव आली असावी म्हणून की काय पण पावसाचा वेग कमी झाला, पुलावरील पाणी हळूहळू कमी होऊ लागले. पूर्वेकडे पहाट पडू लागली होती. सूर्यदेवतेच्या आगमनाने सर्वत्र उजेड पसरला.

***



# महाबळेश्वर : एक आठवण

**–आकाश केशव थोरात,** बी.ए.प्रथम वर्ष

प्रत्येक प्रवासातून काहीतरी नवीन शिकायला मिळतं. काहीतरी अनुभवायला मिळतं. याचाच अनुभव मला एकदा एका अविस्मरणीय प्रवासाच्या निमित्ताने आला. मी आणि माझे काही मित्र एकदाच सहलीसाठी निघालो. आमचे ठिकाण होते महाबळेश्वर. महाबळेश्वरच्या नैसर्गिक सुंदरतेमुळे आणि थंड हवेमुळे हे ठिकाण लोकप्रिय आहे. आम्ही पहिल्यांदा गाडीने महाबळेश्वरच्या दिशेने कुच केला. प्रवासात सुंदर डोंगर हिरवेगार रांगेतले झाडे आणि स्वच्छ हवा आमचं स्वागत करत होती.

महाबळेश्वरच्या गावी पोहचताच आम्ही एक सुंदर हॉटेल बुक केले. नंतर आम्ही पाचगणी या प्रसिद्ध ठिकाणाला भेट दिली. एका तलावाजवळ बसून त्या गप्पा केल्या. रस्तेबंदी फार्मला भेट दिली. तिथे जाऊन स्ट्रॉबेरी तोडण्याचा अनुभव घेतला त्याचा स्वाद कधीही विसरणार नाही. रात्री चंद्राच्या प्रकाशात आणि साक्षीने आम्ही एकत्र गिटार वाजवले.

याप्रमाणे माझा महाबळेश्वरचा प्रवास एक अद्वितीय अनुभव ठरला. प्रवासात प्रत्येक क्षणास जिवंतपणाची अनुभूती मिळाली. निसर्गाच्या या सौंदर्यात



हरवून मी खूप काही शिकलो. प्रवास ही एकच गोष्ट आहे जी आपल्याला आयुष्याचा अर्थ सांगते. हा अनुभव मला सदैव लक्षात राहील.

हे लेखन आमच्या महाविद्यालयाच्या ज्ञानधारासाठी उपयुक्त ठरू शकते कारण यामध्ये प्रवासाचे अनुभव निसर्गाचे वर्णन आणि मित्रतेचा समावेश आहे. प्रवास हा जीवनातील अनमोल अनुभव असतो. प्रत्येक प्रवासातून आपल्याला काहीतरी नवीन शिकायला मिळते. आपल्याला नवीन लोकांशी भेटता येते. मला आठवते एकदा माझा एक अविस्मरणीय प्रवास झाला जो आजही माझ्या मनात ताजाच आहे.

आमच्या वर्गातल्या सहलीसाठी आम्ही आग्रा गाठले. आग्रा म्हणजे ताजमहल. तिथल्या ऐतिहासिक शब्दाला थाट आणि स्थानिक संस्कृतीचा अनुभव धेत आम्ही मुंबईतून आग्राकडे निघालो. गाडीच्या प्रवासात रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या ग्रीन फिल्डस् लहान गाव आणि त्यांच्यातील जीवनाची किमया पाहताना मन प्रसन्न होते.

आग्रा पोहोचल्यावर पहिले ठिकाण म्हणजे ताजमहल. ताजमहल भव्यतेने माझं मन थक्क झालं. कलात्मक काम, जलदर्शन आणि चारही बाजूंनी असलेल्या बागा, पहिल्या खूप गप्पा मारल्या. मनामध्ये भरती ताजमहल पाहिल्यावर आम्ही मागच्या किल्ल्यावर गेलो. किल्ल्याच्या भव्य भिंती पाहिल्या. त्यातील इतिहास हा स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी जाग्या करत होता. त्या ठिकाणाला एक वेगळीच महत्त्व प्राप्त झाला आहे. त्या किल्ल्यात फिरताना इतिहासाचा एक भाग झाल्यासारखं वाटत होतं.

रात्रीच्या वेळी स्थानिक बाजारात गेलो. तिथे मिळणाऱ्या हस्तकलेचे विशेषतः ताजमहलच्या प्रकृतीत असलेल्या वस्त्रांमध्ये खरीखरी भारतीयता झळकते. आम्ही काही स्थानिक पदार्थही चाखले. पनीर टिक्का आणि चाट चविष्ट होते.

या प्रवासात अनेक मित्रांसोबत असलेला अनुभव खूप खास होता. गप्पा, खेळ, हसणं सर्वकाही खूप आनंददायी होतं. त्या सहलीत मिळालेल्या आठवणी आजही मनात ताज्या होतात. प्रत्येक ठिकाणी मी अनुभवलेला आयुष्यात काहीतरी शिकलो.

***



# रत्नागिरी : एक सुंदर आठवण

**– समीक्षा कापसीकर, बी.ए.प्रथम** वर्ष



माझ्या लहानपणी आमच्या शाळेची सहल निघाली. मग एक प्रवास करण्याची संधी मलाही मिळाली. ही संधी होती आमची सहल. या सहलीची प्रत्येक विद्यार्थी आतुरतेने वाट पाहत होता. शेवटी सहलीचा दिवस निश्चित झाला.शिक्षकांनी वॉटर पार्कमध्ये सहल नेण्याचा निर्णय घेतला होता. हा वॉटर पार्क आमच्याच शहरात स्थित होता. हा म्हणून त्या ठिकाणी पोहोचायला जास्त वेळही लागणार नव्हता. ही सहल मनोरंजन आणि रोमांचने भरलेली होणार होती. सहलीच्या एक दिवस आधीच सरांनी आम्हाला सर्व आवश्यक सूचना दिल्या. सर्वांनी सकाळी सर्व आवश्यक सूचना दिल्या की १० वाजता शाळेत जमायचे होते व यानंतर शाळेतूनच बस प्रवास करीत वॉटर पार्कमध्ये नेणार होती. आम्ही सर्वजण ठरलेल्या वेळेनुसार १० वाजता शाळेत जमलो. बस भरली आणि वॉटर पार्ककडे निघाली. एक तासात आम्ही तेथे पोहोचलो. वॉटर पार्कमध्ये प्रवेश करताच मी व माझ्या मित्रांची पूर्णपणे एन्जॉय करणे सुरू केले. मी तर उंच उंच घसरगुंडीवरून खाली येत होतो. जेवण्याची व्यवस्था शाळेकडून करण्यात आली होती. आमच्या सरांनी वर्गातील ४० विद्यार्थ्यांचे ५–५ असे ८ गट बनवले होते. आणि प्रत्येक गटात एक लीडर होता. लीडरचे काम आपल्या गटातील विद्यार्थिनींवर लक्ष ठेवणे. माझ्या गटाचा लीडर मलाच बनवण्यात आला. ज्यामुळे माझ्यावर माझी आणि आमच्या गटातील मुलांची जबाबदारी होती. म्हणून मी थोडा चिंतीतही

होते. परंतु काहीही समस्या निर्माण झाली नाही. ५ वाजेपर्यंत आम्ही खूप मजा केली आणि आता वॉटर पार्क बंद करण्याची वेळ झाली होती. शिक्षकांची आम्हा सर्वांनी बाहेर निघण्याची सूचना दिली. बाहेर आल्यावर सर्व ग्रुप आपापल्या लीडरसोबत उभे राहिले. बसमध्ये बसून आम्ही पुन्हा शाळेकडच्या प्रवासाला निघालो. बसमध्ये प्रवास करताना बाहेर मोठमोठे पर्वत, झाडे, नैसर्गिक सौंदर्य दिसते. ते पाहून वाटायचं याच ठिकाणी जाऊन राहावे. पक्षी दिसत, नवनवीन रंगीन पक्ष्यांचा किलबील आवाज कानांमध्ये येत आणि येताना आम्हाला हरीण व हरिणीचे पिल्लू दिसले. अगदी कोमलपणे हरीण तिच्या पिल्ल्याला जपताना दिसली. आम्हा सर्व मित्र पाहून आनंद घेत होतो. आणि शेवटी काही तासानंतर आम्ही ६.३० च्या सुमारास मी घरी पोहोचलो. सहल हे मित्रांसोबत घालवलेले मनोरंजक क्षण नेहमी स्मरण राहणारे असतात.

काही महिन्याअगोदर मी शाळेतील सुटीला सुरुवात होत असताना म्हणजेच एप्रिल महिन्याच्या अखेरीस मामाच्या गावाला रत्नागिरीमध्ये गेलो होतो. सुटीची सुरुवात होत असल्यामुळे मला माहीत होते की स्टेशनवर तिकीट काढण्यासाठी खूप रांग असेल म्हणून रेल्वेच्या वेळापत्रकानुसार सोमवारी सकाळी १०च्या रेल्वेचे तिकीट ऑनलाईन बुक केले.

मी सोमवारी घरून टॅक्सी करून स्टेशनला पोहोचलो. स्टेशनच्या ठिकाणी लोकांची भरपूर प्रमाणात ये-जा चालू होती. मी त्या गर्दीतून पुढे पुढे होत तिकीटमध्ये सांगितलेल्या प्लॅटफॉर्म तर दोन्ही बाजूंनी माणसांनी मोठ्या प्रमाणात भरून गेले होते. तेथे मी बराच वेळ उभा राहिलो. शेवटी ९.४० ला ट्रेन हळूहळू येऊन समोर थांबली. प्रत्येकजण कसेबसे आत घुसण्याचा प्रयत्न करीत होते. अखेर ट्रेनमध्ये गेले. मी माझी बॅग सीटवरील रकान्यात ठेवली. खिडकीशेजारी रिकाम्या असलेल्या एका सीटवर जाऊन बसले.

मी रेल्वेमध्ये बसले, घरी कळवले आणि बॅगमध्ये असलेले पुस्तक काढून वाचायला सुरुवात केली. खिडकीतून आत येणारी स्वच्छ आणि थंड हवा खूपच छान वाटत होती. अनेक लोक एकमेकांशी बोलत. खिडकीतून बाहेर सुंदर दृश्य दिसत होते. अनेक हिरवीगार शेती, तलाव, गाव, हिरवीगार डोंगर असे अनेक दृश्य दिसत होते. रेल्वेमध्ये अनेक फेरीवाले ये-जा करत होते. भेळवाले, सरबतवाले, वडापाववाले अनेकजण जोराने ओरडत ये-जा करत होते. मी त्यांच्याकडून भेळ विकत घेतली. खात खात प्रवासाचा आनंद लुटत राहिले. पहाटे लवकरच ४.३० वाजता मी उठले आणि आईने दिलेला डब्बा खाल्ला. मी ट्रेनमधून बाहेर आले व मामासोबत घरी जाण्यास निघाले. अशा प्रकारे माझे प्रवास अविस्मरणीय झाला.

***

# जीवनातील अविस्मरणीय दिवस

**–शिला चिलपिंपरे,** बी.ए.तृतीय वर्ष



मी जेव्हा गावातल्या शाळेत होते तेव्हा गावातील शाळा ही मला खूप आवडायची. याच कारण मी जेव्हा गावात शाळेत होते तेव्हा आमचे वर्गशिक्षक आम्हाला रोज शुद्धलेखन लिहायला सांगायचे. मला मस्त वाटायचं. त्यानंतर  मला मामाच्या गावाला गणपतराव मोरे विद्यालयाला टाकले मग मामाच्या गावाला मी सायकलवर जात होते, मग गाव सुटला तिथल्या मैत्रिणी बनल्या आणि नंतर थोडी मोठी झाले. ७ वीच्या वर्गात गेले. मग काय मामाचं गाव म्हटलं की जे कोणी दिसायचे ते सर्वच मस्त लाड करायचे पण आता तेवढा नाही. माणूस मोठा झाला की आनंद कमी व्हायला सुरुवात होते.

इयत्ता सातवीत असताना मी व माझ्या चार मैत्रिणी शाळेतील दुपारच्या जेवणाच्या सुटीमध्ये जेवन करून उरलेल्या वेळेत गावात फिरून यायचं हे आमचं दररोजचं ठरलेलं होतं. नेहमीप्रमाणे जेवणाच्या सुटीमध्ये जेवण झाल्याने आज गावात नाही तर गावाच्या बाहेर जायचं ठरलं. सर्वांनी मिळून डब्बा खाल्ला आणि निघालो. वर्गशिक्षिकाला न सांगताच गेल्या. आमच्या

गप्पा चालू असताना मध्येच स्नेहा म्हणाली, 'थोडं दूर चालत गेले की आमचं शेत आहे आणि एवढी गोड बोरं त्या शेतात आहेत. आम्ही निघालो सगळ्या जनी तिच्या शेती पोहचल्या. सर्वांनी खूप बोरं खाल्ले. खूप सारे सोबत घेतले. मग शाळा तर भरून गेली होती. तिथून निघायचं म्हणलं की, रोहिणी म्हणाली, 'आता आपण आणखी थोडं चालत गेलो तर आपल्याला गड पहायला मिळेल.'

लगेच सर्वांनी त्यासाठी नको म्हणले, कारण गड पहायला गेल्याने खूप उशीर होईल. ती तिथंच बसून रडायला चालू केली. नंतर आम्ही बरं चलं जाऊन येऊ या म्हणल्याने रडणं बंद केले आणि चला म्हणून हसायला लागली. आणि चालत चालत गप्पा मारत निघाल्या. गप्पा एवढ्या रंगल्या की, आम्ही रस्ताच चुकलो. समोर घनदाट जंगलासारखे दिसू लागले. अंधार पडण्याअगोदर घरी जायचे होते. सर्वजनी रडायला चालू केल्या, तेव्हाचा प्रसंग आठवून खूप हसू येतं आता.

तसंच आणखी थोडं समोर गेल्या गड सापडेल म्हणून पण गड कुठेच सापडला नाही तेवढ्यात तिथे एक झोपडी दिसली. मग खूप छान वाटलं. आम्ही जवळ गेल्या. तेथे एक म्हातारी आजी आम्हाला दिसली व तिच्या दिशेने धावत सुटल्या. मग त्या आजीने आम्हाला आमचे नाव ते विचारून सर्व विचारपूस करून मग तिला समजले की आम्ही रस्ता चुकलो आहोत. तिने आम्हाला फळे खायला दिली. आमचं खाणं झालं. मग आम्हाला गावाच्या जवळ आणून सोडली. तोपर्यंत खूपच उशीर झाला होता. घरचे रागावतील असे वाटू लागले.

मग घरी गेल्याने घरच्यांनी आम्हाला सर्व विचारले, मी सगळं जे झालं ते सांगितले. पण त्यांनी म्हणजे आई–वडिलांनी समजून घेऊन माझ्यावर रागावले नाही.

आई–पप्पा काही म्हणले नाही याचा आनंद गगणात मावत नव्हता. पण उद्या शाळेत काय होईल याची माहिती नव्हती. आणि यामुळेच रात्रभर झोप आली नाही. आणि रात्री झोपले नव्हते म्हणून पहाटे पहाटे झोप लागली. मग आईने उठवते नेहमी प्रमाणे पूर्ण शाळेची तयारी केली, पण शाळेत वर्गशिक्षिकेला मध्यरात्रीनंतर गैरहजर राहण्याचे कारण काय सांगायचे हा विचार वारंवार येत होता. चेहऱ्यावर दररोज शाळेत जाताना आनंद होता ते दिसत नव्हता. मग आई म्हणाली, 'आज का चेहऱ्यावर १२ वाजलेत, रोज तर शाळेत जाताना खूपच आनंदात राहतेस ना.'

आईचं ऐकून परत हसरा चेहरा केला. मग शिक्षकांच्या शिक्षेची भीती मनात होती. आमच्या चौघीला शिक्षा मिळेल असे वाटत होते. मग स्नेहाच्या आईला आमच्या सोबत शाळेत चला म्हणून रडू लागलो. मग त्यांनी सोबत येऊन शिक्षकांना सांगितले, मग आमची शिक्षा माफ झाली व आम्ही आनंदी झालो.

***

# माझी सहल - दौलताबादचा किल्ला

**– अनिल लोंढे,** एम.ए.मराठी प्रथम वर्ष

सहल जाणार आहे या कल्पनेनेच मन भारावून जात होतं.सोबत काय काय न्यावं याची यादी करून ठेवली.रात्री झोपच येत नव्हती. उद्या किल्ल्यावर असू असे वाटून मन रोमांचित होत होते.

शेवटी तो दिवस उजाडला २ जानेवारी २०१६ माझी पहिली सहल होती.सकाळी लवकर उठून भराभर आवरून वेळेवर शाळेत गेलो.सर्व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचं वातावरण होतं.अजून बस आली नव्हती म्हणून मित्रांसोबत गप्पा मारत बसलो.तरीही पूर्ण लक्ष बसच्या वाटेकडे होतं .बस आली; बस निघाली ते थेट दौलताबादच्या किल्ल्याकडे. किल्ल्याचा इतिहास काही माहिती नव्हता, पण मित्रांसोबत बाहेर जायचे असल्याने मजा येणार होती.प्रवास सुरू होताच सर्वांनी एकच जल्लोष केला.वाटेत गप्पा मारणं, टिंगल टवाळी, करणं गाणी म्हणून हे चालूच होतं .शाळेतल्या बंदिस्त चार भिंतीतूनबाहेरच्या जगात प्रथमच मित्र मित्र जात होतो.खिडकीतून बाहेर पळणारी झाडे, वने शेत शिवार पाहत प्रवास सुरू होता. बस वेगाने जात होती. त्याच वेगाने मन सुसाट धावत होते. खिडकीतून दूर उंचावर किल्ला दिसू लागला. आनंद गगनात मावेना .दुपारी



किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचलो. नाष्टा केला. काही खायला सोबत घेतले आणि किल्ला चढायला सुरुवात केली.

आम्ही ३० ते ४० विद्यार्थी होतो. सर एका रांगेत आणि शिस्तीत नेत होते. गर्दी बऱ्यापैकी होती. समोर पाहतो तर काय टोकदार खिळे असलेले प्रचंड मोठे प्रवेशद्वार! हत्तीचा वापर करून दार तोडता येऊ नये म्हणून मोठमोठे खिळे आहेत लावलेली होते, असे सांगतल्या गेले. आत गेलो की दोन्ही बाजूला दुकानांसारखी छोट्या छोट्या खोल्या होत्या. त्यात तोफ वगैरे शस्त्रास्त्रे होती. आणखी समोर गेलो तर वानरे अचानक आली, आमच्यावर हल्ला केला आम्ही ओरडून पळ काढला. नंतर समजले की ते फक्त आमच्या हातातील खायचे पदार्थ घेण्यासाठी पाहत होते. समोर डाव्या बाजूला मोठे मैदान आणि मध्ये विहीर होती. विनोद, गप्पांनी प्रवास आनंददायक होत होता. समोर आणखी एक मोठा दरवाजा होता. तिथे एक शिपाई असल्याने थोडं घाबरून शांततेत चाललो. वाटेत एक सुरंग होता. काळा कुठं अंधार, कसं बस वर निघालो. समोर खोल दरी होती, त्यावरून जायला लाकडी पूल, खूप भीती वाटत होती. त्यावरून जाताना पूल मोडला तर अशा विचाराने अंगावर काटा आला.

दोन ते अडीच किमी वर चढलो. आजूबाजूला पाहिलं तर दूर दूर पर्यंत पर्वत, दाट झाडी, निसर्गरम्य वातावरण फार छान वाटत होतं. वाटेत प्रत्येक इमारतीच्या पायथ्याशी एका दगडावर माहिती लिहिलेली होती. किल्ल्याच्या शिखर इमारतीवर. एक प्रचंड मोठी तोफ होती. तेव्हा फोन नसल्यामुळे फोटो वगैरे काही काढले नाही. फक्त पायथ्याशी एक ग्रुप फोटो घेतला. शिखर इमारतीवर बसून निसर्ग अवलोकन करत होतो. सर इतिहास सांगत होते पण मन निसर्गात रमत होते. इथून बऱ्याच लांब अंतरापर्यंत नियंत्रण ठेवता येत असावं.

हा माझ्या जीवनातील सर्वोत्तम दिवसा पैकी एक दिवस होता. ते ठिकाण, ते दृश्य, ते मित्र, ती मजा खूप भारी वाटत होतं. त्या वातावरणात तासभर बसलो, एकांत होता, शांती होती. थोडी विश्रांती घेतली. आता तहान लागली होती, पाय हळूहळू किल्ल्याच्या पायथ्याकडे वळू लागले. सायंकाळची शांतता होती. आकाश लालसर झाले होते. थंड वाऱ्याची झुळूक येत होती. थकल्यामुळे झोपावेसे वाटत होते पण झोप येत नव्हती. मनात किल्लाच फिरत होता. पुन्हा पुन्हा हाक देत होता.

आता उत्साह कमी झाला. मन स्थिर झाले. गाडी वेगाने परतत होती. रात्र होती, त्यामुळे वाहनांचे शहरातील दिवे चमचमत होते. एखादे शहर आले की दिव्यांचा झगमगात दिसत होता. घरी पोहोचलो. पोहोचलो खरा पण मन तेथेच अडकून राहिले होते.

***

# माझा गोवा प्रवास

**–सुप्रिया शेषेराव गजभारे,** बी.ए.प्रथम वर्ष

प्रत्येक प्रवासात काही ना काही आठवणी तयार होतात. परंतु प्रवास असे असतात की जे आयुष्यभर अविस्मरणीय राहतात.

प्रवासाने दैनंदिन कामाचा सर्व थकवा व चिंता दूर होऊन आनंदाची प्राप्ती होते. सुंदर निसर्गातील प्रवास आरोग्य आणि बुद्धीला चालना देते. मागील वर्षी दैनंदिन कामाला ब्रेक लावून गोवा फिरायला जाण्याचे ठरवले. गोव्याचा हा प्रवास. अतिशय रोमांचक आणि मनोरंजक होता. गोवा प्रवासाची सुरुवात रेल्वेने झाली. रेल्वेचा प्रवास माझ्यासाठी नेहमी मनोरंजक ठरला आहे. उन्हाळ्याच्या सुटयामध्ये दरवर्षी रेल्वे प्रवास करीत. मी माझ्या गावी जायचो. यावर्षी देखील रेल्वेचा देखील प्रवास करण्याची संधी होती. परंतु ती मामाच्या गावी नसून तर निसर्ग सौंदर्याने नटलेल्या गोव्याला जाण्यासाठी होती.

या प्रवासात माझ्यासोबत आई–वडील आणि मोठी बहीण आणि माझे भाऊ होते. मी खिडकीकडील सीट सांभाळले. अन् हळूहळू करत रेल्वे सुरू झाली. आता रेल्वेने गती धरली होती. रात्रीची वेळ असल्याने बाहेरचे दृश्य काही खास दिसत नव्हते. म्हणून आम्ही गप्पा मारण्याचा निर्णय धेतला. माझी दिदी, भाऊ दोघेही आणि मी सर्वात वरच्या बर्थवर जाऊन बसलो. आम्ही अंताक्षरी खेळण्याचे ठरवले. एक–एक जण गाणी म्हणू लागलो. आमच्या रेल्वे डब्ब्यात आमच्या शिवाय कोणी नव्हते. टीसीच्या म्हणण्यानुसार ह्या कुटूंबाने आमच्या डब्ब्यात सीट बुक केली होती, त्यांनी आपली बुकींग ऐनवेळी कॅन्सल केली. रेल्वेच्या डब्ब्यात आम्हीच असल्याने कोणीही रोकटोक करणारे नव्हते. आम्ही गोव्याला ६ दिवस राहिलो. यानंतर पुन्हा त्याच रस्त्याने प्रवास करीत पुण्याला आलो.

***



# छ. संभाजीनगर माझा अविस्मरणीय प्रवास

**– सोनसळे प्रांजली,** बी.ए.प्रथम वर्ष

दरवर्षीप्रमाणे गेल्या वर्षीही माझ्या कॉलेजची सहल जाणार आहे असे सरांनी आम्हाला १५ दिवस अगोदर सांगितले होते. तसेच सहल जाणार म्हटल्यावर आम्ही सर्व मित्र–मैत्रिणी खूप आनंदित झाले होतो. तसेच आम्ही सर्वांनी सहलीला जाण्यापूर्वी तयारी करू लागलो होतो. तसेच मला गेल्या वर्षीची सहल माझ्या डोळ्यासमोर येत होती. अखेर सरांनी आम्हाला दिनांक व वेळ सांगितली. तेव्हापासून आम्ही सर्वजण सहलीला जाण्याच्या गप्पागोष्टी सतत चालू होत्या. तसेच सहलीला जाताना कोणकोणत्या वस्तू सोबत घ्यायच्या, त्याची यादी सुद्धा करून ठेवली होती. सर्वांनी आपापल्या वस्तू आपापल्या बॅगेत ठेवून घेतल्या होत्या. जसे की, आम्ही सर्वांनी सहलीला जाताना बॅग, कॅमेरा, औषधी, बॉटल, डब्बा, नोंदवही इ. साहित्य सोबत घेतले होते. तसेच सहलीला जाण्यासाठी सरांनी बस बांधली होती. तर मुली व मुलांसाठी स्वतंत्र बस केली होती. तर आमच्या सोबत सर, मॅडम आले होते. सहलीच्या आधीच्या दिवशी आम्हाला झोप सुद्धा येत नव्हती.





आमच्या सर्वांना असे वाटत होते की, उद्याचा दिवस कधी उजाडेल आणि आम्ही सर्वजण आतुरतेने वाट पाहत होतो.

अखेर सहलीचा दिवस उजाडला मी व माझे वर्गमित्र, मैत्रिण सर्वजण मैदानात जमा झालोत. सर्वांनी सहलीला नेण्यासाठी सामान व्यवस्थित बॅगेमध्ये ठेवून घेतले होते. मग सर्वजण आमच्या शाळ्यच्या प्रांगणात किंवा मैदानात सर्वजण एकत्रित जमा झालो. तसेच आम्हाला सोडण्यासाठी आमचे आईवडील आले होते. एकाएकाने आम्हाला बसमध्ये बसविले.

आमची बस सहलीच्या वाटेने निघाली. सहलीला जातेवेळेस आम्ही सर्वजण गाणे ऐकत, म्हणत जात होतो. गप्पागोष्टी करत होतो. कसा वेळ गेला काहीच कळाला नाही. आणि आम्ही छ.संभाजीनगरमध्ये प्रवेश केला. संभाजीनगरमधील सर्व पर्यटन स्थळे आम्ही पाहू लागलो. तेथील आम्ही पाच पर्यटन स्थळ पाहिले होते जसे की, छत्रपती शिवाजी महाराज म्युझियम, अजिंठा–वेरूळ लेणी, दौलताबाद किल्ला, जायकवाडी धरण हे आम्ही सर्व ठिकाण पाहिले होते. छ.संभाजी नगरमधील ऐतिहासिक वास्तू पाहून आम्ही आमच्या नोंदवहीत टिपण केले होते. तसेच जसजसे आम्ही हे क्षेत्र पाहत जाऊ तसतसे सर आम्हाला याविषयी माहिती सांगत होते.प्रामुख्याने या लेण्या बौद्ध लेण्यासाठी जगप्रसिद्ध आहेत.

या सर्व लेण्या दगडामध्ये कोरलेल्या होत्या. सर्वप्रथम आम्हाला सरांनी ग्रुप करून ते पाहण्यास सांगितले होते. जाण्याआधी सरांनी आम्हाला विविध सूचना सांगितल्या होत्या. मी आणि माझ्या सर्व मैत्रिणी पाहण्यास निघालो. तेथील विविध वस्तू, मूर्ती, शिलालेख व ताम्रपट पाहिले होते. ते संपूर्ण पाहणे झाल्यानंतर आम्ही सर्वजण एकत्र जमा झालो. तर आमच्यातील एक ग्रुप आला नव्हता. मग आम्ही त्यांना खूप शोधले. सर्व जण आल्यानंतर सर्वांची सरांनी हजेरी घेतली.

काही वेळेनंतर आम्ही सर्वजण जायकवाडी धरण पाहिले. त्याच्या आधी आम्ही सर्व दौलताबादचा किल्ला पाहिला. किल्ल्याची चढाई करतेवेळेस माझ्या मैत्रिणीचा पाय मुरळला व तिला आम्ही औषध आणले होते. तसेच तिच्या पायावर क्रीम लावून तिचा त्रास थोडाफार कमी झाला होता. तसेच काही जणींनी किल्ला

चढतेवेळेस खूप मजामस्ती केली होती. हे झाल्यानंतर एका मैत्रीणींची तब्येत अचानक बिघडली व आम्ही सर्वांनी तिला दवाखान्यात नेले. काही वेळानंतर तिची तब्येत बरी झाली. तब्येत चांगली झाल्यानंतर आम्हा सर्वांना बरे वाटले होते. तसेच आम्ही सर्व ठिकाण पाहिंल्यानंतर आम्ही सर्वजण परत निघालो होतो.

सहलीवरून परत येते वेळेस आम्ही खूप मस्ती, मजा, सहलीचा आनंद घेऊ लागलोत. जरी सर आमच्या सोबत होते तरी ते सर वाटलेच नाहीत. जेव्हा आम्ही सहलीला जायचो, तेव्हा आमच्या सोबतचे सर म्हणून वाटायचे नाही तर ते आपल्यातीलच आहेत असे आम्ही सर्वांनी अनुभवले.

आम्ही सहलीतून परत महाविद्यालयाच्या प्रांगणात जमा झालो. जातेवेळेसचा आनंद व परत येतेवेळेसचा आनंद यांच्यात खूप साम्य होते. आम्ही परत आल्यानंतर सरांनी पुन्हा हजेरी घेतली. हजेरी झाल्यानंतर आम्ही सर्वजण आपापल्या घरी गेलोत.

***

---

## माझं आजोळ

**–उगले विद्या गणेश,** बी.ए.प्रथम वर्ष

आपल्या जीवनातील एखादी अशी घटना घडून जाते जी आपण जीवनभरासाठी लक्षात ठेवतो. ती कधीच आपण विसरत नाही. तो प्रवास असू शकतो किंवा कोणती घटना नाही तर कोणती आनंदाची गोष्ट सुद्धा असू शकते. एखादी अशी घटना जीवनात घडून जाते ज्याचा आपण विचार सुद्धा केला नसतो. तेव्हा माझे बालपण अवस्थेत मी असे. माझा कधी न विसरणारा प्रवास हा जालना जिल्हा व नांदेड जिल्ह्यामधला होता. दिवाळी हा वर्षातील सर्वात मोठा सण म्हणून भारतात साजरा केला जातो. नोव्हेंबर महिन्यात रेल्वे, बस येथील मोठ्या प्रमाणात गर्दी असते. तसेच माझ्या बालपणीच्या काळात मी सात वर्षाची असताना नोव्हेंबरचा महिना होता. भक्कम सर्दीचा काळ असे.

मला माझ्या आजीचा लळा जास्त असे. आजी ही माये–ममतेची सावली असते. मैत्रिणीसारखे कधी आई सारखे तर कधी आपल्यासोबतच ती पण लहान मुल बनून खेळते. माझ्या जीवनातील पंधरा वर्षे मी माझ्या आजीच्या माये ममतेत घातले.

आजीला अचानक तिच्या भावाची आठवण झाली, भाऊबीज जवळ येणार आहे, पांडुरंग भाऊला भेटून येऊ का? असे आजीने आजोबाला विचारले. आजोबा म्हणाले, 'हो, जा जाऊन ये' परंतु आजीशिवाय एक दिवस सुद्धा राहवत नसे, आजीला मी म्हणाले, 'आजी, मी पण येते'. परंतु आजोबा म्हणाले, 'रेल्वेला एवढी गर्दी असते, कुठे हरवलीस तर तुझी आजी म्हातारी आहे, कोठे शोधेल तुला'. मी म्हणाले, 'मी




काहीच गंमत नाही करणार, शांततेने एका ठिकाणी बसून राहील.' परंतु मला कुठे माहीत होते, खरी गंमत तर प्रवासात सुरू होणार आहे. आजोबा म्हणाले, 'बरं जा, एवढंच जाण्याची इच्छा होत आहे तर' आजी आणि मी आम्ही दोघी कपडे वगैरे आवरून पिशवी बांधत होतो. बाबा आले आणि म्हणाले, 'उद्या सकाळीच रेल्वे आहे, लवकर निघावे लागेल.' मला एकाच गोष्टीची भीती वाटत असे, आम्ही वेळेवर रेल्वेत बसावं आणि जागा भेटावं. जातांना तर आरामाने जागा मिळाली होती.

सकाळचा थंड गारवा आणि रेल्वेत बसण्याचा आनंद माझ्या मनाला बागबाग करी. तसेच आजीसमोर आपल्या गंमतीने खाण्यासाठी जिद्द करणे ही बालपणीची वेगळीच मजा होती. रेल्वेत खिडकीजवळ बसून माझी छोटी पिशवी खिडकीला अडकवून ठेवली होती. थंड हवेच्या धुक्यात ती पिशवी कधी उडून गेली मला स्मरणात आलेच नाही. आजूबाजूच्या बायका मला उठवित म्हणाल्या, 'ऐ बाई उठ, तुझी पिशवी खिडकीमधून उडून गेली' आजी झोपेत होती. मी घाबरून आचंबित होऊन बघितले तर पिशवी नव्हती. माझ्या मनाला खूप वाईट वाटले. आजी काही रागावली नाही. कारण त्या पिशवीत माझ्या वैयक्तिक वस्तू होत्या.

आम्ही नांदेडला पोहोचलो. परंतु माझे मन त्या उडून गेलेल्या पिशवीत होते. मग आजीने मला नवीन पिशवी घेऊन दिली. त्यातील तशाच वसतू परत नवीन घेऊन दिल्या. आजीने माझ्या मनातील गोष्ट जाणून घेऊन माझ्या मनाला शांत केले. आम्ही बोलत बोलत आजीच्या माहेरी पोहोचलो. दोन दिवस मजेतच गेले. दिवाळीचे खाऊ खाऊन मन प्रसन्न होऊन गेले. निघायचा दिवस उजाडला.

आम्ही रेल्वेची वाट बघत नांदेडच्या स्टेशनवर बसलो होतो. काही वेळेने रेल्वेचा आवाज ऐकू आला व रेल्वे आली. आम्ही रेल्वे थांबण्याची वाट पाहत होतो. रेल्वे थांबली होती. आम्ही जागा शोधू लागलो. जागा तर मिळाली होती, पण त्याच वेळेला एक अचंबित घटना घडली. मी व माझी आजी रेल्वे

जालनामार्गे निघण्याची वाट बघत होतो. त्याचवेळेस मी आजीला खाऊ पाहिजे म्हणले. आजी म्हणाली, मी स्टेशनवर उतरून तुझ्यासाठी काही तरी आणते. आजी खाली उतरली (स्टेशनवर) मला वाटले रेल्वे आणखी अर्धा तास थांबेल. परंतु हे काय, रेल्वेचा मोठा आवाज आला. तसेच तिची निघण्याचा वेळ झाला आहे असे मला ऐकण्यात आले. आता काय माझ्या इवलासा जीव जागेवरच नाही राहत होता. मी खूप घाई करू लागले. माझ्या मनात हाच विचार येत होता की, माझी आजी येईल की नाही. आजी जर नांदेडच्या स्टेशनवर राहिली तर मी एवढं सामान घेऊन कसं उतरू. एवढ्या मोठ्या प्रवासात मी एकटी कसं राहू. हा विचार माझ्या मनात सतत चालू असे. परंतु हे काय, रेल्वे निघाली. माझी ओरड सुरू झाली. आजी, ऐ आजी. कुठे आहेस लवकर ये. असे बोल माझ्या तोंडातून येऊ लागले. गाडी हळूहळू चालू झाली आणि आजीचा पत्ताच नाही. मी एवढी लहान की मला खाली उतरता सुद्धा येत नाही. तेथील बायका घाबरल्या आणि म्हणाल्या, ऐ पोरी, रेल्वेतील दारापासून आत ये. बाहेर उडी मारल्यावर पोलिस आम्हालाच आत टाकतील, असे म्हणत त्या बायका अचंबित होऊन बघू लागल्या. परंतु माझं पूर्ण लक्ष माझ्या आजीकडे होते. तेथील एक भगवा पटका घालून एका व्यक्तीने विचारले, काय झालं बेटा, तू का इथे थांबून रडत आहेस. मी म्हणाले, 'माझी आजी स्टेशनवरच राहिली आहे.' त्यांनी काही विचार न करता रेल्वेची चैन खेचली आणि रेल्वे थांबवली. मी माझ्या आजीचा फोन नंबर विसरले. परंतु स्टेशनवर उतरून मी फोन लावू लागले की तेथून रेल्वे सहकारी आलेत व मला म्हणू लागले, 'एका मुलीमुळे चैन खेचावी लागली, आमचा विनाकारण वेळ वाया गेला.' मी त्यांची ही गोष्ट ऐकून अचंबित झाले आणि हा विचार माझ्या मनात रूजत होता. या सहकार्यांचे काम आहे अशा वेळेला सहकार्य करून मदत करावी, परंतु हेच सहकारी माझ्या सारख्या एवढ्या छोट्या मुलीला एवढं वाईटपणाने बोलत आहे. मी हा विचार करत करत आजीचा फोन नंबर आठवून ते भगवा फटक्यावाल्या व्यक्तीच्या फोनवरून आजीला फोन लावत होते. नंतर मला कळाले की, आजी रेल्वे चालू झाल्यावर गडबडीत दुसऱ्या रेल्वेच्या डब्ब्यात चढाली व मी स्टेशनवरच उतरले. तेव्हा आजी पुढच्या स्टेशनवर उतरून परत नांदेडच्या स्टेशनला आली. मी लांबून आजीला पाहताच माझ्या डोळ्यांचे अश्रू थांबत नव्हते. आजीने माझ्याकडे पाहून डोळ्यातील चिंबपणा आणून मला तिच्या कुशीत घेतले. आम्ही खूप वेळापासून हाच विचार करत होतो की, जर आजीपासून मी कोणत्याही कारणाने लांब झाले असते तर माझ्या जीवनात किती मोठा बदल घडला असता. त्या काळात माझी आजी माझ्यासाठी माझे जीवनातील सर्वात महत्त्वाची व्यक्ती होती. पण आता ती या जगात नाही.

***

# माझा निसर्ग प्रवास

–सुपेकर दुर्गेश्वरी, बी.ए.प्रथम वर्ष

प्रवास म्हटला की मन कसे आनंदी होते. त्या प्रवासाला जात असताना लागणाऱ्या सर्व सामानाची यादी करणे व त्या वस्तू आठवणीने न चुकता अगदी काळजीपूर्वक त्या त्या सर्व गोष्टी आपण बॅगेत भरत असतो. प्रवासाला जात असताना सुद्धा आपण आपल्या आरोग्याची काळजी घेत जेवढे होईल तेवढे घरचे जेवन सोबत नेण्याचा प्रयत्न करीत असतो. प्रवासात जास्तीत जास्त आपण आपले मनोरंजन कसे होते किंवा आपला वेळ कसा छान जातो व ते सर्व आपण अगदी आनंदाने ते क्षण जगत असतो. प्रवास करत असताना प्रत्येकाला घरातील सर्व व्यक्तीची किंवा आपल्या मित्रमैत्रिणींची सोबत असेल तरच तो प्रवास अविस्मरणीय ठरतो. तसेच प्रत्येक प्रवासात आपण नवनवीन गोष्टी शिकत असतो. एखादा तरी असा प्रसंग असतो की तो आपण उभ्या आयुष्यात विसरत नाही. तो प्रसंग आपल्याला त्या प्रवासाचे सतत आठवण देत असतो. असाच एक प्रवास माझ्या देखील आयुष्यात ठरलेला आहे. तो प्रवास मी कधीही न विसरता येणारा आहे.

१४ ऑक्टोबर हा दिवस होता. या दिवसामध्ये अवकाळी पावसाने धुमाकूळ घातलेला होता. पण अशा या वातावरणात कोकणामध्ये प्रवास करण्याची किंवा कोकणाजवळील भागात प्रवास करण्याची मज्जाच वेगळी असते. ते निसर्गरम्य दृश्य, सगळीकडे हिरवीगार झाडे, डोंगर, पाण्यांनी भरलेली नदी, तलाव हे सर्व पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत असते. तसेच आम्हीही कोल्हापूर, पन्हाळा, शिखर शिंगणापूर व पंढरपूर अशा महाराष्ट्रातील ठिकाणी गेलो.

सुरुवातीला आम्ही निघालो तेव्हा एक–दोन तास झाला. आमच्या गाडी चालकाने गाडी थांबवली. मग आम्ही जेवण केले. मग आम्ही आमच्या मुख्य प्रवासाला सुरुवात केली. त्यानंतर आमची गाडी शिखर शिंगणापूरच्या जवळ पोहचली. तेव्हा आम्ही परत एकदा



जेवणासाठी उतरलो. शिखर शिंगणापूरला जाण्यासाठी आम्हाला रात्रीचे दोन वाजले होते. तेव्हा आम्ही तेथे पोहोचलो. त्या वेळी आम्ही सर्वजण एकत्र होतो. परंतु आम्हाला राहण्यासाठी कोणत्याही जागेची सोय होत नव्हती. आम्ही राहण्यासाठी जागा शोधत होतो. कारण आम्हाला देवाचे दर्शन करायचे होते व ते सकाळी होणार होते. त्यामुळे मग थोड्याच वेळेत तेथे एका घरामध्ये आम्हाला जागा मिळाली. आम्ही सगळे गेलो. मग आम्ही सकाळी लवकर उठून दर्शन वगैरे केले. मग आमचा पुढचा प्रवास सुरू झाला.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा किल्ला पन्हाळ्याकडे निघालो. पन्हाळ्याला जात असताना तेथील वेळेचे बंधन होते. त्यावेळी आम्ही आमची एक गाडी पुढे व दुसरी मागे होती. परंतु काही कारणास्तव आमची मागची गाडी चालकाने थांबवली व आम्ही जे पुढच्या गाडीत होतो ते सर्वजण पुढेच गेलो. मग आमच्या दोन्ही गाड्यांची चुकामूक झाली. त्यावेळी कोणालाही काहीच समजत नव्हतं. कारण पन्हाळा हा किल्ला छोटा नाही तो खूप मोठा आहे. मग आम्ही मोबाईलवर त्या गाडी चालकाला आमचा चालू पत्ता दिला मग कुठे तो आमच्याजवळ पोहचू शकला. त्यावेळेस सगळेजण घाबरलेले होते. परंतु गाडी चालकाने धैर्याने आम्हाला आमच्या घरच्याशी भेट करून दिली.

त्यानंतर आम्ही गोव्याच्या दिशेने निघालो. आम्हाला गोव्याला जात असताना रात्र झाली होती. जेव्हा आम्ही अंबोलीपर्यंत आलो तेव्हा खूप अंधार झाला होता. आणि गोव्याकडील रस्ते हे एका बाजूने दरी व एका बाजूने डोंगर असे उंच होते. आम्ही अंबोलीच्या घाटाजवळ आलो. ३ कि.मी. अंतरावर डोंगर कोसळला आहे व मग हा मार्ग बंद करण्यात आला. त्यामुळे आम्हाला तेथेच थांबावे लागले. किती वेळ आम्ही तिथे थांबलो. मग ते त्या रस्त्यावरच बाजुला करण्यात आले.

आम्ही दोन गाड्यामध्ये असल्यामुळे जरा जास्त काळजी घेण्याची गरज होती. आमच्यामधील दोन–तीन गाड्यामधील एका गाडीवर अगदी वरून दगड कोसळला व तिथे त्या गाडीतील व्यक्तींना खूप दुखापत झाली आणि काही जीवन मरणाच्या दारात उभे होते. हा प्रसंग खूप वाईट होता आणि आम्ही त्याच्यासाठी काही नाही करू शकलो, याची खंत मात्र आजही मनात आहे. आणि ती राहील. त्या ठिकाणी जर आम्ही असतो तर... असा विचार जरी आला तरी मन अस्वस्थ होते. त्या दिवशी आम्ही आमच्या समोरच्या गाडीतील व्यक्तींना पाहूही शकलो नव्हतो. त्याचा त्रास जास्त होत होता. दुसऱ्या दिवशी जेव्हा आम्ही सर्वजण एकत्र आलो, तेव्हा सगळे घाबरलो होतो आणि ते रडत होते. या अवस्थेत आम्ही होतो. मग आम्ही माघारी येण्याचा निर्णय घेतला व आमच्या घरी परत आलो. परंतु या प्रवासात आम्हाला घडून गेलेल्या गोष्टीचा विचार मात्र डोक्यातून जात नव्हता. कारण ते स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेले दृश्य काही जात नव्हतं. तेच आपल्यासोबत घडलं असतं तर हा सुद्धा विचार जात नाही. हा आमच्या आयुष्यातील खरंच अविस्मरणीय प्रवास आहे, असे म्हणण्यास काहीच हरकत नाही.

***

# रायगडावरील आठवणी

**–मयुरी पुयड,** बी.ए.प्रथम वर्ष



प्रत्येक व्यक्ती ही प्रवास करत असतो. पण काही प्रवास आपल्या आयुष्यातले असे असतात जे आपण कधीच विसरत नाहीत. याचप्रमाणे माझ्या पण आयुष्यातील एक अविस्मरणीय प्रवास आहे, जो मी कधीच विसरणार नाही. आमच्या शाळेतील शैक्षणिक सहल निघाली होती. सुरुवातीला आम्ही खूप खुश होतो. कारण आम्ही रायगड किल्ला पहायला जाणार होतो. आमची सहल सकाळी लवकर निघणार होती. आणि आम्ही सगळ्यांनी सहलीला जायचे म्हणून पूर्ण तयारी करून ठेवली होती.

आमची सहल निघाली आणि आम्ही गाडीत बसलो होतो. मग इथूनच आमचा प्रवास सुरू झाला. प्रवासात मजा करतच आम्ही रायगडावर कधी पोहोचलो हे आम्हाला कळालेच नाही. आम्ही रायगडावर पाऊल टाकताच असे वाटले की आम्ही स्वर्गातच आलो. त्या दिवशी मला कळालं रायगडला पृथ्वीवरचा स्वर्ग का म्हणतात.

रायगडावर फिरताना मनामध्ये महाराजांच्या एवढ्या आठवणी येऊ लागल्या की त्यांनी केलेले पराक्रम मला डोळ्यासमोर दिसत होते. रायगडावरची हवा मनाला स्पर्श करून जाणारी होती. ज्यावेळेस आम्ही महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले, त्या वेळेस साक्षात महाराजांचे दर्शन घेतल्याचे जाणवत होते. पराक्रमी योद्धे आपल्या आयुष्यात अनेक येतात, पण शिवाजी महाराजांसारखे पराक्रम कुणी पण केले नाही. रायगडाला जमिनीवरचा स्वर्ग उगीच म्हणत नाहीत. कारण हा खरच पृथ्वीवरचा स्वर्ग आहे. आज मनात विचार येत होता की महाराज गेल्यानंतर पूर्ण स्वर्ग त्यांच्या समोर झुकला असेल. आणि रायगडावर वेळ कधी निघून गेला हे कळलेच नाही. आता घरी जायला पण मन वळत नव्हते. पण ती तर शाळेची शैक्षणिक सहल होती ना. मग आम्ही खूप सारे फोटो काढले व पुन्हा एकदा महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले व घराकडे निघालो. आज या गोष्टीला आठ वर्षे झाली, पण असं वाटते की कालच रायगडावर जाऊन आलो. तर हा होता माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रवास.

***

# मराठी विभागाची सहल

**–कांबळे दीपक अंबादास,** बी.ए.तृतीय वर्ष

इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको, नांदेड या कॉलेजमध्ये बी.ए.द्वितीय वर्षाला असताना मराठी विभागाकडून मी चक्रधर स्वामी यांच्या लीळाचरित्राचा अभ्यासाचा एक भाग म्हणून आमच्या मराठी विषयाच्या विभुते व भोपाळे सरांनी क्षेत्र लिंबगाव व नाळेश्वर या ठिकाणी आम्हाला सहलीला नेले. ती सहल तो प्रवास कधीही न विसरणारा आहे. विभूते सर, आमचे आवडते सर, वर्गात शिकवत असताना असं अगदी सोप्या भाषेत व प्रेमाने समजल अशा पद्धतीने शिकवतात. या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि पहिल्यांदा सरांचा क्लास केला. सरांची मराठी विषयावरील आवड, त्यांची शिकवण्याची शैली, त्यामुळे सरांविषयी आणि सरांच्या मराठीविषयी अधिकच रुची निर्माण झाली. सर बऱ्याचवेळा क्लासमध्ये म्हणायचे, तुमची बॅच म्हणजे माझी आवडती बॅच, त्यामुळे आम्हालाही सरांप्रती आपलीशी भावना तयार झाली. तर आम्हाला द्वितीय वर्षात असताना म्हणाले, आपण आपल्या विभागातर्फे बाहेर सहलीला जाऊ. ते पण आमच्याच म्हणण्यानुसार. आम्ही सरांना वर्गामध्ये बऱ्याचवेळा म्हणालो, सरांनी आमचं ऐकलं आणि तृतीय वर्षाला श्री चक्रधर स्वामींचे लीळाचरित्र, महानुभाव पंथाचे साहित्य अभ्यासक्रमाला आहे, त्या कारणाने आपण जाऊत असे म्हणाले.

सरांनी जानेवारी २०२४ महिन्यात आम्हाला म्हणजेच आमच्या वर्गातील सर्वांना श्री चक्रधर स्वामींचे देवस्थान असलेल्या लिंबगाव व नाळेश्वर या ठिकाणी नेणयाचे सांगितले. तो दिवस कॉलेजमध्ये येऊन जवळपास २ वर्षे होत आली होती. मात्र कधीही कुठेही बाहेर गेलो नव्हतोत. पण शेवटी ही इच्छाही पूर्ण झाली. सहलीच्या दिवशी माझ्या वर्गातील मुली गायत्री, प्रांजली आणि माझ्याच वर्गातील आणखी दोन मुली व तृतीय वर्षाला असलेल्या तीन मुली, मराठी विभागातील आमचे दोन सर डॉ. शंकर विभुते सर आणि डॉ. हनमंत भोपाळे सर, आम्ही सर्वजण जायचं ठरलं.

दि.३१ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता जायचं ठरलं असताना कॉलेंजमध्ये ९ पर्यंत बोलावले होते. सर्वांना सकाळी कॉलेजमध्ये पोहोचून मग जायचं होतं. सरांनी त्या ठिकाणी जाण्यासाठी सरांच्याच गाड्या आणल्या होत्या. ठरल्याप्रमाणे आम्ही सर्वजण कॉलेजमध्ये पोहोचलो. एका वर्गात बसून सरांनी सर्वांची उपस्थिती बघितली आणि एक हमीपत्र लिहून घेतले. कॉलेजच्या प्राचार्याकडून परवानगी व कॉलेजच्या काही नियम व अटी पाळावयाच्या म्हणून ही सर्व व्यवस्था केली होती. त्या दिवशी त्यावेळी मला एक मित्र भेटला. तो माझ्यापेक्षा मोठा होता. पण आतापर्यंत तो सोबत आहे. तो मोठा असला तरी तो कधी असं वाटू देत नाही. त्याचा स्वभाव आणि बोलणं त्यामुळे तो माझ्याच वयाचा आणि सोबतचाच आहे असे वाटतो.

सर्व प्रोसेस वगैरे करून झाल्यानंतर आम्ही सर्वजण निघालो. कॉलेजच्या बाहेर आल्यावर जाताना

एक सर्वांची फोटो काढली. मग आम्ही सर्वजण निघालो. डॉ. भोपाळे सर, थर्ड ईअरच्या मुली व ड्रायव्हर काका हे सगळं जण भोपाळे सरांच्या गाडीमध्ये बसले. आम्ही सर्वजण म्हणजेच मी, सर, गायत्री, प्रांजली, प्रियंका आणि त्यांची अजून एक मैत्रीण असे आम्ही सहा जण विभुते सरांच्या कारमध्ये बसलो. विभुते सर आम्हाला मित्रासारखे वागवायचे म्हणून आम्ही सरांच्या गाडीतून येतो असं सरांना म्हणालो.

थोड्याच वेळात आम्ही सगळे जण निघालो. माझे मित्र कॉलेजमधून आम्हाला जाताना पाहत होते. ते यायला तयार होते, पण ते शक्य नव्हतं. आमची ही सहल फक्त मराठी विभागातर्फे असल्याने फक्त मराठीच्याच विद्यार्थ्यांना यायला जमत होतं. त्यांनी वेगवेगळ्या विभागाचे होते, त्यामुळे त्यांना यायला जमलं नाही.

आम्ही सगळेजण जायला निघालो. गाडीतून बसून आम्ही कॉलेजपासून थोडंसं अंतरावर जायच्या रस्त्यावर आलो व विभुते सरांना काम असल्यामुळे रस्त्याच्या शेजारी गाडी थांबवून तिथेच थांबलो. सरांनी आम्हाला गाडीमध्ये गाणी लावणे, डान्स करणे, मजा करणे यासाठी पूर्ण सूट दिली होती. मात्र सुरुवातीला आम्हा सगळ्यांना सरच्या गाडीतील ब्ल्यूटुथ कनेक्ट करायलाच खूप जाम अडचणी झाली. कसं बसं करून ते कनेक्ट झालं आणि मग लावली मुलींनी गाणी. मुलींच्या आवडीची गाणी मराठी गाणी. ऐकायला पण छान वाटत होती. मी कधी अशी गाणी ऐकलो नाही, कारण मी कधी मराठी गाणे ऐकली नव्हती. त्यावेळी मी मनाला म्हणालो, मराठी गाणी पण अशी ऐकायला असतात का, तेव्हा मला माझं उत्तर मिळालं.

थोड्या वेळानं आम्ही निघालो. महाविद्यालयातून, सिडको ते लातूरकडे जाताना नांदेडमधला असलेला चौक, लातूर फाटा, तेथून परभणी, वसमतकडे जाणारा मार्ग यावरून वाघी, सुगाव, आणि मध्येच दोन चार गावे होती, ती करत करत आम्ही पहिले लिंबगाव येथील श्री चक्रधर स्वामींच्या मंदिरात जायचं होतं आणि येताना नाळेश्वरला यायचं असं ठरलं होतं. त्याचप्रमाणे आम्ही सुरुवातीला नाळेश्वरला न जाता लिंबगावला गेलो. वाटेत येताना आम्ही गाडीमध्ये गाणी लावली. सर गाडी चालवत होते. सर्वजण गाणी ऐकत मजा करत करत जात होतो. नांदेड शहराच्या बाहेर आलो आणि वसमत परभणीकडे जाणारा सिमेंटचा मार्ग/रस्ता संपला. आणि डांबरी रस्ता सुरू झाला. काही अंतरावर परत डांबरी रस्ता संपला व सिमेंटचा रस्ता सुरू झाला. नंतर पुन्हा सिमेंट रस्ता संपून डांबरी रस्ता सुरू झाला. अशाप्रकारे रस्त्याचा हा एक संपला की दुसरा, अशा कामामुळे थोडंसं विनोदाचा भाग वाटला. पण आम्हाला याच रस्त्याने जावं लागणार होतं. वाटेत जाताना गोदावरीवरील पुलावरून आम्ही पालेभाज्यांची शेती बघितली. ती पूर्णतः नदीच्या पाण्यावर अवलंबून होती. पण नदीचं पाणी हिरवं झालं होतं. ते दूषित होतं. त्याचाच वापर या शेतीसाठी केला जात होता. आणि तेच पालेभाज्या शहरात पाठवल्या जातात. काही वेळाने आम्ही एका उसाच्या कारखान्यापासून जात होतो. तेथे रस्त्याच्या बाजुलाच उसापासून भट्टीमधून गुळ बनवला जात होता. त्यामुळे त्यापासून निघणाऱ्या मळीचा वास येत होता.

त्या भागातील शेतीत ऊसच होता. ऊसाबरोबरच केळीच्या बागाही होत्या. आम्ही हिवाळ्यात गेलो असल्यामुळे गहू व हरभरा आणि इतर रब्बी हंगामातील पिकांचे प्रमाण शेतीत पाहावयास मिळू लागले. तिकडची जमीन नदीकिनारी भागात काळी होती. तर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस लाल माती होती. असे असले तरीही संपूर्णतः शेती लागवडीखाली होती आणि हिरवीगार शेती होती. आमच्याकडे पावसाळ्यात अशा प्रकारची हिरवीगार शेती पहावयास मिळते. रब्बी हंगामात काही ठिकाणीच जिथे पाण्याची उपलब्ध आहे, तिथे रब्बी पिके घेतात. घराच्या समोर शेतीला जोडधंदा म्हणून दूग्धव्यवसाय, त्यासाठी घरासमोरील गोठ्यात गाय, म्हशी दिसत होत्या. त्यामुळे तो आर्थिकदृष्टया बरा होता. मी हे सगळं आजूबाजूचं बघत होतो. सरांना सांगत होतो. अशा प्रकारची हिरवी शेती नांदेड जिल्ह्यात अर्धापूरकडे पाहवयास मिळते. तिकडे बारामाही शेती हिरवीच असते. पण एक गोष्ट या शेतीत आश्चर्यासारखी होती. रस्त्याच्या एका बाजूला शेतीतील माती काळी होती तर रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला माती लाल होती. जणू हा रस्ता म्हणजे या दोन मातीतील सीमारेषा आहे, असं वाटत होतं. नंतर असंच आम्ही पुढे पुढे गेलो. मुली गाण्यांच्या नादात होत्या. नंतर प्रांजलीने एक छान मराठी गाणं लावलं. अधीर मन झालं, हे गाणं ऐकायला एकदम छान वाटत होतं. काही वेळासाठी आजूबाजूचं पाहणं सगळं बंद करून ते गाणं ऐकलं. मग थोड्याच वेळात आम्ही नाळेश्वरला पोहोचलो व तसंच पुढे लिंबगावला गेलो. मुख्य रस्ता सोडून आम्ही १ किमीच्या आसपास आम्ही आत गेलो व तेथील देवस्थानी पोहोचलो.

सर्वजण गाडीमधून उतरून आपापल्या बॅग घेतले आणि मंदिरात गेलो. आम्ही येणार आहोत, अशी अगोदरच सरांनी तेथील मंदिरातील लोकांना कल्पना दिली होती. आम्ही सगळेजण आत गेलो. गाभाऱ्यात जाऊन दर्शन घेतले. गाभाऱ्यात श्री कृष्ण व चक्रधर स्वामींची मूर्ती होती. मंदिराचं बांधकाम देखणं होतं. दर्शन घेऊन आम्ही तिथंच मंदिरात बसलो. तेथील पुजाऱ्यांनी तेथे मंदिराची स्थापना का झाली, कधी झाली याची माहिती दिली. श्री चक्रधर स्वामी मध्ययुगीन काळात ज्यावेळी फिरत होते, त्याकाळी ते या ठिकाणी आले होते. त्यामुळे त्यांची लीळा, त्यांची आठवण म्हणून येथे या मंदिराची स्थापना झाली असे त्यांनी सांगितले. श्री चक्रधरांनी महानुभाव पंथाची स्थापना केली व त्याचा प्रचार व प्रसार जनसामान्यांपर्यंत केला. त्यांच्यामुळे महानुभाव पंथ लोकप्रिय झाला. म्हणून त्यांना महानुभाव पंथाचे वास्तविक संस्थापक असे म्हटल्या जाते. त्यानंतर त्यांनी आणखी काही चक्रधर स्वामींच्या लीळा सांगितल्या. नंतर आम्ही सर्व तेथेच एका बाजूला असलेल्या हॉलमध्ये बजावून बसलो. भोपाळे सरांनी व विभुते सरांनी महानुभव पंथ व चक्रधर स्वामी यांच्याबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर आम्ही जेवायला बसलो. सर्वांनी आणलेले आपल्या आपल्या घरून डब्बे सर्वांचे एकाजागी करून पंगत बसून जेवण केलो. नंतर आम्ही तिथेच थोडा वेळ बसलो. आम्ही सगळ्यांनी आमच्या मोबाईलमध्ये खूप फोटो काढले. बाजूच्याच शेतातील हरभरा खाल्लो. मज्जा मस्ती करत तेथे वेळ घालवला.

नंतर दुपारनंतर सगळेजण निघालो. तेथून आम्ही नाळेश्वरला आलो. तिथेही श्री कृष्णाचे मंदिर होते. दर्शन घेऊन थोडावेळ मंदिरात बसलो. मग सगळेजण बाहेर आलो. मंदिराच्या मागे आंब्याची झाडे होती. त्या खाली एक बाज होती. त्यावर काहीजण बसलो. तेथेच एक बैलजोडी होती. त्यावर तृतीय वर्षाच्या मुली बसलेल्या होत्या. त्यांना झाडावर साप दिसला. त्या घाबरून तेथून उठून पळाल्या. पण बाकी कोणालाही झाडावर साप दिसला नाही. कैऱ्या मात्र दिसल्या. आंबट आंबट कैऱ्या खायला आलेल्या सगळ्यांनी होईल तेवढ्या खाल्ल्या. सर म्हणाले होते, कोणीही कैऱ्या वगैरे तोडू नका, सगळे शांत बसा, पण मांजराच्या समोर दूध उघडे ठेवले आणि तिला पिऊ नको म्हटलं तर ते शक्य होईल का? अगदी तसंच आम्ही सगळे थोडा वेळ स्वतःला आवरलो. नंतर मात्र मन आवरेनासे झालं. आणि कैऱ्या खाल्ल्या. बराच वेळ कैऱ्या खात, गप्पा मारत, बोलत त्या झाडाखाली बसलो होतोत, नंतर आम्ही निघालो.

दिवसभर फिरूनही मज्जा करून घराकडे जावं वाटत नव्हतं. तिकडेच छान वाटत होते. पण घराकडं येणं भाग होतं. आम्ही सगळेजण कारमधून घराकडे यायला निघालो. गाडीमध्ये गाणी ऐकत, मुली नाचत होत्या. असंच चालू असताना आम्ही एका बालाजी मंदिरापाशी पोहोचलो. सरांना तिथे जायचं म्हणालो, सरांनी ऐकलं व सगळे तिथं गेलो. मंदिरात जाऊन दर्शन घेतले. बालाजीची एक भव्य देखणी मूर्ती होती. बाहेरच केळीची झाडं होती. दर्शन करून बाहेर आल्यानंतर सगळ्यांनी सरांसोबत फोटोज काढले. मुली त्यांच्या फोटोज काढण्यात मग्न होत्या. इथे रम्य वातावरण होतं. शांत वाटत होतं. थोडा वेळ या ठिकाणी सरांसोबत गप्पा मारत बसलो. दिवसाच्या शेवटी सर्वजण थकलो होतो. थोडावेळ या ठिकाणी आराम केला. मग निघताना फ्रेश झालो आणि परत यायला निघालो. कॉलेजमध्ये पोहोचलो. प्राचार्य सरांना कळवलं. जाता जाता सर्वांची मराठी विभागातर्फे सहल म्हणून एक फोटो काढला आणि निरोप घेतला.

***



# लोणावळा आठवणी

**–श्रद्धा गंदेवार,** बी.ए.प्रथम वर्ष

मी मागच्या वर्षी लोणावळ्याला गेले होते. लोणावळ्याला माझे काका असतात. नांदेडहून खोपोलीला जाताना लोणावळा घाट लागतात. मी अख्खा लोणावळा स्कुटीवर फिरले ते पण काकांसोबत ट्रिपल सीट. लोणावळाचे घाट एवढे डेंजर असतात, गाडी चालवताना पूर्ण लक्ष ठेवून गाडी चालवावी लागते. तिथे जास्त करून अ‍ॅटोचा वापर नाही होत. जास्तीत जास्त बाईक ती पण भारीवाली. त्या घाटामधून पाणी वाहत राहते. निसर्ग स्वर्गासारखा असतो. तिथलं फेमस म्हणजे लोणावळा चिक्की, मिसळ पाव, वडापाव, स्वीटकॉर्न, मॅगी. जाताना सोबत सेल्फी स्टीक, छत्री घेऊन गेले होते. जाताना पाऊस लागला, भिजत गेले, तेथे फिरून तिथली चिक्की खाल्ली. तिथे १२ प्रकारची चिक्की मिळते. मी तीन प्रकारची चिक्की खाल्ली. लोणावळ्याचा काही इतिहास आहे. लोणावळा जास्त करून पर्यटनस्थळासाठी प्रसिद्ध आहे.

लोणावळा शहराजवळ कार्ले लेणी, माजे लेणी, पाटण लेणी, बेडसे लेण या लेण्या आहेत. हे यादव साम्राज्याचा भाग होता. या भागातील किल्ल्यांनी मराठा आणि पेशवा राज्याच्या इतिहासात मोलाची भूमिका बजावली आहे. मुंबई–पुणे महामार्गावर समुद्रसपाटीपासून ६२५ मीटर उंचीवर सह्याद्रीच्या रोन घाटमाळ्यावरील हे ठिकाण थंड हवेसाठी प्रसिद्ध आहे. विपुल वनराई, हिरवीगार निसर्गशोभा, वनश्रीने भरगच्च असलेले डोंगरामध्ये व दऱ्या, पावसाळ्यात कडेलोट होऊन कोसळणारे धबधबे हे सारं काही मनाला खूपखूप सुखद वाटते. पावसाळ्याच्या दिवसात पावसाच्या सरी अंगावर झेलत व ढगांच्या ओलसर धुकट वातावरणात हरवून जाण्यात खूप मजा वाटते. हिवाळ्यात तर धुके लपेटूनच फिरावे लागते. उनहाळ्यात जांभळे व करवंदांची लयलूट असते. लोणावळा आणि खंडाळा या ठिकाणच्या जवळपास पाहण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत.

लोणावळ्याचा इतिहास आहे. लोणावळामध्ये मी टायगर पॉईंट बघितला. टायगर पॉईंट पूर्ण ढगांमध्ये असल्यासारखा आहे. तिथे काही बघायचं म्हटले की वाट बघावं लागते. कारण तिथे पूर्ण धुके आहेत. मी तिथे धावून तिथला घेतला. मन शांत राहते. जसा की दुसरा स्वर्ग, मला टायगर पॉईंट बघायचा होता. ती इच्छा पूर्ण झाली. मी एवढं एन्जॉर्य केला तिथ, सर्व गोष्टीची माहिती झाली. पूर्ण टायगर पॉईंट बघितला. ते बघून झाल्यावर भुशी डॅम बघायला गेले. भुशी डॅम पण तिथे पाय ठेवायला जागा नव्हती. तिथे सांभाळून जावे लागते. तिथे एक घटना झाली, तीन, चार वर्षापूर्वी. पूर्ण फॅमिली पाण्यात वाहून गेली होती. आतापर्यंत कितेक लोक तिथे गायब झाले. तिथला निसर्ग, एवढा छान पूर्ण धुके धुके भुशी डॅमला. हा प्रवास फक्त ५ दिवसाचा होता.

***

# गडावर जाताना

**–दिव्या देविदास आकले,** बी.ए.प्रथम वर्ष

एकदा आम्ही काही मित्र मैत्रिणी शिवनेरी गडावर सहलीसाठी गेलो होतो. गडावर जाण्याचा नेहमीचा मार्ग सोडून आम्ही एका पायवाटेने निघालो होतो. नवनवे रस्ते शोधून काढण्याची माझ्या मैत्रिणींना मोठी हौसच आहे. गप्पांच्या नादात आम्ही खूप चाललो. पण गडावर काही पोहचलोच नाही. खाली पाहिलो तर पायवाटही हरवून गेलो होतो. दिवसही मावळला होता. आता रात्र झाली.आपण रस्ता चुकलो आहोत. या रस्त्याची आम्हाला जाणीव झाली. आमच्या छातीचा ठोका चुकला.

आम्ही एकमेकांचे हात धरले व चाचपडत पुढे जाऊ लागलो. जसजसे पुढे जावू लागलो, तशी झाडी अधिकच दाट झाली. सगळीकडे काळोख दाटला होता. फक्त रानकिड्यांचा कर्रर आवाज ऐकू येत होता. आणि गडावर पोहोचण्याऐवजी एका घनदाट जंगलात पोहचलो होतो.

गाव खूप दूर राहिले होते. आता घरी कसे परतणार, घरचे लोक खूप काळजी करत असतील. त्या जंगलातून गावात निरोप पाठवायलाही काही सोय नव्हती, काय करावे, काहीच सूचत नव्हते. भीतीने घशाला कोरड पडली होती. शेवटी एका झाडाखाली बसलो. काही वेळ तसाच सुन्नावस्थेत गेला.

थोड्याच वेळानंतर आम्ही पुन्हा चालू लागलो. वाटेत एक कुटी दिसली. आत डोकावले तर एक आचार्य आणि त्यांचे काही शिष्य मंत्र पठण करीत होते. आम्ही तेथेच थांबलो. आमची चाहुल लागली म्हणून त्यांनी डोळे उघडले. आचार्यांनी आमची चौकशी केली. आम्हाला बसण्यासाठी आसन दिले. त्यांच्या शिष्यांनी आम्हाला दूध व फळे आणून दिले. ती आम्ही खाल्ली आणि आचार्यांच्या आदेशावरून झोपी गेलो. भल्या पहाटे आचार्यांनी आम्हाला उठवले व आम्हाला घेऊन निघाले. काही अंतर गेल्यावर आचार्य म्हणाले, 'या रस्त्याने जा घरी पोहोचाल.' एवढेच बोलून ते मागे फिरले. हा प्रसंग मी आयुष्यात कधीही विसरणार नाही.

***



# गणपतीपुळे

**–कांचन गणेश लोंढे**

प्रत्येकाच्या जीवनात असे काही अनुभव असतात जे कधीच विसरता येत नाहीत. माझ्यासाठी असा एक अविस्मरणीय प्रवास म्हणजे महाराष्ट्रातील कोकणातील गणपतीपुळेचा होता. हे ठिकाण निसर्गसौंदर्य शांतता आणि अध्यात्मिकतेने ओतप्रोत आहे. या प्रवासाचा प्रत्येक क्षण माझ्या मनात कोरला गेला आहे.

**प्रवासाची सुरुवात :**

आम्ही सहपरिवाराने ठरवलेले होते की या उन्हाळ्याचया सुट्यात एकत्र प्रवास करायला जायचे. मग आम्ही सर्वांच्या सहमतीने गणपतीपुळे हे ठिकाण ठरवले. प्रवासाची तयारी करताना उत्साह तर खूपच होता. प्रवासाची सुरुवात आम्ही नांदेड रेल्वे स्टेशनहून झाली. आम्ही रेल्वेत बसून रत्नागिरी स्टेशनला पोहोचलो व तेथून बसने गणपतीपुळे गाठायचे होते. प्रवासात आम्हाला कोकण रेल्वच्या मार्गावरील निसर्गाचे अप्रतिम दृश्य पहायला मिळाले. दोनही बाजूला हिरवेगार डोंगर, त्यांच्या मधून वाहणारे लहान लहान झरे आणि दूरवर पसरलेली निळी आकाशगंगा हे दृश्य मन मोहून टाकणारे होते.

रत्नागिरी पोहोचल्यावर आम्ही तेथून स्थानिक बस पकडली. आणि गणपतीपुळेच्या दिशेने निघालो. रस्ता जरी वळणावळणाचा आणि अरुंद होता, तरी त्याच्या दोन्ही बाजूला असणारी निसर्गाची सान्निध्यता अवर्णनीय होती. डोंगरावरून खाली दिसणारे अरबी समुद्राचे दृश्य मनाला स्फूर्ती देणारे होते.

**गणपतीपुळेत आगमन :**

गणपतीपुळे गावात पोहचल्यावर आम्ही प्रथम श्री गणपती मंदिरात दर्शनासाठी गेलो. हे मंदिर समुद्रकिनारी असल्यामुळे तिथलं वातावरण खूपच शांत आणि पवित्र वाटत होते. या मंदिरातील गणपती मूर्ती स्वयंभू आहे, असे मानले जाते. आणि अनेक भक्त येथे आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी येतात. मंदिराच्या परिसरात एका प्रकारची अध्यात्मिक शांती आणि सकारात्मकता अनुभवली. दर्शनानंतर आम्ही



समुद्रकिनारी गेलो. समोर पसरलेला अथांग सागर पाहून मनात एक वेगळाच आनंद होता. समुद्राचे खारट पाणी, लाटाचा येणारा आवाज आणि शांतता मनाला एक वेगळाच अनुभव देत होती. आम्ही समुद्राच्या पाण्यावर खेळलो. समुद्र किनाऱ्यावर फिरलो आणि सूर्यास्ताचे अद्‌भूत दृश्य पाहिले. तो सूर्य समुद्रात विलीन होताना आकाशाची रंगछटा बघण्यासारखी होती.

**गणपतीपुळेचा इतिहास आणि संस्कृती :**

गणपतीपुळे हे फक्त निसर्ग सौंदर्याने नटलेले नाही तर इथला इतिहास व संस्कृतीही खूप समृद्ध आहे. हे ठिकाण पेशव्याच्या काळापासून पवित्र मानले जाते. स्थानिक लोकांनी आम्हाला सांगितले की, गणपतीची मूर्ती हजारो वर्षापासून येथे आहे. भक्त जगभरातून येथे येतात. इथल्या लोकांची जीवनशैली त्यांची श्रद्धा आणि परंपरा या सर्व गोष्टींनी मला खूप प्रभावित केले. आम्ही तिथे स्थानिक लोकांशी संवाद साधला आणि त्यांची पाहुणचारांची पद्धत पाहून खूप आनंद झाला.

**रत्नागिरी किल्लाः**

गणपतीपुळेसह आम्ही रत्नागिरीहून जवळ असलेले रत्नागिरी किल्ला आणि थिबॉ पॅलेसही पाहण्याचे ठरवले. रत्नागिरी किल्ला हा समुद्राच्या किनाऱ्यावर असलेलाा एका ऐतिहासिक किल्ला आहे. तिथून समुद्राचे दृश्य खूपच सुंदर दिसते.

या किल्ल्याच्या उंचीवरून आम्हाला दूरवर पसरलेला समुद्र आणि हिरवीगार जमीन दिसली. थिबॉ पॅलेस हा एक राजवाडा असून ब्रह्मदेशाच्या राजाची हद्दपार म्हणून काही काळ येथे वास्तव्य केले होते. या पॅलेसचे शिल्पकला आणि  कलाकुसर पाहून आम्हाला त्याकाळच्या स्थापत्यशास्त्राची जाण आली.

या प्रवासात आम्ही कोकणी खाद्यपदार्थांची मजा घेतली. कोकम सरबत, सोलकढी, आंब्याचे पेय, इतर खास कोकणी पदार्थांचा आस्वाद घेतला. समुद्र किनाऱ्यावर बसून नारळपाणी पिण्याचाही आनंद घेतला. तेथेच माझ्या छोट्या बहिणीने आणि मी काही स्थानिक हस्तकला वस्तूदेखील खरेदी केल्या. ज्यात कोकणी शैलीतील विविध शोभेच्या वस्तू होत्या. मग आम्ही एका हॉटेलमध्ये बसून सर्वजण मिळून जेवण केले.

आमचा प्रवास काही दिवसांचा होता, पण त्यातील प्रत्येक दिवस एक वेगळा अनुभव देणारा होता. शेवटच्या दिवशी आम्ही गणपतीपुळ्याच्या जवळील काही छोट्या गावांना भेट दिली. आम्हाला स्थानिक जीवनशैली अनुभवता आली. शेती आणि छोट्या छोट्या उद्योगावर अवलंबून असणाऱ्या या लोकांचा साधेपणा आणि आपुलकी मनात भावली.

**परतीचा प्रवास :**

जेव्हा आम्ही प्रवासाहून परत येत होतो, तेव्हा मनात एक प्रकारची हुरहूर होती. तिथला निसर्ग, शांतता, तेथे अनुभवलेले सुंदर क्षण, हे सर्व माझ्या मनात घर करून बसले होते. आम्ही तिथून परतताना मनात असंख्य आठवणी आणि समाधान होते. प्रत्येकाने ठरवले की, परत एकदा या ठिकाणी जरूर येऊ. या प्रवासाने मला केवळ निसर्गाची नाही तर आपली संस्कृती, इतिहास आणि लोकजीवन यांची ओळख करून दिली. गणपतीपुळेचा हा प्रवास माझ्यासाठी अविस्मरणीय ठरला आणि आयुष्यभर लक्षात राहील.

***

# मी केलेला जंगल प्रवास

**–संयोजना शिंदे,** बी.एस्सी. प्रथम वर्ष

मी ताडोबा अभयारण्यातील केलेला जंगल प्रवास आतापर्यंतचा माझा अविस्मरणीय प्रवास होता. ताडोबा अभयारण्य हे महाराष्ट्रातील सर्वात मोठे अभयारण्य आहे. जंगलाचा परिसर अतिशय घनदाट होता. जंगलात सर्व प्रकारची झाडे होती. जंगलाचे मुख्य आकर्षण म्हणजे तेथे वास्तव्य करणारे वाघं. वाघांसोबत अन्य प्राणीही बघायला आम्ही जीप्सीतून जंगलप्रवासाला सुरुवात केली.

उन्हाळ्याचे दिवस होते. आमच्या प्रवासाला सकाळी सहा वाजता सुरुवात झाली. जंगलात सर्वत्र पक्ष्यांचा किलबिलाट होता. थंडगार वारा वाहत होता. जंगलाचे निसर्गरम्य सौंदर्य आजही माझ्या मनात कोरला गेला आहे. आम्हाला जंगलात नदीकाठी सांबर, हरीण यांचा कळप दिसला. गाडी पुढे जाताना वाटेवर आम्हाला मोर दिसले. त्यांचे सुंदर रूप शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. मी हे दृश्य प्रथमतःच आयुष्यात बघत होतो. संपूर्ण जंगल फिरल्यानंतर थोडा वेळ विश्रांती करण्यासाठी आम्ही आमची गाडी वाटेवर थांबवली. विश्रांतीनंतर आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. परत जात असताना आम्हाला वाटेवर हेतू साध्य झाला होता. परत जात असताना आम्हाला वाटेवर वाघिणीचे दर्शन झाले. जंगल प्रवास करण्याचा हेतू साध्य झाला होता. वाघाचे दर्शन झाल्यामुळे मी अतिशय आनंदी व उत्साही झालो. हा अनुभव माझ्यासाठी अविस्मरणीय होता.

***



# परभणीचा प्रवास

**–श्रेया विजय साळवे,** बी.ए.प्रथम वर्ष




मी माझ्या नांदेड या शहरापासून परभणी या ठिकाणापर्यंत प्रवास केला आहे. हा प्रवास फक्त एक दिवसाचा असा होता. पण तो माझ्यासाठी अविस्मरणीय ठरला. कारण ते क्षण माझ्यासाठी कधीही न विसरणारे होते. ठळकपणे म्हणायचे तर माझ्या लक्षात त्या दिवसाची तारीख तर लक्षात नाहीये पण तो दिवस मला अतिशय आवडतो.

मी रेल्वे स्टेशनला गेले. तेथून माझा प्रवास सुरु झाला. तो फक्त प्रवासच नव्हता तर स्टेशनवरील प्रवाशांचे निरीक्षण करणे, तसेच स्टेशनच्या बाहेर काही अतिशय गरीब व्यक्ती बसलेल्या असतात, काहींना हात नसतो, काहींना पाय नसतात, काहींना डोळे नसतात, तर काहींना कायमचे घर सुद्धा नसते. पण यांना मी जेव्हा बघते तेव्हा मला विचार येतो की, आपल्याला देवाने दिलेले सर्वकाही आहे. त्याच्या मनात एक पोकळ अशी दुखऱ्या मनाची भावना असेल पण ते उत्स्फूर्तपणे जगतात. असे बारीकसारीक निरीक्षण मी करत होते. तेवढ्यात माझ्या गाडीचा टाईम झाला व गाडी आली आणि मी निघाले.

रेल्वे गाडीत बसले म्हणजे काय एक प्रवासी

किंवा त्या गाडीत एक व्यक्ती असेल असे तर होणार नाही. प्रत्येक व्यक्ती हा वेगवेगळ्या ठिकाणी जाणारा, कोणता व्यक्ती कामानिमित्त जात असेल तर कोणता व्यक्ती हा नातेवाईकांना भेटायला जाणारा तर कोणता व्यक्ती प्रवासासाठी निसर्गाचा मोह उचलणारा असावा असे मला त्या रेल्वेत बसल्यावर वाटत होते. पण मी मात्र एका शाळेत जाऊन तेथून माझ्या बहिणीची टी.सी. काढण्यासाठी परभणीला जात होते.

माझा हा प्रवास रेल्वेगाडीतून फक्त एक ते दीड तासाचा होता, पण या एक ते दीड तासाचा माझा रेल्वे प्रवास मला अतिशय भारावून टाकणारा होता. खरं सांगायला गेलं तर मला ना त्या रेल्वे गाडीच्या चौकोनी खिडकीतून निसर्ग पहायला अतिशय आवडतो, तो माझा आवडता छंदच जणू. त्या खिडकीतून पाहताना तो सौंदर्याने नटलेला निसर्ग, तो हिरवागार परिसर, पळणारी झाडे, डोलणारे गवत, जणू मला खिडकीतून डोकावताना ते डोलणारे गवत मला त्याच्याकडे बोलवतायत आणि मला म्हणतात. या माझ्या हिरवे पणात, या माझ्या हिवराळी गवताच्या गादीवर तुला बसायला व तसेच माझ्या या हिवराळी गवतावरून जसं बाळाची आई हळूच त्याच्या डोक्यावरून हात फिरवते (मायेचा पाझर) त्या प्रमाणे तू माझ्यावर हात फिरवून माझे लाड कर माझा मोह घे असे ते गवत माझ्याशी बोलतायेत असा मला भास होता होता. खरंच म्हटलं ना तर मला खूप आवडतं या सौंदर्यशील निसर्गासोबत रमायला.

काय सांगू, आश्चर्य वाटेल, जेव्हा मी रेल्वे गाडीच्या खिडकीतून डोकावून निसर्गाचा मोह होते ना तेव्हा त्या निसर्गाच्या प्रेमात पडते. आणि या निसर्गाच्या प्रेमात मी स्वतःला हरवून टाकते. जसं एक प्रियकर आणि प्रियसी प्रेमात अंधळे होतात न त्या प्रमाणे माझे हाल होतात. मग त्या निसर्गाच्या प्रेमात मी त्या निसर्गाशी (झाडांशी, फुलांशी, गवताशी) बोलत आहे. आणि स्वतःला मी त्याच्यात हरवलंय असा आभास मला होतो. मी त्या रेल्वेच्या गाडीच्या खिडकीतून डोकावताना जणू त्या निसर्गाशी बोलत आहे अशा ओळी त्याच्याकडे बघून मला प्रकट होतात. त्या म्हणजे,

’तुझे हे नैसर्गिक हिरवे सौंदर्य मला भावले

त्यातून मी तुझ्या या हिरव्यागार सौंदर्यात हरवले

हरवून माझे भान, मी झाले तुझ्या या हिरव्या
सौंदर्यात बेभान

काय असते हे मानवी जीवन कधी कोमोजलेल्या त्या
गुलाबासारखं

तर कधी पाण्यात फुललेल्या कमळासारखे

आयुष्याचे ह्या झाडे फांदे हे भरकटलेले आहे पण

तूझं त्या हिरव्या सौंदर्यात ते फांदे सुंदर मोहक
वाटत आहेत.

अशा काही अर्थ असलेल्या किंवा अर्थ नसलेल्या ओळी मला अचानकपणे आठवतात. अशाच प्रकारे माझा हा अर्धा प्रवास तर मी रेल्वे गाडीतून केला. आता वेळ झाली ती रेल्वेतून शाळेत पोहोचण्याची. कधी त्या निसर्गाच्या निरीक्षणातून त्या निसर्गाच्या

प्रेमातून स्टेशनपर्यंत पोहोचले हे मला समजलेच नाही. स्टेशनवर उतरता गाडीतून असणाऱ्या व गाडीत चढणाऱ्या प्रवाशांची तगमग ही थोडी वेगळीच पण मला भावली. जेवढे प्रवासी त्या रेल्वेत बसतात तेवढेच नाही पण त्यापेक्षा थोडे कमी असतात. आणि जेवढे उतरले तेवढेच गाडीत चढतात. कसा हा प्रवास कोणासाठी धावपळीचा तर कोणासाठी मोहाचा.

मी जीना चढला आणि परभणी स्टेशनच्या बाहेर आले. आता स्टेशनच्या बाहेर दुसरी मज्जा म्हणजे रिक्षावाले हे त्या स्टेशनच्या गेटलाच थांबलेले असतात. जणू असं म्हणतात, आमच्याकडे खूप छान जेवण मिळेल, तिकडे चला. खरं सांगायचं झालं तर मला हे असे रिक्षावाले समोर असतील तेव्हा गोंधळल्यासारखं होते. नेमकं बसायचं कोणत्या रिक्षात. पण खरं सांगायला गेलं तर आताच्या परिस्थितीमुळे फार कमी व्यक्ती ह्या विश्वास ठेवण्याजोगे आहेत. माझं असं म्हणणं नाहीये की प्रत्येक व्यक्ती ही वाईट नितीमत्तेचा आहे, पण कधी कोणाची नितिमत्ता ही बदलेल सांगता येणार नाही. असेच मी एका आजोबाच्या रिक्षात बसले. काही त्या शाळेत पोहोचले.

शाळेचा परिसर हा मला आवडला. पण नेमक्याच उन्हाळी सुट्ट्या या संपण्यावर आल्या होत्या. पण मी नेमकं सुट्ट्या संपण्याच्या एक दिवस आधी त्या शाळेत पोहोचले. पण शाळेत तर कोणी नव्हते. मग मी काही वेळ त्या शाळेच्या मैदानावर म्हणजे एका झाडाखाली बसून तेथे कोणी येण्याची वाट पाहत होते. सकाळचे ११ वाजले आणि तिथे शाळेचा एक कर्मचारी आला व मी त्या कर्मचाऱ्याशी बोलले तर ते म्हणाले, आजचा शेवटचा दिवस आहे. उन्हाळी सुट्ट्या संपण्याचा तुम्ही उद्या तर यायला हवं होतं. मी त्यांना विनंती केली की, सर मी दुरून आले आणि मला माहीत नव्हतं की, आज शेवटचा दिवस आहे. उन्हाळी सुट्टी संपण्याचा कृपया माझी मदत करा आणि मला टीसी हे कागदपत्र मिळवून द्या. त्यांनी मला काही वेळ थांबायला सांगितले आणि मी थांबले. मग काही वेळेने तेथील मुख्याध्यापिका आल्या. त्यांनी मला त्यांच्या कार्यालयात बोलावले आणि कोणत्या कारणास्तव मी तिथे शाळेत गेले हे विचारलं. मी त्यांना सांगितले की मला माझ्या बहिणीची टीसी हवी आहे. तर त्यांनी मला काही अर्ज करायला सांगितले. त्यानंतर मला त्या कागदपत्राची म्हणजेच टीसीची प्रत मिळाली.

माझा हा प्रवास तर होता पण त्या प्रवासात थोडं माझं काम सुद्धा होतं. खरं सांगायचं तर व्यक्तीने जगताना प्रवासाचा आंनद घेत त्याच्या कामाचा जो स्ट्रेस आहे तो विसरून जातो.

***

# माझा अविस्मरणीय अनुभव : किल्ले रायगड

-ऋतुजा आनंदा हिवराळे, सिडको

मनात निश्चय करून यावेळी तिसऱ्या शनिवारी सुट्टी असल्याने गावी जायचं ठरवलं आणि त्यानुसार बेत आखला. सोबत माझी मैत्रिण येणार होती. बेत ठरला होता, तो रायगड ट्रेकिंगचा. गावी आलो शुक्रवारी रात्री आणि रविवारी जायचं ठरवलं. दिवस होते मुसळधार पावसाचे, आईला काय बरं सांगासवं काही कळेना. खोटं तर बोलू शकत नाही कारण नंतर खोटं निस्तरणं खूप अवघड असतं. आईला सांगितले की मी महाडला राहणाऱ्या माझ्या मैत्रिणीला भेटायला जाते आणि तेथून रायगडावर जाणार आहोत.

आईला माहीत होते की खूप दिवसापासून प्लॅन करतेय अपर्णाकडे जायचं. त्यामुळे तिनेही थांबवलं नाही आणि तसाही तिचा माझ्यावर असलेला पूर्ण विश्वास यामुळे तिने कधीच मला काही करण्यापासून आडवलं नाही आणि तिचा माझ्यावर असलेला विश्वास मी कधीही तोडणार नाही.

सकाळी ७ वाजता दोघीही एसटीमध्ये बसलो. दोघींच्या डोक्यात एकच विचार की आपण अशा मुसळधार पावसात रायगडसारख्या अभेद्य आणि उंच किल्ल्यावर जाणे कितपत योग्य आहे की जाणं रद्द करावं. कोणीही माघार घ्यायला तयार होईना. आणि हे एकमेकींना सांगायचं कसं. शेवटी आता काहीही होऊ



दे, इतक्या लांब येऊन परत जायचं नाही. जे काही होऊ दे ते पाहू. महाराजांचं नाव घेऊन पुढील प्रवास सुरू केला.

मोठ्या ऐटीत ट्रेकिंगला निघालो. पण कसं जायचं. महाडवरून बस किती वाजता असेल, ती नसेल तर दुसरा पर्याय काय असेल, तिथून परत कसं यायचं याचं काहीही नियोजन न करता पहिल्यांदा प्रवासाला निघालो होतो. महाडला पोहोचला. बसस्टॉपवर चौकशी केली, तर बस केव्हाच सुटली होती. अन् पुढची बस दुपारी होती. इतक्या उशिरा किल्ल्यावर जाणं ठीक नव्हतं. कारण परतीच्या प्रवासाचं सगळंच गणित कोलमडले असते. मग पुन्हा माहिती काढत काढत एक ट्रॅक्सी मिळाली पण ती २ तास तरी भरणार नाही असं अंदाजावरून वाटत होतं.

आम्ही गडाच्या पायथ्याशी पोहोचलो. जाताना रोपवे ने जायचं हे कधीच ठरलं होतं. त्याप्रमाणे तिकीट काढालया गेलो. आमचा नंबर येईपर्यंत आम्ही विचार करत होतो की येताना पण रोपवे ने यायचं की गड पायी उतरायचं. हो नाही करता करता म्हटलं जे होईल ते पाहू तिकीट वन वे चं काढू या, परत येताना पाणी येऊ म्हणजे पावसाळ्यातील गडाचं सौंदर्य अधिक जवळून पाहता येईल. काय होतं माहीत नाही पण त्या दिवशी मा.संभाजीराजे भोसले साहेब गडावर आले होते आणि आमच्या सोबतच्या दुसऱ्या रोपवे ने जाण्यासाठी निघाले.

पहिल्यांदा रोप वेने प्रवास करत होतो. उंचच उंच कड्यांवरून कोसळणाऱ्या दुधाळ धारा मनाला न्हाऊ घालत होत्या. चारी दिशांनी अंगाला झोंबणारा गार वारा, वाऱ्यामुळे हलका बरसणारा पण टोचणारा पाऊस, दाट धुकं, त्यामुळे आम्ही कुठे आहोत याचा अंदाजच येत नव्हता. काही मिनिटांचा प्रवास पण असं वाटत होतं की खूप काळ हा अनुभव घेतोय. आणि असाच घेत रहावा असं वाटत होतं. आमच्या बाजूच्या रोपवेतून महाराजांचा जयघोष ऐकू येत होता. आम्ही ही आमचा आवाज त्यात मिसळू लागलो.

इथूनच स्वराज्य घडताना आणि स्वराज्याची घडी बसताना पाहिली. या मातीने माझ्या राजाला छत्रपती होताना पाहिलं. केवढं ते भाग्य थोर, इथे छत्रपती संभाजी महाराजांना हिंदवी स्वराज्याचे बाळकडू मिळाले. महाराजांचा अखेरचा निरोप व स्वराज्याची बसलेली घडी विस्कटताना या गडाने, दऱ्याखोऱ्यांनी अश्रू नयनांनी पाहिली असेल.

या विचारात कधी किल्ल्यावर पोहोचलो ते कळलंच नाही. सर्वत्र धुकं आणि मुसळधार पाऊस. आम्ही आणलेल्या छत्र्या काही यात टिकाव धरत नव्हत्या. मी रेनकोट घातला होता. म्हणून फक्त जोराचा पाऊस लागत नव्हता. पण चिंब भिजलो होतो. आणि थंडीने हात पाय गार पडायला सुरुवात झाली होती. अजून आम्ही रोप वे च्या ठिकाणी होतो. आजूबाजूला इतकं दाट धुकं होतं की किल्ल्यावर आम्ही दोघीच आहोत असं वाटू लागलं. सुरुवातीला थोडं घाबरलोच की आपण दोघीच पुढे कसं जायचं. मग धीर करून चालू लागलो. पुढे जसजसं जवळ जाऊ तशी इतर

माणेसही दिसू लागली. राणीवसा, महाराजांचा महाल, अंधार कोठडी, अष्टप्रधान मंडळाचं निवास, सर्व पाहून महाराजांच्या राज्याभिषेकाच्या स्थानी, सदर महाराज पोहोचलो. श्रीमान योगी, छावा, राजा छत्रपती या पुस्तकात अनुभवलेला रायगड, जीवन डोळ्यासमोर उभं करण्याचा अवखळ प्रयत्न करत होतो.

इतका मुसळधार पाऊस, सोसाट्याचा वारा थंडीने पूर्ण गारठून गेलो असताना या ठिकाणी एक वेगळीच उर्जा जाणवत गेली. कदाचित इथल्या मातीत, वाहणाऱ्या वाऱ्याच्या प्रत्येक झुळूकीमध्ये, पावसाच्या प्रत्येक थेंबात चैतन्य, जोश, प्रेरणा मिळते. महाराजांच्या दर्शनाने धन्य झाल्यासारखे वाटत होते.

समाधीचं दर्शन घेवून तिथेच थोडा वेळ बसलो. खरंच खूप शांत समाधान वाटत होतं. रिटर्न तिकीट नसल्याने रोप वे ने जाणं शक्य नव्हतं आणि गड उतरून जाण्याशिवाय पर्याय नव्हता. आता धुकंही थोडं कमी झालं होतं. त्यामुळे किल्ल्यावरून दिसणारे निसर्ग सौंदर्य अप्रतिम होतं. महादरवाजायाजवळ पोहचलो, तेथून मोठा दुधाळ धबधबा ओसंडून वाहत होता. वाटते अनेक प्रवासी भेटले त्यांना भेट घेत उतरवत आम्ही महाड पर्यंत पोहोचलो आणि मोकळा श्वास घेतला. संध्याकाळचे पाच वाजले, नाश्ता केला आणि घरच्या प्रवासाला लागलो, ते पुढची ट्रिप प्रॉपर प्लॅनिंग करून काढायची हे मनाशी पक्क करू लागलो.

***

---

## धाराशिव एक अनुभव

**–निकिता दिगंबर टर्के,** बीए प्रथम वर्ष

माझं नाव निकिता टर्के आहे. मी किवळा या गावी राहते, मी जेव्हा ८ वीत होते तेव्हा हॉलिबॉल खेळत होते. आमच्या सरांनी आम्हाला नांदेडला खेळण्यासाठी नेले होते. माझा प्रवास हॉलिबॉल खेळण्यापासून सुरू झाला.

मी व माझ्या मैत्रिणी एकूण १२ मुली होतो. आम्ही जिल्हास्तरावर जिंकल्याने आम्हाला पुढे जाण्याची संधी मिळाली. मी व माझ्या सर्व मैत्रिणी खूप खूश होतो. राज्य पातळीस्तरावर खेळण्यासाठी आम्हाला उस्मानाबाद म्हणजे आताचा धाराशिव या जिल्ह्यात जायचे होते. सरांनी आम्ही सर्व हॉलिबॉल खेळाडूंना सांगितले की तुम्हाला उस्मानाबाद या जिल्ह्यात हॉलिबॉल खेळायचे आहे, हे ऐकून मी खूप खूश झाले. दुसऱ्या दिवशी आम्ही सर्व शाळेत आलो. माझ्या मैत्रिणी खूश होत्या. कारण त्यांना परवानगी मिळाली. पण सरांनी सांगितले हॉलिबालचा एक जरी खेळाडू खेळण्यासाठी येणार नसेल तर आपल्याला तिथे खेळायला जायचं जमणार नाही. कारण लोह्याला खेळाडूचे फिजीकल फिटनेस तपासले जाते. तिथे सर्व बाराला बारा खेळाडू पाहिजे. मग सर्वांना विचारले, परवानगी मिळाली का? ११ मुलींनी सांगितले, परवानगी मिळाली. पण मला तर मिळाली नव्हती. सर म्हणू

लागले, फोन लावून घेऊ काय परवानगी. मी सरांना म्हणाले, नका सर, मी विचारते. त्याच दिवशी मी दुपारच्या वेळी घरी आले. मग घरी सांगितले खेळासाठी जायचं आहे, लगेच माझी आजी आणि आई नको, काही गरज नाही म्हणाले. थोड्या वेळानंतर माझे पप्पा घरी आले. सर्व काही सांगितले. खेळायला जायचं आहे म्हटल्यावर पप्पांनी परवानगी दिली. आईचं काही चलनाही मी खूपच खूश झाले.

त्याच रात्री आईन खाण्यासाठी फराळ म्हणून चिवडा व भाकरवड्या केल्या. दुसऱ्या दिवशी सरांनी गाडीची जोड लावली. जायच्या अगोदरची रात्र होती. दुसऱ्या दिवशी दुपारी जायचं होतं. त्या रात्री बॅगमध्ये सामान भरले. सामान म्हणजे दोन चादर, एक कंगवा, आरसा, दात घासण्यासाठी स्पेशल दाताला लावायची पेस्ट व दात घासायचा ब्रश आणि आईने बनवलेला फराळ ठेवला. जायचं तिकीट, यायचं तिकीट ठेवलं आणि काही खर्चायला पण ठेवले. दोन ड्रेसही ठेवले. रात्री झोपच येत नव्हती. कधी जावे कधी नाही यामुळे मन व्याकुळ झालं. मग कसतरी मी झोपले.

दुसरा दिवस उजाडला. मी तयार होऊन शाळेत गेलो. ११ वाजता शाळेतून पुन्हा घरी आले. बॅग घेतली. काही कागदपत्रे घेतली. घराच्या बाहेर टेंशन येऊ लागलं. कारण नर्वस फिल होऊ लागं आणि बॅग आवरणा गेलती. मी आणि माझ्या सर्व मैत्रिणी शाळेत आपआपल्या बॅगासोबत आलो. सरांनी गाडी बोलावली. आम्ही सर्व बसलो. मी आधी पाठीमागे बसले होते.

जातांनी मस्त गाणी म्हणालो. दुकानावरचं खायचं घेतलं. ते खाल्ले. गाण्याच्या भेंड्या खेळल्या. मला पण खूप आनंद झाला. आम्हाला पोहाचायला रात्रीचे ९ वाजले होते. आम्ही सरांना गाडी थांबवण्यास सांगून आईसक्रीम खायला गेलो. मी तर सर्व मिक्स आईसक्रीम खाल्ले. मला ती आईसक्रीम खूप आवडले. दत्तात्रयाच्या मंदिरात रात्रीचा मुक्काम केला. रात्री घरून आणलेला फराळ खाल्ला. पाणी पिलो आणि तिथेच झोपी जाणार होतो. पण हिवाळ्याचे दिवस होते. खूप थंडी वाजू लागली. सर्व मुली एकत्र व सर एकत्र झोपले. पण पहाट खूप थंडी वाजू लागली. झोपच येत नव्हती. उगीच आलो असे वाटू लागले. सकाळ झाली. सगळ्यांनी दात ब्रश केले. आंघोळीला तिथं १० रुपये एका व्यक्तीला होते. मनातल्या मनात शिव्या देऊन आंघोळी केल्या. तिथेच जेवणाची सोय होती. आंघोळी करून येऊ लागलो. एका हॉटेलवाल्याने आम्हाला विचारले, कुठून आलात आणि कसकाय आलात? आम्ही सर्व सांगितले. त्यांनी आम्हाला चहा मोफत दिला. आम्ही विचारले कसकाय दिले. ते म्हणाले, जर हॉलिबॉलमध्ये जिंकलात तर रात्रीचं जेवण सर्वांना मोफत मिळेल. जर हारून आला तर एक व्यक्तीला चहाचे २० रुपये द्यावे लागतील. आम्ही म्हटले, आता जिंकूनच येतो. मग जेवणाची सोय होती. तिथे जेवण केले. १० पर्यंत सर्व झाले होते. वाटेत एका देवीच्या मंदिराचे दर्शन घेतले.

कॉलेजला गेल्या. पण आमचा हॉलिबॉल शाळेतच राहिला होता. आमची दोन दिवस प्रॅक्टीस झाली नव्हती. तिथे पोहोचल्यावर पाहतो तर काय तिथे

अशा मुली होत्या, की ते मुली वाटेचना. लहान केस, लहान कपडे आणि शुज, टेनिस सर्विस मारू लागल्या. मला तर शंक येऊ लागली की ह्या मुलीच आहेत की नाही. मग आम्ही मैदानात उतरलो. पहिली मॅच झाली. समोरच्या टीममधले शिट्या मारू लागले. आम्हाला शिट्या मारता येत नव्हत्या. आमचे तर दोन-तीन-चार असे पॉईंट होते. आम्ही हारलो. आमच्या दोन मॅचा लागल्या. दोन्हीतही हरलो. सर्वांचा मुड ऑफ झाला. तरी पण सरांनी सर्वांना खुश करण्यासाठी एका हॉटेलात नेऊन सर्वांना फालुदा पाजवला व दुसऱ्या सरांनी पाणीपुरी खाऊ घातली होती. तितक्या दूर जाऊन जिंकनाशी आल्या येतानी गाण्याच्या भेंड्या खेळल्या नाही. येतानी जास्त मज्जा पण आली नाही. मला मळकु लागलं. हे पाहून सरांनी मला समोर बसवलं. तरी पण मला खूप उलट्या झाल्या. माझ्या घरचे आधीच जाऊ नकोस म्हणू लागले. ही अवस्था पाहून किती शिव्या देतात याची भीती वाटू लागली. हायवेचा रोड आणि पाऊस चालू होता. माझ्या उलट्या थांबत नव्हत्या. त्या दिवशी देवीचं विसर्जन पण होतं. मग आम्ही रात्री १० वाजता गावात पोहोचलो. मला तर काही सुधरणं गेले. घरी आलो. उलट्या झाल्या म्हणल्यावर कोणी काही म्हटलं नाही व मी आल्या बरोबर न चूळ भरता झोपी गेलो.

मला या माझ्या प्रवासात खूप मज्जा आली व आनंदही झाला.

***



# शिर्डी एक आठवण

**–कानगुले प्रांजली,** बी.ए.तृतीय वर्ष




आयुष्यातील अविस्मरणीय प्रवास म्हणजे आम्ही शाळेतून सहलीला गेलेले ते दिवस. ते मी कधीच विसरू शकत नाही. ते क्षण माझ्यासाठी खूप अनमोल आहेत.

आम्ही पहाटे १२ वाजता आमच्या शाळेतून गाडीमधून निघालो. आम्हाला प्रथम शिर्डीला जायचे होते. तर आम्ही पहाटे निघालो. व आमच्या शाळेमध्ये सर्व सहलीची तयारी आधीच झाली होती. आम्ही ५ दिवसासाठी बाहेर राहणार होतो. त्यामुळे घरून खायला करून दिले होते व सोबत पैसे घेऊन बॅगा वगैरे घेऊन आम्ही शाळेत येऊन थांबलो. सर्व मित्र मैत्रिणी व सर व मॅडम सर्व होतो. मुलांना व मुलींना वेगवेगळी बस होती. त्या बसमध्ये आम्ही बसून निघालो. पाच दिवसांचा प्रवास होता. त्यामुळे सर्व तयारी करूनच आम्ही निघालो होतो.

आमच्या बसमध्ये दोन सर व दोन मॅडम होत्या व बाकीच्या सगळ्या मैत्रिणी. आम्ही खूप खूश होतो. खूप मज्जा करत आम्ही शिर्डीला निघालो. खूप छान वाटत होते. घराबाहेर असे पाच दिवसासाठी पहिली वेळेस बाहेर पडलो होतो. त्यामुळे खूप खूश होतो. आम्ही प्रत्येक सीटवर  मैत्रिणीसोबत बसलो होतो. त्यामुळे तो प्रवास खूप छान वाटत होता.

आम्ही शिर्डीला पोहोचलो. तेथे हॉटेलमध्ये जेवण करून आम्ही साईबाबाचे दर्शन घेतले व रात्री तिथेच मुक्काम करून सकाळी उठून आवरून आम्ही पुण्याला निघालो. पुण्याला निघताना जेवण वगैरे करून मस्त मज्जा करीत आम्ही गाण्याच्या भेंड्या खेळत निघालो. आम्ही पुण्याला पोहोचलो. तेथे दर्शन घेतले व नंतर तेथून पुण्यातील सर्व ठिकाणे पाहण्यासाठी निघालो. आम्ही प्रथम राजीव गांधी प्राणी संग्रहालय

पाहिले. तेथे विविध प्रकारचे प्राणी होते. आमच्या सरांनी ग्रुप केले होते. ग्रुपनुसार आम्ही फिरत होतो. जे कधी बघितले नव्हते. विविध जातीचे प्राणी पहावयास मिळाले. सर्व प्राणी पाहून दिवसभर फिरून थकून गेलेलो आम्ही आराम करण्यासाठी आनंदीत झालो. आळंदीला आम्ही मुक्काम केला व सकाळी उठून अजून फिरायला जायचे होते. त्यामुळे आम्ही तेथे लवकर जेवण करून लवकर झोपी गेलो.

पुन्हा सकाळी उठून पुन्हा फिरायला निघलो. सर्व बसमध्ये बसून मज्जा करीत निघालो. आम्ही देहुला गेलो. तेथे संत तुकाराम महाराजांनी लिहून ठेवलेले अभंग आहेत, ते आम्ही पाहिले व आम्ही पुण्याच्या शनिवार वाड्यात गेलो. ऐतिहासिक वाडा पाहिला व लाल महालमध्ये प्रवेश केलो. लाल महाल हे पूर्ण लाल मातीमध्ये बांधलेले आहे ते आम्ही बघितले.

पुण्यात बालाजीची प्रतिमूर्ती असे देवस्थान आहे, तेथे पाहिलो. तुळापूरला गेलो व संभाजी महाराजांच्या काही आठवणी आम्हाला सांगितल्या. तेथे नद्यांचा संगम आहे. त्याबद्दल सरने आम्हाला माहिती दिली. ती माहिती घेऊन पुढे निघालो.

शिवाजी महाराजांचा जन्म जेथे झाला तो म्हणजे शिवनेरी किल्ला. शिवाजी महाराजांचा तो किल्ला बघून अंगावर शहारे येत होते. त्यांनी केलेला पराक्रम त्यांचे ते किस्से ऐकून अंगावर शहारे येत होते. आम्ही तेथे पूर्ण किल्ला पाहिला व सिंहगड पाहण्यासाठी गेलो. तेथे काहीतरी काम चालू होते म्हणून आज जायला भेटले नाही. हे पाहून आम्ही तुळजापूरला निघालो. तुळजापूर येथे तुळजाभवानीचे दर्शन झाले. ओझरला गेलो. तेथे गणपतीचे दर्शन झाले. तसेच स्वामी समर्थांचे अक्कलकोट येथे आम्ही देवस्थानात गेलो.

औरंगाबाद नाथसागर धरण आणि जायकवाडी प्रकल्प हे आम्ही पाहिलो. गोदावरी नदीवरील हे प्रकल्प आहे. आम्ही हे सर्व ठिकाण बधितले. आमच्या वर्गातले व शाळेतले सगळे सहलीला आले होते. त्यामुळे खूप मज्जा आली. ही सहल मी माझ्या आयुष्यात कधीच विसरू शकणार नाही. आमच्या आयुष्यातील सर्वात सुंदर व अविस्मरणीय प्रवास हा आहे. मित्रांसोबत केलेला व शिक्षकांसोबत केलेला हा प्रवास खूप सुखदायी व खूप सुंदर होता. आम्ही सर्व स्थळ बघून आम्ही घरी आलो. घरी आल्यावर तर दोन–तीन दिवस करमलेच नाही. असा प्रवास आहे ते माझ्या आयुष्यातील. खूप प्रवास केला पण मित्र मैत्रिणीसोबतचे क्षण काही वेगळेच असतात. हे तेव्हा समजलं. घराच्या बाहेर जाऊन काहीतरी शिकायला भेटले. वेगवेगळी माणसे, वेगळी त्यांची संस्कृती कळाली. आपल्या शहराबाहेर खूप काही बघण्यासारखे आहे आणि खूप सुंदर आहे, अशा माझ्या प्रवासाच्या आठवणी आहेत.

***

# पुणेः एक सुंदर अनुभव

**–अंजली बुद्धेवाड,** बी.ए.प्रथम वर्ष

आमच्या शाळेतील लहान मोठे विद्यार्थी मिळून ४०–४५ जणांचा आमचा एक ग्रुप झाला होता. ठरल्याप्रमाणे आम्ही पुण्याला सहलीला निघालो. आमच्या शाळेतील सरांनी आमच्यासाठी बस बांधली होती. सर्व सामान शिस्त पद्धतीने बॅगमध्ये ठेवून निघालो. आपल्याला तर माहीतच आहे, सहलीला जायचं म्हटलं की खूप आनंद होतो.

आमच्या शाळेतील ग्रुपमधील सर्वजण बसमध्ये बसू लागलो. मी पण जाऊन खिडकीला बसले. मग आमचा चालू झाला प्रवास पुण्याचा. ड्रायव्हरने बस चालू केली की इकडे आमचे हिंदी गाणे सुरू झाले. आम्ही सर्वजण गाणी म्हणत प्रवास करू लागलो. आम्ही जाताना खूप सुंदर वातावरण होते. थंड वारे सुटे लागले. फुल त्यांच्या तालावर नाचू लागले. त्याच्या व्यतिरिक्त आकाशातून रिमझीम पाऊस पडू लागला. मोर आंब्याच्या वनात नाचू लागला. त्या वातावरणात असं वेगळंच काहीतरी होतं. त्यामध्ये सारे दुःख विसरून जाऊ लागले. आम्ही ज्या रस्त्याने जाऊ लागलो त्या रस्त्याला खूप खड्डे होते. त्यामुळे तिथे आमच्या बसचे टायर पंक्चर झाले. त्यामुळे बस एका जागेवर थांबली. तिथे बाजूने खूप झाडे होते. खूप अंधार वाटू लागला. तिथे आम्ही थोडा वेळ थांबलो. ड्रायव्हरने बसचा टायर बदलून दुसरा टायर लावला. तिथून आम्ही पुण्याला निघालो.

पुण्याला जातना माझ्यासोबतच्या मैत्रिणीला उलट्या होऊ लागल्या. ती खूपच रडू लागली. तिचे पोटही दुखू लागले. त्यामुळे आमच्या सरांनी जाताना या गावात गाडी थांबवली व तिला दवाखान्यात नेले. डॉक्टरने माझ्या मैत्रिणीला तपासून तिला गोळ्या, औषधी दिले. मग आम्ही सर्व बसमध्ये बसून जेवन केले. आम्ही सर्व एकमेकांचे डब्बे घेऊन जेवलो. मी माझ्या डब्ब्यातील पोळी, भाजी, लाह्या आणि आम्ही सर्वांना दिले. मग आम्ही सर्वजण जेवन केलो.

माझ्यासोबतच्या मैत्रिणीने गोळ्या औषधी घेतले. पण आमच्याजवळ पाणी संपले, ती जवळच्या दुकानातून बाटली घेऊन ती गोळ्या खाल्ली. मग आम्ही या गावातून निघालो. आणि पुढचा प्रवास चालू झाला. त्या गावापासून रस्ते खूपच वाकडे तिकडे होते. त्यामुळे आम्हाला खूप मज्जा येऊ लागली. आम्ही सर्व बसमध्ये खूप धिंगामस्ती केली. बसमध्ये जाताना गाणी म्हणत तर कोणी मोबाईल बघू लागले. तर कोणी व्हिडीओ गेम खेळत होते. काही जण नृत्य करू लागले.

आम्ही जाताना खूप काही तळे सुद्धा दिसले. त्या तळ्यात खूप कमळही होते. आम्ही जाताना खूप सुंदर वातावरण बागे, फुले, झाडे पहायला भेटली. आम्ही सर्वजण खूप मस्ती केली. पुण्याला जाताना आमची सरांनी फोटो काढले. आम्ही असंच हसत खेळत

पुण्याला पोहोचलो.

पुण्याला गेलेल्या आम्ही सर्वजण एका ठिकाणी विश्रांतीला हॉटेलला थांबलो. आम्ही सर्वजण फ्रेश होऊन हॉटेलचया बाहेर निघालो. मग आम्हाला सरांनी एका रेस्टॉरंटमध्ये जेवायला नेले. आम्ही सर्वजण तेथे जेवण केले. थोड्या वेळाने तेथून निघून फिरायला गेलो.

पुण्याला खूप सुंदर बघायचं आहे, कारण पुणे हे एक शहर आहे. म्हटलं की महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळ. पुणे शहराला विद्येचं माहेरघर आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखलं जातं. पुणे शहराला स्वतःची एक ओळख, संस्कृती आणि इतिहास आहे. पुणे शहरात भारी वाटलं. आम्ही सर्वजण एकत्र येऊन सर्व पाहिले. खूप आनंद झाला. सर्व स्थळ बघितल्यावर खूप आनंद झाला. सर्व मुले–मुली एकत्र येऊन बसमध्ये बसले आणि हॉटेलला निघालो. बसमध्ये बसल्यावर खूप काही पर्यटनस्थळांवर सरांनी सांगितले. पर्यटन स्थळ बघल्यावर खूप मजा आली असं वाटलं की तिथेच रहावे.

काळी वेळेत हॉटेलला पोहोचलो. सर्वजण हॉटेलमध्ये गेल्यावर फ्रेश झालो. आम्ही सर्वजण रात्री एकत्र येऊन खूप गोष्टी केल्या. पुणे शहरात पर्यटन स्थळावर सर्वजण सांगू लागले. सहलीला गेल्यावर खूप मजा येते. कारण सहलीला गेल्यावर खूप काही गोष्टी माहिती होतात.

आम्ही सर्वजण सहलीला खूप मजा केली. घरी निघालो सर्वजण. बसमध्ये बसलो. ड्रायव्हर गाडी चालू केली. आम्हाला खूप उशिर झाला होता. त्यामुळे सर्व बसमध्येच झोपी गेलो. रात्री १ वाजता आम्ही घरी पोहोचलो. घरी गेल्यावर काही वेळ झोपलो.

***



# विपश्यना साधना: एक अनुभव

-प्रा. डॉ. शंकर विभुते

जून महिना सुरू झाला की शाळा महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया करिता लगबग सुरू होते.याला आमचं महाविद्यालय अपवाद नाही.दुपारची वेळ होती.

विद्यार्थ्यांची वर्दळ कमी झालेली होती. तेव्हा आम्ही सर्व प्राध्यापक मंडळी गप्पा मारीत बसलो होतो. उन्हाळी सुट्ट्यामध्ये कोण कुठे गेलं होतं याची मजेशीर चर्चा चालू होती. तेवढ्यात माझ्या बाजूला बसलेले माझे मित्र डॉ. डी. बी. कदम म्हणाले की, मी या उन्हाळ्यात इगतपुरी येथे विपश्यना साधना करायला गेलो होतो.हे ऐकताच माझे कान टवकारले.कारण, मी अनेक वर्षापासून विपश्यना साधना करण्याची इच्छा बाळगून होतो पण माझा नंबर काही लागत नव्हता. मी सरांना लगेच म्हणालो, सर मला पण करायची खूप इच्छा आहे पण माझा नंबर लागत नाही. सर म्हणाले त्यात काय आता आपण ऑनलाईन फॉर्म भरू. लगेच त्यांनी मोबाईल चालू केला. ऑनलाईन पाहिलं तर ११ ते २२ सप्टेंबर २०२४ या कालावधीत शिबिर आहे सर. तुमचा फॉर्म भरू का ? मी म्हणालो, 'लगेच भरा सर. माझा फॉर्म पूर्ण भरत आला तेव्हा कदम सर म्हणाले ,सर जमलं तर तुमच्या पत्नीलाही हे करायला सांगा. दोघे केला तर अधिक उत्तम होईल'. मग मी माझ्या पत्नीचाही फॉर्म भरला. माझ्या उजव्या बाजूला बसलेले डॉ. ए.टी. शिंदे सर म्हणाले, सर माझा एक फॉर्म भरा. त्यांच्या बाजूला बसलेले डॉ. राजकुमार पवळे म्हणाले की, सर माझेही फॉर्म भरा. आम्ही तिघांनी फॉर्म भरून टाकलं आणि म्हणालो नंबर लागला तर नक्की जाऊ. त्यानंतर काही दिवस गेले. जुलै महिना उजाडला तेवढ्यात माझ्या मोबाईलवर एक मेल आला, माझ्या पत्नीचा नंबर लागलेला होता पण माझा लागला नव्हता. मी कदम सरांना कॉलेजमध्ये गेल्यानंतर म्हणालो सर माझा नंबर लागला नाही. तर सर म्हणाले ,लागेल काळजी करू नका. पण माझे सहकारी पवळे सरांचा नंबर लागला होता.भावकीचा फार राग आला,सरांचा लागला आणि माझा लागला नाही.

शिंदे सरांच्या पत्नीचा नंबर लागलेला होता पण त्यांचा नि माझा नंबर लागलेला नव्हता. ज्यांना जायची इच्छा होती त्यांचा नंबर लागत नव्हता जे जाण्यासाठी इच्छुक नव्हते त्यांचा नंबर मात्र लागलेला होता.दात असून चन्ने नव्हते,माझी पत्नी म्हणाली, तुम्ही येणार असाल तर मी सोबत जाते नाहीतर मी जाणार नाही. शेवटी मी इकडे तिकडे शोध करून मित्रांच्या मदतीने माझा नंबर लावला. मला खूप आनंद झाला. माझं आणि पत्नीचे, दोघांचे टिकिटांचे रिझर्वेशन केलं. शिंदे सरांनी प्रयत्नाने त्यांचाही नंबर लावला. या दरम्यान आमच्या घरामध्ये एक थोडीशी वाईट घटना घडली. माझी मुलगी साक्षी, मुंबईला आजारी पडली. तपासणीनंतर तिला डेंग्यू झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे मी ताबडतोब रजा टाकून मुंबईला गेलो. तिथे तिचे मामा संभाजीराव अडकुणे व मामी वनिता या दोघांनी खूप काळजी घेतली. तरी दक्षता म्हणून तिला

दवाखान्यात दाखल केलं. दोन दिवसानंतर पत्नी पण तिथे आली. योग्य ट्रीटमेंट चालू होतं. तरी मनात धाकधूक होती की आपलं विपश्यना रद्द होतं की काय? काही दिवसांनी तिचा आजार बरा झाला पण डॉक्टरांनी दहा ते पंधरा दिवस आराम करायला सांगितलं. त्यावेळी पत्नी म्हणाली, मी काही विपश्यनासाठी येत नाही तुम्हाला जायचं असेल तर तुम्ही जा. मी तर मनाने तयार केलेलीच होती परत मुंबईवरून नांदेडला आलो आणि मी महाविद्यालयात सहकाऱ्यांसोबत चर्चा केली. मी जाणार हे ठरलच होतं. शिंदे सरांनी त्यांच्या घरी लक्ष्म्या बसत असल्याने त्यांच्या पत्नीने येण्यास नकार दिला. सर मात्र येण्यासाठी ठाम होते. आमच्या दोघांची उत्सुकता आणि धडपड पाहून पवळे सरही तयार झाले. शेवटी त्यांचेही तिकीट काढलं. रजेचा प्रश्न होता. रजा कोणत्या पद्धतीची द्यावी हा प्रश्न प्राचार्य साहेबांना पडत होता. पण ते. कुठलीही रजा द्यायला तयार होते.शेवटी कदम सरांनी आणि शिंदे सरांनी जी.आर. काढून रजेचा मार्ग मोकळा केला. आम्ही तिघेही नांदेड वरून, रात्री दहा वाजता राजाराणी गाडी जाते त्या गाडीत बसलो. अर्थात पवळे सरांच्या मुलांनी त्यांच्या कारने आम्हाला स्टेशन पर्यंत सोडले होते. पण दुर्दैवाने माझा आणि शिंदे सरांचं एकाच डब्यात सीट नंबर आला आणि पवळे सरांचा मात्र दुसऱ्या डब्यात आला. आम्ही खूप प्रयत्न केले की आमच्याकडील एखादी व्यक्ती किंवा त्यांच्याकडील व्यक्ती परस्पर बदली होऊन तिघे एकत्र बसता येईल. पण ती संधी काही मिळाली नाही. शेवटी पवळे सर जड अंतःकरणाने अकरा वाजता झोपायला गेले. मी आणि शिंदे सर मात्र खूप गप्पा मारत बसलो. जवळपास रात्रीच्या दोन पर्यंत गप्पा होत मारत होतो. त्या गप्पांमध्ये अर्थात अधिक महत्त्वाचा विषय प्राचार्य पदाच्या जाहिरातीचा होता. नुकतच महाविद्यालयात जाहिरात निघाली होती आणि शिंदे सरांनी अर्ज केलेला होता. माझा त्यात काही रस नव्हता पण प्राचार्य पदाची नेमणूक संभाव्यता आणि शक्यता याविषयी भरपूर चर्चा आम्ही केली. नंतर दोन वाजता आम्ही झोपलो. सकाळी साडेसहा वाजता गाडी इगतपुरी स्टेशन वर पोहोचली. तेथे पोहोचल्याबरोबर पवळे सर म्हणाले आपण स्टेशनवरच फ्रेश होऊ आणि चहा वगैरे नाश्ता करून जाऊ. शिंदे सर म्हणाले, 'आपण पहिल्यांदा इगतपुरीच्या केंद्रावर जाऊ आणि तेथे नक्कीच काहीतरी व्यवस्था केलेली असेल' त्यांचा धागा पकडून मी म्हणालो की, सर म्हणतात ते बरोबर आहे. प्रथम आपण तिथे जाऊ आणि तिथे काही सोय नसेल तर परत स्टेशनवर येऊ. तिघांच्या संमतीने एक ॲटो केला. ज्याचा ऐंशी रुपये भाड होतं. उतरल्यानंतर पहिल्यांदाच त्या विपश्यना केंद्रामध्ये पाऊल ठेवताच मनात एक आल्हाददायक भावना निर्माण झाली. सगळीकडे निसर्ग सुंदर दिसत होता. लगेच शिंदे सरांनी मोबाईल करून आपल्या घरी व्हिडिओ कॉल द्वारे हे दृश्य दाखवत होते. त्यांचेच पद्धत पाहून पवळे सरही व्हिडिओ कॉलद्वारे बोलत होते. मी तेथील काही फोटो आणि व्हिडिओ रेकॉर्डिंग करायला सुरुवात केली. हा सगळा प्रकार आम्ही प्रथमच पाहत होतो. अतिशय सुंदर गिरी पर्वताच्या बाजूला निसर्ग वातावरणात आम्ही पोहोचलो होतो. मध्ये गेल्यानंतर थोड्या वेळातच एक विदेशी साधक हात जोडून उभा होता. आणि इंग्रजी भाषेत म्हणत होता, सर्वांचं स्वागत आहे. आपण पहिल्यांदा नाश्ता करून घ्या मला वाटलं हे सर्व इंग्रजीत आहे की

काय? पण नंतर कळलं बरेच विदेशातील साधक येथे सेवा करण्यासाठी काही दिवस थांबतात. आम्ही तिथेच ब्रश करून नाश्ता करण्यासाठी हॉलमध्ये गेलो होतो. तिथे गेल्याबरोबर जवळपास पाचशे लोक बसतील एवढा मोठा हॉल होता. त्या दिवशी साबुदाणा होता. आम्ही प्रत्येकानी साबुदाण्याची खिचडी ताटात घेतली . केळी घेतली, दूध घेतलं आणि एका टेबलाजवळ जाऊन बसलो. एक दोन घास खाल्ला असेल, एकदम चविष्ट खिचडी पाहून खूपच आनंद झाला. आणि खात.. खात समोर पाहिलं तर समोर एक वाक्य लिहिलं होतं, कृपया एकी बार लो पोटात धस झालं.आपण चूक केली, एवढी चविष्ट खिचडी पुन्हा घेता येत नाही. आता ही चूक आपण दुपारी दुरूस्ती करू. असं ठरवून आम्ही तेवढंच खाल्लं आणि प्लेट जमा करून बाहेर आलो. परत सर्वांना रूम संदर्भात सूचना देण्यात आली. आम्ही रांगेत उभे राहिलो. खरंतर आम्ही बाहेरच्या स्पर्धेपेक्षा आमच्यातच स्पर्धा लागली होती. आपण मागे राहू नये म्हणून. एकमेकांच्या पाठीमागे उभा राहिलो .पण त्याचा एक चांगला परिणाम होण्याऐवजी वाईट परिणाम असा झाला की, आम्ही एकाच कॉलेजचे सोबती आहोत. हे त्या समितीच्या लक्षात आल्याने आम्हाला तीन वेगवेगळ्या ठिकाणी रूम्स आणि वेगवेगळ्या ग्रुपमध्ये सामील करून टाकले.

शिंदे सरांना एफ २, पवळे सरांना जे १७ आणि मला के ४१ रूम बहाल करण्यात आली. आणि आमचे पाकीट, पैसे, मोबाईल सर्व जमा करण्याच्या अगोदर नातलगांना जवळच्या ना फोनवर बोलून सर्व जमा करून टाकलं. चादर, बेडशीट घेऊन आम्ही आमच्या रूम कडे निघालो. निसर्गाच्या रमणीय परिसरात अगदी दहा बाय दहाची रूम, स्वतंत्र सर्व सोयीनीयुक्त पाहून खूप आनंद झाला. मग आम्ही त्या दिवशी पाच –सहा वाजेपर्यंत वेळ होता म्हणून फिरायला लागलो. अकरा वाजता जेवायची वेळ झाली, लगेच जेवायला आलोत .आणि सकाळचा अनुभव होता, पुन्हा घेता येत नाही म्हणून थोडं भात अधिक, भाजी थोडा अधिक, चपात्या.. असं भरपूर ताटात वाढून घेतलं होतं. दोन भाज्या, वरण, भात, ताक, सलाड असे एकूण जेवण होत. थ्री इडियट पिक्चर मध्ये जसे तिघे आपले ताट फुल्ल भरून घेतात तसं ताट भरून घेऊन आम्ही एका टेबलाजवळ जाऊन बसलो. अर्ध्यापेक्षा जेवण अधिक झालं आणि सहज समोर नजर गेली. तिथं लिहिलं होतं कृपया ताटात अन्न सोडू नका आता पोटात गोळा निर्माण झाला. आम्ही भरपूरच घेतलं होतं.

जेवण जास्त झाल्यामुळे गुंगी आली होती. रूमवर आलो आणि थोडा वेळ आराम केला. नंतर संध्याकाळी पाच वाजता परत मुरमुरे, चहा आणि केळी देण्यात आलं. यानंतर सहा वाजता प्रत्येकाच्या नंबर प्रमाणे मोठ्या सभागृहामध्ये धम्म हॉल जवळ आम्हाला जमा करण्यात आले. तिथे बसण्यासाठी एक छोटीशी गादी आणि त्याच्या बाजूला एक छोटीशी उशी अशी रचना होती. सूचना थोडक्यात मिळाल्या आणि ध्यानधारणास सुरुवात झाली आणि आर्य मौन संदर्भात सूचना देण्यात आली. आर्य मौन याचा अर्थ बोलणं बंदच नाही तर इशारे आणि हातवारे सुद्धा करता येणार नाही.

आम्ही ध्यान करायला लागलो. ध्यान करण्याची येथील पद्धत फार वेगळी होती. परंपरेनं आमच्या डोक्यामध्ये अशी कल्पना बसली होती की

ध्यान म्हणजे डोळे बंद करून परमेश्वराची आराधना करणे. पण येथे डोळे बंद करायचे पण कुठल्याही परमेश्वराच आराधना करायची नाही. नाव घ्यायचं नाही तर फक्त नाकाद्वारे येणारे श्वास प्रश्वास याची पहरेदारी करायची. देखरेख करायचं. हवा कशी येतो आणि हवा कसा जातो एवढेच पाहायचं. या पलीकडे दुसरं काही करायचं नाही. एक वेगळं अनुभव होता. आम्ही ते करायला सुरुवात केली. सात वाजेपर्यंत ही साधना केल्यानंतर सात ते साडेआठ श्री सत्यनारायणाची गोयंका यांचे व्याख्यान सुरू झाले. ते व्याख्यान एवढं प्रभावी होतं की मी पहिल्याच व्याख्यानात त्यांच्या मोहात पडलो. वस्तुनिष्ठ माहिती आणि विवेकवादी अभ्यासाचा धागा ही त्यांच्या मांडण्याचे सूत्र होते. ते सुरुवातीलाच म्हणाले, दहा दिवसाच्या शिबिराला प्रारंभ झालेला आहे. तुम्ही नशीबवान आहात, तुम्हाला ही संधी मिळाली आहे. सगळ्यांना संधी मिळत नाही. तुम्ही त्याचा लाभ घ्या.ही निसर्गभूमी नाही तर तपोभूमी आहे. येथे तुम्हाला तपुन निघायचं आहे. जेवढं मेहनत घ्याल तेवढ निकाल तुमच्या हातात आहे. तुम्हाला एवढेच करायचं आहे की, डोळ बंद करून आपण सगळ्या व्यवस्थेकडे तटस्थपणान पाहायचं. व्याख्यान, पंधरा–वीस मिनिटे ध्यानधारणा झाली आणि नऊ वाजता रूमवर गेलो. मला लवकर झोपायची सवय होती. मी झोपी गेलो आणि सकाळी पहाटे चार वाजता अलार्म लावला होता.पण अलार्म चा आवाज आलाच नाही. धम्म साधक घंटी वाजवत फिरत होते, म्हणून जाग आली. फ्रेश होऊन मी ध्यानसाठी सभागृहात गेलो.पहाटे ४:३०–६:३० दोन तास ध्यानधारणा होती. पहिल्या तासामध्ये ध्यानात लक्ष नव्हतं. डोक्यात अनेक विचार येत होते. शेवटी एका तासानंतर हळूहळू ध्यान केंद्रा मध्ये लक्ष लागायला लागलं. आणि साडेसहा पर्यंत आम्ही ध्यानधारणा केली साडेसहाला नाष्टा करण्यासाठी सभागृहात गेलो. दररोजच्या नाष्टाची वैशिष्ट्य अस की नाश्ता कधीच रिपीट व्हायचा नाही. दररोज नवनवीन नाष्टा असायचा. भरपेट नाष्टा करून आम्ही सात वाजता रूमवर आलो. कारण गरम पाणी साडेसात पर्यंत मिळणार होतं. स्नान वगैरे करून पुन्हा ध्यान धरण्यासाठी सभागृहामध्ये आलो. सकाळी आठ ते नऊ सामूहिक साधना, आणि नऊ ते ११ ही वैयक्तिक स्वरूपातील साधना. असे एकूण साधनेचे स्वरूप होतं. तीन गुरु तिथे बसले होते. तेही बोलत नव्हते. बोलण्यास कोणालाही अधिकार नव्हता .फक्त साधना करणं एवढीच अपेक्षा त्यांची होती. पहिलाच दिवस साधनेचा प्रारंभ झालेला होता आणि न बोलता साधणा करणं म्हणजे थोडसं जड जात होतं. तसेच त्याच पद्धतीने सकाळ दुपार संध्याकाळ कसं तरी दिवस गेला आणि परत गोयंका सरांच्या व्याख्यानाला प्रारंभ झाला. त्यांच्या मांडणीचं सूत्र विज्ञानवादी होतं. ते म्हणाले की ही विद्या अति प्राचीन आपल्याकडची असून ती शुद्ध स्वरूपासून लुप्त झाली होती. ही पाचव्या–सातव्या शतकापर्यंत ही विद्या सत्य स्वरूपात होती व नंतर त्यामध्ये विकृती आली. म्हणून ब्रह्मदेश मध्ये जी विद्या सत्य स्वरूपात होती ती विद्या दान करण्याचं काम आपण सर्वांनी करायचा आहे असे ते म्हणायचे. आणि ते या व्याख्यानातून कष्ट किती महत्त्वाचे आहेत तपुन निघालं पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. आणि प्रत्येक उदाहरण त्यांचं मनाला पटणार होतं. संध्याकाळी नऊपर्यंत आराधना झाल्यानंतर रूमवर

गेलो. परत चार वाजता उठायचं होतं. दुसऱ्या दिवशी पुन्हा साधनेला प्रारंभ झाला. हा साधनेचा खऱ्या अर्थाने दुसरा दिवस होता. पण कालचा दिवस पाहिल्यानंतर मला मन सांगत होतं की पळून जा.. पण पळून जाण्यासाठी रस्ता नव्हता. सर्वत्र कडेकोट सुरक्षा लावण्यात आली होती .

आम्ही हळूहळू गुंतत गेलो. दररोज पहाटे चारला उठणे, रात्री ९ ला झोपणे ही दिनचर्या सुरू झाली. इतके दिवशी आम्हाला शिकणाऱ्या गुरूंच्या पुढे तक्रारी मांडायला, समस्या विचारायला रात्रीच्या वेळेला संधी असायची. पवळे सरांना झोप येत नव्हती. रात्री दोन वाजेपर्यंत ते झोपत नव्हते .पण त्यांना कुठलाही त्रास होत नव्हता. उलट ते ध्यानातून फ्रेश होत होते.

मोहापासून आपल्याला दूर जायचंय आणि आर्य मौन म्हणून बोलायचं नाही. आम्ही तिघेही बोलण्यासाठी उत्सुक होतो पण बोलता येत नव्हतं. तरी धाडस करून मी एक वेळेस शिंदे सरांच्या रूमवर गेलो. शिंदे सर इकडे –तिकडे पाहिले, एकदम चोरी केल्यासारखं त्यांच्या रूममध्ये जाऊन मधून दार लावला. थोडं एक दोन वाक्ये बोलून बाहेर पडलो. एकेदिवशी पवळे सरांना एकदा रात्रीच्या वेळेला झाडाखाली भेटून अंधारात चौकशी केली. ते म्हणाले, मला झोपच येत नाही. झोपेचा प्रॉब्लेम आहे. अशा पद्धतीने आमची दिनचर्या सुरू झाली. दररोज व्याख्यान हे एक अमृत होतं. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी गोयंका म्हणाले, माणसाच्या आयुष्यामध्ये शील, समाधी आणि प्रज्ञा या तीन बाबी अतिशय महत्त्वाच्या आहेत तुम्ही बोलताना सुद्धा आपली भाषा जपून वापरली पाहिजे. कोणाचेही मन दुखावेल असे बोलता कामा नये. दुसरा भाग म्हणजे कर्म. कुठल्याही प्रकारचा व्यसन जडता कामा नये. शुद्ध आहार घ्यावा.आणि शेवटचा भाग म्हणजे जगण्यासाठी आपणास काहीतरी व्यवसाय, नोकरी करावा लागतो तर तेथे भ्रष्टाचार न करता, अनैतिक वर्तन न करता व्यवस्थित नोकरी करावी तर तुमचं शील चांगला राहील. ही मांडणी खूपच मनाला भेदून गेली
from college library. Best Library User Award was given to Mr. Kamble Deepak M. (B. A. III) for highest book accession during the academic year. Teachers also used ICT based teaching method for teaching. It has helped a lot in effective implementation of Learning Management System (LMS). Various softwares were used for teaching and conducting online test and quiz. Various social media platforms like Kahoot, Edmodo YouTube, WhatsApp were utilized for effective online teaching. Many faculties uploaded their teaching videos on various platforms for open access for the students. Students also responded positively and participated in online activities actively.

Other than these activities various feedback opinions were taken from students. These feedbacks are Entry Level Feedback, Teacher Evaluation by Students, Course Evaluation and Parents Feedback. All these activities helped college authorities to improve their work.

Dr. Durgesh B. Ravande joined duties as full time principal on 21/02/2025. Under his leadership new activities are conducted.

- Conduction of Annual Cultural Gathering “Indira-2025”.
- Organization of guest lectures
- Orphanage Fund Raising & motivational speech by Dr. Bargaje sir.
- One-day Faculty Development Programme on Major reforms in Accreditation.
- Organization of Webinar “Empowering the English Language Learners to achieve Learner Autonomy”
- Book review- innovative idea “Granthawar Bolu Kahi”

As a part of extra-curricular activity the college runs NSS unit. Its annual camp was held during 26 Jan.,2024 to 01 Feb., 2024 at adopted village Varkhed Tq & Dist. Nanded. Total one hundred fifty students participated in this camp. One student from NSS participated in state level “Utkarsh Camp” at Amravati and national level “National Integration Camp” at Burhanpur, Madhya Pradesh. It was functional in celebrating birth and death anniversaries of the great personalities. The concept behind organizing online activities was to inculcate the feelings of service to nation without any expectation, among the students. It really proved fruitful. Dr. Pastapure B. N. and Dr. Maske V. B. were the coordinators of the camp.

**College level awards are declared as follows.**

| Sr. No. | College level Award | Name of Student | Class |
|---|---|---|---|
| 1. | The Best NSS Volunteer | Ms. Nandedkar Namrata Ashish | B. Sc. III |
| 2. | The Best Library User | Kamble Deepak Ambadas | B. A. III |
| 3. | The Best Sports Person | Kendre Vijay Prabhu | B. A. I |
| 4. | The Best Cultural Person | Shinde Swapnil Laxman | B. Sc.IIl |

This year convocation ceremony is conducted on 29/04/2025. Dr. Raosahebji Shendarkar (Joint-Secretary, SSBES, Nanded) was the Innaugurator and Dr Yogini Satarkar (Co-Ordinator, Dr. Shakarraoji Chavan Study Centre, SRTMU, Nanded) was Guest of Honour . 137 students from UG and PG classes were conferred degrees. Mrs. Rathod B. A. was the Chief Superintendent of university exams this year whereas Prof. S. N. Vibhute performed his duties as Asisstant Chief Superintendent.

The construction work of four class rooms is started on Library building under the central govt shceme to strenghthen HEIs. A budege of fifty lakhs is given by Shri Imran Pratapgarhi (Honourable Member of Parliament). The work is going on as per the norms of the scheme.

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
## शैक्षणिक वर्ष २०२४-२५

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे या शैक्षणिक वर्षाची सुरुवात १ एप्रिल २०२४ ते ३० मार्च २०२५ पर्यंतची रूपरेषा निश्चित करण्यात आली. या शैक्षणिक वर्षामध्ये नियमित कार्यक्रमांतर्गत वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांतर्गत थोर नेत्यांच्या जयंती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन जिल्हा स्तरावरील उपक्रम आदींमध्ये स्वयंसेवकांचा सहभाग, वृक्षरोपण, श्रमदान आणि इतर वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचा सविस्तर वृत्तांत येथे देत आहोत. १ एप्रिल २०२४ ते ३० मार्च २०२५ दरम्यानच्या कालावधीत महाविद्यालयात थोर नेत्यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात आले. शिवाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विविध दिवस यांचेही महत्त्व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमाच्या माध्यमातून पोहोचविता आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये वाढ होऊन देशाचे एक जबाबदार नागरिक म्हणून त्यांच्यावर या माध्यमातून संस्कार घडविले गेले. जिल्हा स्तरावरील राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटविला. श्रमदान माध्यमातून विद्यार्थ्यांनी महाविद्यालय आणि परिसरामध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी जसे की, वृक्षारोपण व नदी घाट परिसर अशा अनेक ठिकाणी स्वच्छता करून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**थोर नेत्यांच्या जयंती कार्यक्रम:**

यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर. कै.डॉ. शंकरराव चव्हाण, लोकमान्य टिळक, शाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा गांधी, अब्दुल कलाम, लालबहादूर शास्त्री, मौलाना अब्दुल कलाम, यशवंतराव चव्हाण, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, गाडगे महाराज, स्वामी विवेकानंद,

राजर्षी शाहू महाराज, छत्रपती संभाजी महाराज, माँ जिजाऊ, इंदिरा गांधी, राजीव गांधी, बिरसा मुंडा, पंडित दीनदयाळ, बाळासाहेब ठाकरे, यशवंतराव चव्हाण, संत तुकडोजी महाराज, उमाजी नाईक, भगतसिंग, बाळशास्त्री जांभेकर, संत सेवालाल, गुरु गोविंद सिंह, महाराणा प्रताप, महावीर जैन महात्मा बसवेश्वर इ. अनेक थोर नेत्यांच्या जयंत्या महाविद्यालयामध्ये उत्साहाने साजरा करण्यात आल्या.

जागतिक पर्यावरण दिन, वृक्षरोपण सप्ताह, आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ सेवन विरोधी दिन, सद्भावना दिन, शिक्षक दिन, राष्ट्रीय सेवा योजना दिन ,राष्ट्रीय एकात्मता दिन, मानवी हक्क दिन, एड्स जनजागरण सप्ताह, संविधान दिन असे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिनानिमित्य महाविद्यालयातून विद्यार्थ्यांचे या विशेष प्रसंगी उद्बोधन केले. वृक्षरोपण कार्यक्रम

महाविद्यालयामध्ये ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात १५ वर्षांची लागवड करण्यात आली. तसेच शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये वृक्ष लागवड करण्यात आली तसेच वेळोवेळी पाहुण्यांच्या हस्ते परिसरामध्ये पक्षांची लागवड करून त्याची जोपासना केली आहे त्यामुळे महाविद्यालयातील परिसर स्वच्छ सुंदर आणि हरित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

**युवा संसद**

एकूण बारा विद्यार्थ्यांना ऑडिशन दिले होते. त्यापैकी पाच विद्यार्थांची विद्यापीठ स्तरावर निवड झाली. युवा संसद हा उपक्रम विद्यापीठ स्तरावर प्रथमतः घेण्यात आला. या उपक्रमांतर्गत जे विद्यार्थी आपला विचार व्हिडिओच्या माध्यमातून भारताच्या समृद्धतेसाठी काय करता येईल या संदर्भाने तयार करावयाचा होता. युवा संसद ही कशी असायला पाहिजे. या अनुषंगाने आमच्या महाविद्यालयातील एकूण सोहळा विद्यार्थ्यांनी दोन दोन मिनिटाचे व्हिडिओ तयार करून विद्यापीठासाठी निवड करण्याकरिता पाठवले. त्यामधून जवळपास महाविद्यालयातून पाच विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यामध्ये अनुक्रमे बी.एससी. द्वितीय वर्षाची ऐश्वर्या नांदेडकर, बी.ए.तृतीय वर्षाचा रोहित पवळे, बी.ए.तृतीय वर्षाचा दिपक कांबळे, बी.ए.तृतीय वर्षाची गायत्री गोटमुकले, बी.एससी. तृतीय वर्षाची नम्रता नांदेडकर इत्यादी विद्यार्थ्यांची विद्यापीठ स्तरावर निवड झाली. त्यानंतर पुढील राज्यस्तरीय निवड होण्याकरिता जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथे या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको नांदेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे पाच स्वयंसेवक युवा संसदेसाठी विद्यापीठ स्तरावर निवड झाली. त्यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य दुर्गेश रवंदे, भागवत पस्तापुरे, विशाल मस्के व इतर. यामधून ऐश्वर्या नांदेडकर या विद्यार्थिनींची राज्यस्तरावर निवड झाली. ही स्पर्धा मुंबई येथील मराठी भवन कार्यालयामध्ये दिनांक आपले प्रस्तुतीकरण सादर केले.

**स्वच्छ,सुंदर व सुदृढ पर्यावरणासाठी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी केलेली स्वच्छता:**

दिनांक १४/०८/२०२४ ०९/१०/२०२४ रोजी महाविद्यालय महाविद्यालयातील परिसर संपूर्ण

प्लास्टिक मुक्तीसाठी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन प्लास्टिक मुक्त महाविद्यालय ठेवण्यासाठी प्रयत्न केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा ' उपक्रम संपन्न वाचन संस्कृतीच्या विकासाकरिता तसेच तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाद्वारे राज्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपक्रमाच्या अंतर्गत श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित, इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयात दि. १ जानेवारी २०२५ रोजी ग्रंथालय विभाग ,भाषा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागच्या वतीने ग्रंथप्रदर्शन व सामूहिक वाचन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात मोठ्या संख्येत विद्यार्थी सहभागी झालेत . या प्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रदर्शित केलेल्या ग्रंथांपैकी आवडीचा एक ग्रंथ निवडून एक तास वाचन केले. सुरुवातीला महाविद्यालयाचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाबुराव घायाळ यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय, भाषा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक यांची एक समिती गठीत करण्यात आली होती. या समितीतील डॉ. शिवराज देशमुख, डॉ. शंकर विभुते, डॉ. हनुमंत भोपाळे, डॉ. लक्ष्मण काळे, डॉ. भागवत पस्तापुरे, डॉ. मिर्झा बेग, डॉ. विशाल मस्के यांनी या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून वेगवेगळ्या विषयांवरील दर्जेदार पुस्तकांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. वैचारिक ग्रंथ, कथा, कादंबरी ललित साहित्य, चरित्र आणि आत्मचरित्र प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.

**अवयवदान प्रतिज्ञा**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको नांदेड येथे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बाबुराव घायाळ यांच्या अध्यक्षतेखाली, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आधि बहुसंख्य विद्यार्थ्यांना अवयवदान प्रतिज्ञा देण्यात आली, या उपक्रमास उत्तम प्रतिसाद मिळाला. आपल्या देशात प्रत्यारोपणासाठी अवयव आणि ऊतीचा तुटवडा लक्षात घेता आपण, आपले कुटुंब, मित्र यांना अवयव व उत्ती दान करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून प्रतिज्ञा देण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. विशाल मस्के यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यासोबतच क्रांतीवीर नाना पाटील यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात डॉ.ए.टी.शिंदे, डॉ.एस. बी. देशमुख, डॉ.एफ.एम. सौदागर, डॉ.एन.के. वाघमारे, डॉ. शंकर विभुते, डॉ.जी.एस.पाटील, डॉ.एस.बी. मिर्झा, डॉ.आर.जी. मेटकर, डॉ.यु.ई. बैस, डॉ.आर.जी.पवळे, डॉ.एम.व्ही. लोखंडे, डॉ. के. आर. सोळुंके, डॉ.डी.बी. कदम, डॉ.एस.जी. तुगावकर, डॉ.बी.एन.पस्तापुरे, डॉ.एच.एस. मोहोकार, डॉ.एल.टी.काळे, डॉ.जी.एस. भोपाळकर, प्रा.आर. बी पाटील, प्रा. अपस्तंभ, प्रा. जाकोरे, प्रा. काझी मॅडम, कार्यालयीन प्रमुख श्री. वडवळे, डॉ.निता पतंगे, प्रकाश हंबर्डे, संजय कळगावकर, विठ्ठल पुयड, संजय एलसटवार, श्री. पवार, अतिक, राजेश शिंदे.. आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित उपस्थित होते.

## स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकाऱ्याचे जिल्हा,राज्य व राष्ट्रीय स्तरावरील यश

## शै वर्ष २०२४–२५ मध्ये स्वयंसेवकांनी जिल्हा राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदवला.

## वेगवेगळ्या शिबिरामध्ये सहभाग नोंदवला

| SR. NO | STUDENT NAME / FACULTY | CLASS | DISTRICT/ UNIVERSITY/ STATE/ NATIONAL | EVENT NAME | DURATION | PARTICIPATION /RANK |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NAMRATA AVINASH NANDEDKAR | B.SC.III | College | Best N.S.S. Volunteer Award | 2024-25 | Participation |
| 2 | GAYATRI GOTAMKALE | B.A.III | University | Youth Parliament Jaikranti College Latur | 20/03/2025 | Participation |
| 3 | AISHWARYA AVINASH NANDEDKAR | B.SC.III | University | Youth Parliament Jaikranti College Latur | 20/03/2025 | Participation |
| 4 | NAMRATA AVINASH NANDEDKAR | B.SC.III | University | Youth Parliament Jaikranti College Latur | 20/03/2025 | Participation |
| 5 | ROHIT PAWALE | B.A.II | University | Youth Parliament Jaikranti College Latur | 20/03/2025 | Participation |
| 6 | DEEPAK A. KAMBLE | B.A.III | University | Youth Parliament Jaikranti College Latur | 20/03/2025 | Participation |
| 7 | GAYATRI GOTAMKALE | B.A.III | State | AVHAN :2023 Consular Brigade NSS wing training comp on Disaster Management Amravati | 20/03/2025 | Participation |
| 8 | AISHWARYA AVINASH NANDEDKAR | B.SC.III | State | UTKARSH State level cultural competition 2024-25 | 23 TO 25 Feb.2025 | Participation |
| 9 | AISHWARYA AVINASH NANDEDKAR | B.SC.III | State | Youth Parliament Marathi Bhasha Bhavan Mumbai | | Participation |
| 10 | NAMRATA AVINASH NANDEDKAR | B.SC.III | National | National Integration Camp 2025 Berhampur University ,Odisha | 03/03/2025 To 09/03/2025 | Participation |

### विशेष वार्षिक शिबिर अहवाल २०२४– २५

स्थळ: मोजे वरखेड, ता. नांदेड, जि. नांदेड

आयोजक संस्था: इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड

कालावधी: २६ जानेवारी २०२५ ते १ फेब्रुवारी २०२५

उद्दिष्ट: ग्रामीण क्षेत्रात सामाजिक भान निर्माण करणे, स्वयंसेवकांमध्ये नेतृत्व व सेवाभाव विकसित करणे.

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको नांदेड पासून मोजे वरखेड हे गाव दहा किलोमीटर अंतरावर आहे._दिनांक २६ जानेवारी २०२५ – प्रजासत्ताक दिन व ग्राम संवाद सकाळचे सत्र: इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयात ध्वजारोहण करून शिबिर स्थळी प्रस्थान.

✻ स्वयंसेवकांनी ग्रामस्थांसोबत परिपक्व संवाद साधत गावातील समस्या व सामाजिक गरजांचा अभ्यास केला.

✻ ग्रामसभेमध्ये स्वच्छता, आरोग्य, शिक्षण,महिला सक्षमीकरण, जलसंधारण यावर चर्चा झाली.

✻ ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि शिबिराबाबत सकारात्मक वातावरणाची निर्मिती.

वरखेड येथे स्कूल कनेक्ट रॅली काढण्यात आली त्याप्रसंगी स्वयंसेवक

**दिनांक २७ जानेवारी २०२५ – उद्घाटन समारंभ सकाळचे सत्र:**

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड (श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित) यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिराचे आयोजन मौजे वरखेड (ता. नांदेड) येथे दिनांक २६ जानेवारी २०२५ ते १ फेब्रुवारी २०२५ दरम्यान आयोजन करण्यात आले. या शिबिराचा उद्घाटन समारंभ सोमवार, २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एल. घायाळ होते. प्रमुख अतिथी म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. अमोल काळे उपस्थित होते. यावेळी ग्रामपंचायत वरखेडचे पोलीस पाटील श्री. सुभाष नागोराव सूर्यवंशी यांची विशेष उपस्थिती लाभली.

उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. अमोल काळे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ श्रम न करता, संस्कार, नीतिमत्ता आणि सामाजिक जाणिवेची जोपासना करावी असे मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक युगातील डिजिटलायझेशनच्या महत्त्वावर भर दिला. ग्रामीण भागातील लोकांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून समाजहित साधावे, असे प्रतिपादन केले. ग्रामीण विद्यार्थी, महिला आणि पुरुष सध्या स्मार्टफोनसारखी साधने वापरत असले तरी त्याचा रचनात्मक वापर व सामाजिक प्रगतीसाठीचा उपयोग अधिक गरजेचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. बी. एल. घायाळ यांनी एनएसएस स्वयंसेवकांना आत्मचिंतन, सामाजिक बांधिलकी, जबाबदारी आणि ग्रामीण जीवनाशी समरस होण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांनी गावातील समस्या समजून घेत त्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, ग्रामस्थांशी सुसंवाद साधावा आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून गावाच्या विकासासाठी कार्य करावे, असे आवाहन केले. शहरी आणि ग्रामीण समाजातील अंतर कमी करून एकमेकांशी समरसता साधणं ही काळाची गरज असल्याचं त्यांनी ठामपणे सांगितलं.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. भागवत पस्तापुरे यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. विशाल मस्के यांनी केले. संपूर्ण उद्घाटन सोहळा प्रेरणादायी ठरला असून शिबिराच्या पुढील दिवसांत गाव स्वच्छता, आरोग्य तपासणी, लोकजागृती मोहिमा, व्याख्याने आणि विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

शिबिराचे औपचारिक उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. स्वागत व प्रास्ताविकानंतर शिबिराचे उद्दिष्ट स्पष्ट करण्यात आले.

**कार्यक्रम: रक्तदान शिबिर**

श्री गुरु गोविंदसिंह रक्तपेढी नांदेड येथील आरोग्य अधिकारी डॉ. कनकदंडे व सहयोगी राहुल कांबळे यांच्या उपस्थितीमध्ये रक्तादान शिबीर संपन्न झाले.५० हून अधिक स्वयंसेवक व ग्रामस्थांनी रक्तदान केले.

दुपारचे सत्र: डिजिटल भारत

विषय: डिजिटल भारत व युवकांची भूमिका

उद्बोधन: प्रा. भागवत प्रस्तापुरे व श्री. विशाल मस्के

डिजिटल साक्षरतेचे महत्त्व,UPI व्यवहार, डिजी लॉकर, ई–गव्हर्नन्स, सायबर सुरक्षेचे नियम समजावून सांगितले.

प्रभाव: युवकांनी डिजिटल यंत्रणांबाबत जागरूकता मिळवली व माहितीचा योग्य वापर करण्याची प्रेरणा घेतली.

**दिनांक २८ जानेवारी २०२५ सामाजिक समस्या जनजागृती**

दुपारचे सत्र:

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिरात दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी बालविवाह एक सामाजिक समस्या या विषयावर विशेष जागृतीपर कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. ए. टी. शिंदे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. शंकर विभुते आणि प्रा. डॉ. एन. के. वाघमारे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. विशेष मार्गदर्शक म्हणून देखील अध्यक्ष प्रा. डॉ. ए. टी. शिंदे यांनी सखोल विचार मांडले.

**दिनांक २९ जानेवारी २०२५ – आरोग्य तपासणी व सायबर सुरक्षा**

सकाळचे सत्र:

दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी मौजे वरखेड येथे श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षिक शिबिरांतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात MGM आयुर्वेदिक रुग्णालय, निमगाव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या आरोग्य शिबिरामध्ये हृदयविकार, उच्च व निम्न रक्तदाब, मधुमेह, अस्थिरोग तसेच महिलांच्या आरोग्यविषयक विशेष तपासण्या करण्यात आल्या. डॉक्टर पावडे आणि त्यांच्या सहकारी वैद्यकीय टीमने सुमारे १२० हून अधिक रुग्णांची तपासणी करून त्यांना विनामूल्य औषधे व तज्ज्ञ सल्ला उपलब्ध करून दिला. शिबिरामुळे गावातील अनेक शेतकरी व गृहिणींना आपल्या आरोग्याबाबत योग्य निदान व सल्ला घेता आला. आयुर्वेदिक उपचार पद्धतीमुळेही ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.या उपक्रमामुळे ग्रामस्थांनी आनंद आणि कृतज्ञता व्यक्त करत महाविद्यालयाच्या वतीने तसेच ग्रामस्थांच्या वतीने डॉक्टर पावडे व त्यांच्या संपूर्ण वैद्यकीय पथकाचा छोटेखानी सत्कार करण्यात आला.संपूर्ण तपासणी शिबिर अत्यंत यशस्वीपणे पार पडले एमजीएम रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर पावडे व त्यांचा सर्व समूह यांनी खुप मेहनत घेऊन मोलाचे सहकार्य केले.आणि या उपक्रमामुळे शिबिरातील स्वयंसेवक व ग्रामस्थांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली. हा उपक्रम आरोग्यसेवा आणि समाजहिताचा उत्कृष्ट नमुना ठरला.

**दुपारचे सत्र:**

दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी ऑनलाइन पेमेंट – फायदे, धोके व सुरक्षा या अत्यंत महत्त्वाच्या आणि काळानुरूप विषयावर प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**दिनांक ३० जानेवारी २०२५ – महिला सशक्तीकरण व जैवतंत्रज्ञान**

सकाळचे सत्र – महिला मेळावा:

ग्रामीण महिलांसाठी सशक्त संवादाचे व्यासपीठ दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी मौजे वरखेड येथे

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरात महिला मेळावा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या मेळाव्याचे आयोजन प्रा. रंजना अडकिने यांच्या पुढाकाराने आणि महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापकांच्या सहकार्याने करण्यात आले.

**प्रभाव:** या मेळाव्यामुळे महिलांमध्ये आत्मभान, संघटनशक्ती आणि जागरूकता वाढीस लागली. हा उपक्रम ग्रामीण महिलांच्या सशक्तीकरणासाठी एक प्रभावी पाऊल ठरला.

दुपारचे सत्र – जैवतंत्रज्ञान व शेती:

**जैवतंत्रज्ञान शेतीसाठी फायद्याचे**

दिनांक ३० जानेवारी २०२५रोजी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे जैवतंत्रज्ञान शेतीसाठी फायद्याचे या विषयावर महत्वाचे मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. यामध्ये शेतीतज्ज्ञ डॉ. धनंजय गोंड, प्राध्यापक डॉ. हनुमंत भोपाळे (कृषी विश्लेषक, इंदिरा गांधी महाविद्यालय, सिडको), आणि डॉ. एफ.एम. सौदागर (राज्यशास्त्र विभाग, इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय) उपस्थित होते.कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. एफ.एम. सौदागर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. शिबिरात, शेतकऱ्यांना शेतीतले नवीन तंत्रज्ञान आणि त्याचा लाभ याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

**प्रभाव:**

या मार्गदर्शन शिबिरामुळे ग्रामस्थ आणि विद्यार्थी शेतीतले नवीन तंत्रज्ञान अधिक समजून घेतले. यामुळे त्यांना जैवतंत्रज्ञानाचे महत्त्व आणि शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यावर अधिक विश्वास बसला. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांची विक्री अधिक योग्य पद्धतीने कशी करावी, तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्पादनात कशी सुधारणा करावी, याबद्दल माहिती मिळाली.

**दिनांक ३१ जानेवारी २०२५ – योग दिन व संविधान जागरूकता**

सकाळचे सत्र – योग प्रात्यक्षिके:

शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योगाभ्यास दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योगाभ्यास या विषयावर एक महत्वपूर्ण मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. या सत्राचे मार्गदर्शन योगशिक्षक अर्जुन शिंदे यांनी केले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना प्राणायाम, ध्यान, सूर्यनमस्कार, आणि विश्रांती क्रिया यांचा प्रात्यक्षिकद्वारे परिचय करून दिला. योगशिक्षक अर्जुन शिंदे यांनी विद्यार्थ्यांना योगाभ्यासाचे महत्व समजावले आणि विविध योगासनांचे सादरीकरण केले.प्राणायाम आणि ध्यान यांची सैद्धांतिक माहिती सुद्धा दिली, ज्यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक शांती आणि ताणमुक्त जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन मिळाले. सूर्यनमस्कार आणि विश्रांती क्रिया यांचा प्रत्यक्ष प्रात्यक्षिकानुसार विद्यार्थ्यांना कसा लाभ होऊ शकतो, यावर विस्तृत माहिती दिली.

दुपारचे सत्र – भारतीय संविधानाचे अवलोकन

दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे एक महत्त्वपूर्ण सत्र आयोजित करण्यात आले, ज्याचे शीर्षक भारतीय संविधानाचे अवलोकन होते. या सत्रात डॉ. विजय पवार (बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा) आणि प्रा. संदीप काळे (प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड) हे प्रमुख वक्ते होते, तर अध्यक्ष म्हणून डॉ. सुनील डहाळे (एमजीएम

महाविद्यालय, नांदेड) उपस्थित होते.

**सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन:**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विशाल मस्के यांनी केले. सत्राच्या समारोपात, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाचे अधिकारी प्रा. डॉ. भागवत पस्तापूरे यांनी आभार प्रदर्शन केले.

**प्रभाव:**

या सत्रामुळे युवकांमध्ये राज्यघटनेबाबत अभिमान आणि जबाबदारीची भावना निर्माण झाली. भारतीय संविधानाची माहिती आणि त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजले आणि संविधानातील तत्त्वज्ञानाचे पालन करण्याचा ठरवला. विशेषत: लोकशाही प्रक्रियेत सहभाग आणि नागरिक अधिकारांची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये जागरूकतेला चालना देणारी ठरली.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गाऊन केली गेली. दिनांक . ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको येथे सात दिवशीय विशेष वार्षिक शिबिर समारोप समारंभ आयोजित करण्यात आला. या शिबिराचे समारोप बी. एल. घायाळ (प्रमुख वक्ते), डॉ. शिवराज देशमुख, आणि डॉ. केदार सोळुंके यांनी केले. समारोप सत्रामध्ये डॉ. घायाळ यांनी विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले आणि शिबिराच्या संपूर्ण कार्याची समीक्षा केली.

डॉ. घायाळ यांनी शिबिरात विद्यार्थ्यांनी केलेल्या समाजकार्याचा आढावा घेतला आणि त्याचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी शिबिरादरम्यान ग्रामस्थांसोबत सुसंवाद साधला विविध शैक्षणिक व सामाजिक कार्ये केली आणि या कार्यामुळे ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

शिबिरातील विद्यार्थ्यांच्या कामाची महती आणि त्यातील सहभागीतेचे महत्व स्पष्ट करून समाजातील योगदानाची भावना विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. डॉ. शिवराज देशमुख आणि डॉ. केदार सोळुंके यांनी समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांना समाज सेवा आणि विकसनशीलतेतील भूमिका बद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी शिबिराच्या समारोपाचे महत्व सांगितले आणि विद्यार्थ्यांच्या कार्यामध्ये केलेल्या सकारात्मक बदलांवर चर्चा केली.

प्राचार्य बी. एल. घायाळ यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कार्याबद्दल ग्रामस्थांकडून मिळालेल्या समाधानाचे वर्णन केले आणि सर्व विद्यार्थ्यांचा गौरव केला.

एकूण ७ दिवसांच्या शिबिरात सामाजिक जागरूकता, आरोग्य, शेती, डिजिटल साक्षरता, महिला सक्षमीकरण, संविधान जागृती, आणि योग साधना अशा विविध विषयांवर कार्यक्रम घेण्यात आले.

विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व तांत्रिक विषयांवर भर देण्यात आला.ग्रामस्थ, स्वयंसेवक व प्रमुख वक्त्यांचा प्रभावी सहभाग हे शिबिराचे बलस्थान ठरले.युवकांमध्ये सामाजिक प्रश्नांविषयी संवेदनशीलता वाढविणे व कृतीशीलतेकडे वळविणे हे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पार पाडले गेले.ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विद्यार्थ्यांचे समर्पित योगदान हे या शिबिराचे यश ठरले.स्वयंसेवकांनी नेतृत्व, सेवा, संवाद कौशल्य, आणि सामाजिक बांधिलकी या गुणांचा विकास केला.

***

# SPORTS REPORT – 2024– 2025

**-Dr. Ghayal Baburao Laxmanrao,** Head, Department of Sports

**Introduction**

Physical education is an integral part of the general education. Physical education played vital role in its educational level. The importance of sports field is approved by the world also. We are seeing the improvement of sports day by day and everyone know about the necessity of sports for the development of an individual and nation.

We see the difference between ancient sports and modern sports that has been developed more in the modern age. Today's age is known as the age of competition, so the quality of the sports field should be developed by using various technologies in that matter modern innovative technologies help to conduct and execute sports in better way.

By studying the physical education, players develop their Physical, Psychological, Economical and Social development resulting in the raise of pride of nation through sports. Therefore, players should be given special attention in the sports field.

Many players in the college have played very well by participating in inter-collegiate, inter-university, State and National competitions in an academic year 2024-2025.

**List of Participated Players in All India Inter-University Sports Tournaments 2024-2025**

| Sr. | Name of the Player | Sports | Level | Position |
|---|---|---|---|---|
| 01 | Pawar Saurabh B. | Mallkhamb | All India Inter University | Participation & fourth Place |
| 02 | Maddelwar Shailesh S. | Malkhamb | India Inter University | Participation & fourth Place |
| 03 | Maske Laxmikant Raju | Malkhamb | All India Inter Univesity | Participation & fourth Place |
| 04 | HadmodeVaibhav Dagdu | Malkhamb | All India Inter University | Participation & fourth Place |
| 05 | Kdendre Vijay Prabhu | Malkhamb | All India Inter University | Participation & fourth Place |

## List of Winner Players in Inter-Collegiate Sports Tournaments 2024-25

| Sr. | Name of the Player | Sports | Level | Position |
|---|---|---|---|---|
| 01 | Pawar Saurabh B. | Mallkhamb(M) | Inter Collegiate Tournament. | First |
| 02 | Maddelwar Shailesh S. | Malkhamb(M) | Inter Collegiate Tournament | First |
| 03 | Maske Laxmikant Raju | Malkhamb(M) | Inter Collegiate Tournament | First |
| 04 | HadmodeVaibhav Dagdu | Malkhamb(M) | Inter Collegiate Tournament | First |
| 05 | Kdendre Vijay Prabhu | Malkhamb(M) | Inter Collegiate Tournament | First |
| 06 | Kendre Vijay Prabhu | Yoga(M) | Inter collegiate Tournament | Fifth |

**International Yoga Day**

Indira Gandhi Sr. College Cidco, Nanded has organized International Yoga Day on on 21st June 2024. The Inaugural Session of the programme was made by college Principal Dr. B.L.Ghayal . So for keeping Physical and Mental health we have to do exercise of Yoga every day. Every person has some kind of stress in daily routine life so we have to remove the stress from life using yoga in daily practices. So everybody needs Yoga exercise for Mental Health.

Yoga Teacher from the Faculty Dr. Vibhute Shankar has valuable guidence about Yoga and its importance to faculty as per as Dr. Mohkar Harihar has given the practical session of Suryanamaskar, and he gave the demonstration of it. Every person should know about astang pranayam, astang yoga, suryanamaskar, Jalniti , Dhoti . By this way person can keep his physical and mental health proper order, if he has given focus on Yoga Studies. It is important for every person should know about Yoga and practice Yoga in daily life in a modern age.

For this International Yoga Day 52 Participant present for it. The Introductory speech of the programme was made by Dr. Ghayal B.L Director of Physical Education & Sports of this college. The anchoring of

the programme made by Dr. Nandedkar Ramesh Tukaram And Vote of thanks of this programme was made by Dr. Adkine Ranjana V.& Dr. Khedkar A. V.

For this International Yoga Day all the dignitaries are present for this event . As per as the college Students , various persons from all sectors and all teaching staff of college present for this event.

It is importance to note that our faculty is aware about the yoga and its best practices. Sports Department always suggest students to do yoga every day for your fitness in life.

**Inter Collegiate Cross Country Competition**

On 12.08.2024 Inter Collegiate Cross County Competition has been conducted at Vasantrao Kale college Nanded. 01 player of the College was participated in the competition. Pawar Saurabh Bhausaheb. In the competition Players got guidance of Director of Sports, Dr. Ghayal B. L., Dr. Nandedekar R. T. Dr. Adkine R. V. & Dr. Khedkar Abhijeet.

**Celebrated 'National Sports Day'**

On 29th Aug, 2024 'National Sports Day' is celebrated all over in India on the occasion of birth Anniversary of Hockey magician, major birth anniversary of Major Dhyanchand. We all also celebrated major Dhyanchand's birthday as a 'National Sports Day' in remembrance of his contribution for sports.

In connection with the incident, Principal Dr. B.L Ghayal presented the flowers to the Image of Major Dhyanchand. and oath of sports is sworn to students. At that time Director of Sports, Dr. Ghayal Baburao, Prof. Ramesh Nandedkar, Dr. Deshmukh S.B., Prof. Waghmare N. K., Prof. Dr. Shinde Avdhut, Prof. Saudagar F. M. Prof. Dr.Pawale Rajkumar, Dr.Maske V.B, Dr. Bais U.E , Dr. Kadam D. B. Dr. Solunke Kedar, Dr. Lokhande Milind, Dr. Adkine R. V. & Dr. Khedkar A. V. and other professors, teachers and staff etc were present.

**Organized Inter Collegiate Mallkhamb Competition**

On 17 August 2024 Shivneri college shirur Anantpal has conducted an Inter-Collegiate Mallkhamb Competition. In this competition Pawar S.B , Madelwad S.S, Maske L.R , Hadmode V.D and Kendre V.P all this students participated in the competition and got gold medal prize in this event. The inspiration for the programme given by the Sports Director Dr.B.L Ghayal and Dr.khedkar A.V.

**Inter Collegiate Yogasan (M) Competition**

Rasika Mahavidyalaya Devani has organized competition on Yogasan dated 22.08.2024. In this competition Mr. Kendre Vijay Prabhu B.A First has participated in the competition and got fifth place for this event.The inspiration for the programme given by the Sports Director Dr.B.L Ghayal and Dr.khedkar A.V.

**Inter-Collegiate Athletics (M&W)**

**Competition**

Rajiv Gandhi college of computer science and Management Naned has organized Athletics competition 30.09.24 to 01.10.2024. In mentioned Competitions, College players played very well by taking participation in it. Mr.Soham Kalaskar , Mrs Suryawanshi S.P , and Dhawale S.U. Participated in it. In the competition, Players got guidance of Director of Sports, Dr. Ghayal B. L. & Dr. Ramesh Nandedkar. Dr. Adkine R. V. & Dr. Khedkar Abhijeet.

**Annual Gathering programme of college and Sports different competition 2024-2025.**

On the occasion of Annual Gathering our sports Department conducted varioius sports activities for students in that Athletics men and women, kabbadi, khokho and Hollyball competition held in college. And Prize distribution in the form of Logo and Certificate is given to student on the valedictory programme of the college gathering.

**Best Sports Award (2024-2025)**

On the occasion of Best Sports Award 2024-2025 is given by Sports Department of college to players who have played very well in various sports events in the college and outside of the university events. On this occasion we offered this award to Kendre Vijay Prabhu along with certificate and memento to him.

# सांस्कृतिक विभाग अहवाल
# (२०२४-२०२५)

**-डॉ. हनुमंत मारोतीराव भोपाळे**

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको नांदेडच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व सहयोग सेवाभावी संस्था,संचालित कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णुपुरी, नांदेडच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवामध्ये विविध कलाप्रकारात महाविद्यालयातील श्रेया साळवे, स्वप्निल शिंदे, गंगासागर संगेवार ,सोनसळे मनीषा ,राहुल तावडे, श्रद्धा लाठकर, टीना भुरेवार या विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला. लावणी, वक्तृत्व, वादविवाद ,सुगम गायन ,रांगोळी, मेहंदी शास्त्रीय गायन, कोलाज, स्थळछायाचित्रण इ. स्पर्धमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. हनुमंत मारोतीराव भोपाळे आणि सहसंघ व्यवस्थापक डॉ. लक्ष्मण काळे ,डॉ. काझी एफ. ए. यांनी कार्य केले.

०७ मार्च ते १२ मार्च २०२५ या कालावधीमध्ये इंदिरा २०२५ या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी आनंदनगरीचा आस्वाद घेतला. विविध क्रीडा स्पर्धा, निबंध, हस्ताक्षर, काव्यवाचन गीतगायन, वक्तृत्व , वादविवाद शेरोशायरी, पारंपरिक वेशभूषा आदी सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्नेहसंमेलनाचा समारोप प्रसंगी वेगवेगळ्या स्पर्धेतील विजेत्यांना पुष्पगुच्छ आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी बोलताना मनोज बोरगावकर म्हणाले, 'आपल्यापेक्षा जगंली प्राणी नैतिकमूल्ये बाळगून असतात, पोट भरल्यावर वाघसुद्धा शिकार करत नाही. आज महाराष्ट्रातील बातम्या वाचल्यानंतर, आपण ज्या काळात वावरत आहोत, त्याची आपल्याला लाज वाटते, त्यामुळे प्रत्येकांनी किमान जीवनमूल्ये अंगीकारली पाहिजेत, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक मनोज बोरगावकर यांनी केले.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड येथे 'इंदिरा-२०२५' या वार्षिक स्नेहसंमेलन पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे खजिनदार ॲड. उदयराव निंबाळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. हनुमंत भोपाळे, क्रीडा विभागप्रमुख डॉ. बाबुराव घायाळ, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. भागवत पस्तापुरे, डॉ. विशाल मस्के, मराठी विभागप्रमुख डॉ.शंकर विभुते उपस्थित होते.

आभार डॉ. बाबुराव घायाळ यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# महाविद्यालयातील विविध विभागांचा अहवाल.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको नांदेड येथे शैक्षणिक वर्ष २०२४–२५ या कालावधीत मराठी विभागाच्या वतीने विविध उपक्रम आणि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विभागाचा अहवाल थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

**मराठी विभाग :**

महाविद्यालयात मराठी विभाग हा पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन विभाग म्हणून ओळखला जातो. मराठी विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त १४ जुलै २०२४ रोजी व्याख्यान व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ .अजय गव्हाणे तर अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ.बाबुराव घायाळ उपस्थित होते.

प्रमुख वक्ते अजय गव्हाणे यांनी डॉ.शंकरराव चव्हाण जीवन आणि कार्य याविषयावर प्रकाश टाकला.

ऑगस्ट महिन्यात विभागाच्या वतीने मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घघाटन पार पडले.यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.वासुदेव मुलाटे उपस्थित होते.

मुलाटे यांनी साहित्यांच्या प्रेरणांची ओळख करून दिली. संस्थेचे सचिव व महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च शिक्षण राज्यमंत्री मा.डी.पी.सावंत यांच्या हस्ते ज्ञानधारा अंकाचे विमोचन करण्यात आले.

मराठी विभाग व ग्रंथालय विभागाच्या माध्यमातून ’वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ हा उपक्रम राबविला गेला.यावेळी वाचनाचे महत्व या विषयावर सुप्रसिद्ध साहित्यिक आणि दै.लोकमतचे पत्रकार भारत दाढेल यांची उपस्थिती लाभली.समारोपप्रसंगी परभणी येथील डॉ.प्रल्हाद भोपे उपस्थित होते.मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने कथाकथन, रांगोळी, वादविवाद, वक्तृत्व, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. श्रद्धेय डॉ शंकरराव चव्हाण व कुसुमताई चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त व मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने सुप्रसिद्ध साहित्यिक शिवाजी आंबुलगेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे मराठी विभागाच्या वतीने शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. हिंगोली जिल्ह्यातील नरसी बामणी येथे संत नामदेव यांच्या जन्मस्थळी भेट देण्यात आली.मराठी विभागाच्या वतीने आयोजित विविध उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागप्रमुख डॉ शंकर विभुते, डॉ.हनुमंत भोपाळे,प्रा.संतोष हापगुंडे, डॉ.छाया कदम यांनी परिश्रम घेतले.

**भूगोल विभागः**

भूगोल विभागाद्वारे द्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दरवर्षी भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. अभ्यास मंडळामध्ये बी.ए. प्रथम वर्ष ते एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा समावेश केला जातो. भूगोल अभ्यास मंडळाद्वारे भूगोल सामान्य ज्ञान परीक्षा, नकाशा वाचन स्पर्धा, विविध भौगोलिक विषय देऊन भित्तीपत्रक स्पर्धा व निबंध स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना भूगोल विषयाची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तसेच प्रत्येक वर्षी १६ सप्टेंबर हा दिवस ओझोन डे व १४ जानेवारीला भूगोल निमित्त कार्यक्रम घेऊन गेस्ट लेक्चरचे आयोजन करून पर्यावरणीय विषयावर विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्याचे कार्य केले.

भूगोल विभागाची एम. ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी नागोराव गोडबोले या विद्यार्थिनीने विद्यापीठाच्या मेरिट यादीमध्ये गुणानुक्रमे द्वितीय क्रमांक प्राप्त केला. भूगोल विभागाला विद्यापीठाची पीएच.डी संशोधन केंद्राची मान्यता आहे. सदर संशोधन केंद्राद्वारे एकूण आठ विद्यार्थी पीएच.डी संशोधनाचे कार्य करत आहेत. तर एका विद्यार्थ्यांना पीएच.डी पदवी अवॉर्ड झालेली आहे.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये भूगोल विषयामध्ये गुणानुक्रमे सर्व द्वितीय आलेली संध्या नागोराव गोडबोले या विदयार्थीनीचे सत्कार करण्यात आले.

**हिंदी विभाग :**

हिंदी विभागाच्या वतीने दरवर्षी अभ्यासक्रमपूरक असे विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी मानून विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्षात मध्ये वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने हिंदी भाषा, हिंदी साहित्य व यासोबतच लिखाणाच्या माध्यमातून, व्याख्याने आणि स्पर्धांच्या माध्यमातून हिंदी भाषा अवगत करणे व विकसित करण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

सदरील शैक्षणिक वर्षांमध्ये हिंदी विभागाच्या वतीने १४ सप्टेंबर हा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा हिंदी दिवस समारंभ, भित्तिपत्रक, निबंध लेखन, काव्यवाचन, वक्तृत्व स्पर्धा अशा अनेक स्पर्धांचे आयोजन हिंदी दिवसाच्या औचित्याने करण्यात आलेले आहेत. याच बरोबर विश्व हिंदी दिवस हा कार्यक्रमही १० जानेवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आला.

हिंदी अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी 'प्रेमचंद की प्रतिनिधि कहानिया' या नावाने विद्यार्थ्यांकडून हस्तलिखित पुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रेमचंद यांच्या विविध कहाण्या विद्यार्थ्यांनी आपल्या हस्ताक्षरामध्ये लिहून संग्रह केलेला आहे. तसेच यावर्षी सामाजिक परिप्रेक्ष्य में प्रेमचंद के साहित्य की मौलिकता, कहानी की अवधारणा एवं तीसरी कसम कहानी का तात्विक विवेचन, सिनेमा लेखन का स्वरूप एवं महत्व इत्यादी विषयावर गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आलेले आहेत. तसेच हिंदी

विषयाच्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने पूरक अभ्यासक्रम म्हणून 'सिनेमा लेखन' हा आड ऑड कोर्स घेण्यात आलेला आहे. असे विविध उपक्रम हिंदी विभागाच्या वतीने राबवून विद्यार्थ्यांमध्ये हिंदीचे महत्त्व, हिंदी भाषा व साहित्य याकडे आवड निर्माण होऊन वाचनीय दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे हिंदी विभागाच्या प्रत्येक उपक्रमामध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने भाग घेत असतात व हिंदी भाषा शिकण्याकडे त्यांचा कल वाढलेला असल्याची अनुभूती आम्हास मिळत असते.

**जागतिक महिला दिनः**

अँटी-सेक्शुअल हारसमेंट सेल व वुमन काउन्सेलर सेल यांच्या वतीने १०/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता 'आंतरराष्ट्रीय महिला दिना'निमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी आणि वक्त्या म्हणून डॉ. वीणा पाटील मॅडम (प्राचार्या, नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय, नांदेड) उपस्थित होत्या. त्यांनी 'लिंग समानतेसाठी कृतीस गती द्या' या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या प्रमुख पाहुणे सौ. विद्या अळणे मॅडम, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, समाजकल्याण विभाग, नांदेड होत्या. त्यांनी 'महिला व बालकांच्या संरक्षणासाठी असलेले कायदे' या विषयावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे सर यांनी भूषवले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक राठोड मॅडम यांनी केले.

**कॉम्प्युटर सायन्स विभागः**

कॉम्प्युटर सायन्स विभागाने वर्षभरात विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीस चालना दिली. उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सुरक्षा आणि नव्याने उदयास येणाऱ्या तंत्रज्ञानावरील व्याख्याने दिली.

**विज्ञान विभागः**

राष्ट्रीय विज्ञान  दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.साहेबराव शिंदे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पोस्टर प्रदर्शनाच्या उदघाटनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.यासोबतच गणित अभ्यास मंडळाचे उद्घाटन, निबंध स्पर्धा, ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धा चे पारितोषिक वितरण याप्रसंगी करण्यात आले.यावेळी रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.डी.बी.कदम लिखित रसायनशास्त्र या विषयाचे आणि डॉ.मिलींद लोखंडे लिखित प्राणीशास्त्र विषयाचे पुस्तक प्रकाशित झाले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.सुमंत तुगावकर डॉ.राजकुमार पवळे, डॉ.केदार सोळुंके, डॉ.उमेशसिंह बायस, डॉ.मिलींद लोखंडे, डॉ.आर बी.पाटील, डॉ.राम मेटकर, डॉ.बसवेश्वर जाकोरे, डॉ.डी.बी.कदम, डॉ.गंगाधर भोपाळकर, प्रा.बी.ए.राठोड, डॉ.काझी,प्रा.आपस्थंब, संजय कळगावकर,आदिनी मेहनत घेतली. पोस्टर प्रेझेन्टेशन स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावरील सुक्ष्म जीवशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेन्टेशन स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावर यश

मिळविले आहे. महाविद्यालयातील बी.एस्सी द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु.राणी शिंदे हिने रिसेंट डिस्कवरिज इन मायक्रो बायोलॉजी आणि कु.श्रद्धा हंबर्डे हिने प्रो बायोटिक्स या विषयावर पोस्टर तयार केले व मायक्रो बायोलॉजीस्ट सोसायटी ऑफ इंडिया तर्फे आयोजित मायक्रो मेनिया या स्पर्धेत सादर केले. या राष्ट्रीय स्तरावरावरील यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, सुक्ष्म जीवशास्त्र प्रमुख डॉ.अनिरूद्ध अपस्तंब, डॉ.सुलतान मिर्झा, डॉ.शंकर विभुते.आडिनी अभिनंदन केले आहे.

शेतकरी मार्गदर्शन कक्ष, इंदिरा गांधी (वरिष्ठ) महाविद्यालय, सिडको, नवीन नांदेड आणि रिलायन्स फाउंडेशन, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमानाने नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी ' हवामान बदल आणि शाश्वत शेती तंत्रज्ञान ' यावर आधारित एक दिवशी ऑनलाइन ऑडिओ माध्यमाद्वारे मार्गदर्शन व परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी आणि कार्यक्रमाचे उद्घाटक श्री शारदा भवन शिक्षण संस्थेचे कार्यकारी सदस्य श्री नरेंद्र चव्हाण, प्रमुख वक्ते आणि मार्गदर्शक डॉ. आनंद गोरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ (कृषिविद्या) अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, शेतकरी मार्गदर्शन कक्ष समन्वयक डॉ. आर बी पाटील, सदस्य डॉ. एस. बी. देशमुख आणि डॉ. एल. टी. काळे, रिलायन्स फाउंडेशनचे योगेश जोशी, अमोल खंडागळे, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी उपस्थित होते.

'सन्मान आणि पुरस्कार'

तीन दिवसीय इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ग्लोबल रिसर्च इनिशिएटिव्हस फोर एग्रीकल्चर सायन्स अँड टेक्नॉलॉजी या विषयावर आयोजित इंदिरा गांधी कृषी विश्वविद्यालय, रायपूर (छत्तीसगड) येथे मान्यवरांच्या हस्ते एक्सलन्स इन एक्सटेंशन पुरस्कार डॉ. आर. बी. पाटील यांना प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने डॉ. डी. बी. कदम यांनी NEP-२०२० नुसार बी.एस्सी. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठीचे रसायनशास्त्रविषयक पुस्तक प्रकाशित केले. पुस्तकाचे नाव: ऑर्गेनिक अॅन्ड इनऑर्गेनिक केमिस्ट्री असे आहे. डॉ. जी. एस. भोपाळकर यांना विज्ञान रत्न हा पुरस्कार सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे जनसंवाद साहित्य संमेलन २०२५ (२७ जानेवारी २०२५) रोजी मा. श्री. अशोकरावजी चव्हाण साहेब यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. डॉ. राजकुमार पवळे व प्रा. डॉ. भागवत पस्तापुरे लिखित पर्यावरण जागृती तसेच डॉ.प्रा. मिलिंद लोखंडे व डॉ.प्रा. उमेश सिंह बैस लिखित ऍनिमल डायव्हर्सिटी व टेक्स्ट बुक ऑफ बायोडायव्हर्सिटी ऑफ कोरडेट या पुस्तकाचे विमोचन मा.डी.पी.सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. थोडक्यात महाविद्यालयात विविधविभागांच्या वतीने शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम यशस्वी पद्धतीने राबविण्यात आले.

# ‘खेळ’ संघभावनेचे धडे शिकवतो. (क्रीडा विभाग)



मल्लखांब प्रात्यक्षिके सादर करताना,सौरभ पवार.बी.ए.तृतीय वर्ष



सर्व खेळाडूंना प्रोत्साहन देताना, संस्थेचे सचीव मा.डी.पी.सावंत , सहसचिव प्राचार्य डॉ.रावसाहेब शेंदारकर



आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दुर्गेश रवंदे.



आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना डॉ शंकर विभुते व डॉ हरिहर मोहोकार.



आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त क्रीडा विभाग प्रमुख डॉ बाबुराव घायाळ यांचा सत्कार करताना, डॉ.ए.टी.शिंदे.




प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.













## न गेलेला रस्ता (The Road Not Taken)

चालत असता दिशा दूरची
अडखळलो थोडा एकदिशी
समोर होत्या वाटा दोन
एक डावी अन एक उजवी

थांबून थोडा पाहुनी गेलो
वाट मग एक सुंदरशी
पर्णराजी आच्छादित अन्
लोक चालले त्यावरुनी

दुसरी वाट तशीच परंतु
गवताळ अन् उजाडशी
वहिवाटही नसे तिथे अन्
भासे गूढ वलयाची....

होते माहीत मजला हेही
पहिली वाट सोयीची
दुसरी वाट पाहे वाट
अखंडित पण पथिकांची

अभिमानेही आज सांगतो
तीच वाट मम भाग्याची
धाडस करुनी परिश्रमांने
वाकविले मी दैवा ही...

-रॉबर्ट फ्रॉस्ट ..